सोलापूर तरुण भारत

# आसमंत



**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप यांच्या विचारांची घट्ट बांधणी असलेले मितभाषी आणि वादातीत व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जाणारे चंद्रपुरम पोन्नुसामी राधाकृष्णन यांची भारताचे १५ वे उपराष्ट्रपतीपदी निवड झाली. देशातील दुसर्या क्रमांकाचे घटनात्मक पद भूषवणारे राधाकृष्णन हे तमिळनाडूतील तिसरे नेते आहेत. १९९८मध्ये वाजपेयी सरकारमध्ये केंद्रीय मंत्रीपद पटकावण्याची राधाकृष्णन यांची संधी केवळ नामसाधर्म्यामुळे हुकली होती. त्यांच्या नावाची चर्चा असताना तमिळनाडूचेच पोन राधाकृष्णन केंद्रीय मंत्री बनले. मात्र, त्यानंतर विविध पदे आणि झारखंड तसेच महाराष्ट्राचे राज्यपालपद भूषवणारे राधाकृष्णन यांनी थेट उपराष्ट्रपती पदावर झेप घेतली आहे. या निवडणूकीत इंडिच्या १५ सदस्यांनी राधाकृष्णन यांना मतदान केल्याचे स्पष्ट होते. म्हणजे विरोधी सदस्यांनाही राधाकृष्णन हेच अधिक उजवे उमेदवार आहेत हे पटले होते, असे दिसते.**

## हुकलेले मंत्रीपद ते थेट उपराष्ट्रपती

गौरव
प्रतिनिधी

सत्ताधारी आघाडीच्या सर्व घटक पक्षांनी ठरल्यानुसार उपराष्ट्रपती निवडणुकीत रालोआचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांनाच आपली मते दिली. विरोधकांच्या 'इंडी' आघाडीने मात्र सत्ताधारी आघाडीला हरविण्याचा आव आणला होता. प्रत्यक्ष मतमोजणीत या आघाडीला आपली एकता कायम राखता आली नाही, हे सिद्ध झाले. या आघाडीतील १५ सदस्यांनी सत्ताधारी पक्षाला मतदान केल्याचे स्पष्ट होते. म्हणजे विरोधी सदस्यांनाही राधाकृष्णन हेच अधिक उजवे उमेदवार आहेत हे पटले होते, असे दिसते. विरोधकांनी हात दाखवून अवलक्षण करून घेतल्याने 'इंडी' आघाडीतील बिघाडी चव्हाट्यावर आली.

विरोधी पक्षांच्या 'इंडी' आघाडीने निव्वळ विरोधासाठी म्हणून बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवार म्हणून उभे केले होते. वास्तविक सर्व पक्षांनी मिळून एकमताने उमेदवार उभा केला असता, तर ते अधिक योग्य झाले असते. उपराष्ट्रपतिपदासारख्या निवडणुकीत राजकीय कुरघोडी केली जात नाही. कारण, प्रत्येक पक्षाकडे किती मते आहेत, ते जाहीर असते. त्यामुळे 'इंडी' आघाडीने या निवडणुकीत आपला उमेदवार उभा केला नसता, तर त्या आघाडीची झाकली मूठ सव्वा लाखाची राहिली असती. पण, नको तिथे कुरघोडीचे राजकारण करण्याचा करंटेपणा या आघाडीच्याच अंगाशी आला आणि ही आघाडी एकसंध नाही, हेच यानिमित्ताने दिसून आले.

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचा सहसा इतका गाजावाजा होत नाही; पण या निवडणुकीने मात्र वेगळेच वातावरण तयार केले होते. खरी लढत दोन उमेदवारांमध्ये नव्हतीच. त्यांचा प्रचारही अगदी साध्या पद्धतीने सुरू होता. इंडिया आघाडीचे उमेदवार व सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांनी खासदारांना त्यांच्यासाठी विचारपूर्वक मतदान करण्याचे आवाहन केले; तर राधाकृष्णन यांनी राष्ट्रवादी विचारांचे समर्थन केले. या निकालाबाबत शंका नसली तरी सत्ताधारी आघाडीच्या खासदारांकडून 'क्रॉस व्होटिंग' होणार का, असा मुख्य प्रश्न होता. राधाकृष्णन यांच्या विजयामुळे भाजपाने ओबीसी समाजात आपले स्थान अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला. जगदीप धनखड यांच्या राजीनाम्यानंतर आणि माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांच्याशी निर्माण झालेल्या तणावाच्या अनुभवातून भाजपाने यावेळी शिकवण घेतली. हे दोघेही नेते मूळ भाजपाबाहेरील होते. त्यामुळे दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी यावेळी भाजपाच्या मुळाशी जोडलेला नेता निवडण्याचे ठरवले आणि राधाकृष्णन या निकषांमध्ये योग्य बसले. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत अपेक्षेप्रमाणेच रालोआचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन विजयी झाले.

तमिळनाडूतील तिरूपूर येथे २० ऑक्टोबर १९५७ मध्ये जन्मलेले राधाकृष्णन यांनी वयाच्या १६व्या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत प्रवेश केला आणि पुढच्याच वर्षी, १९७४ मध्ये भारतीय जनसंघाचे ते राज्य कार्यकारी समितीचे सदस्य बनले. त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात विद्यार्थी चळवळीतून केली होती. पुढे त्यांनी भाजपाच्या तामिळनाडूच्या प्रदेशाध्यक्षाची जबाबदारीदेखील सांभाळली आहे. त्यावेळेस त्यांनी राज्यात ९३ दिवसांची १९,००० किलोमीटरची यात्रा केली होती. यानंतर देखील त्यांनी धरणं आणि नद्यांच्या मुद्द्यांवर २८० किलोमीटर आणि २३० किलोमीटरच्या दोन यात्रा काढल्या होत्या. यात त्यांनी मुख्यत: नदी जोडो, दहशतवाद, समान नागरी कायदा, अस्पृश्यता आणि व्यसनाचे दुष्परिणाम यासारख्या मुद्द्यांवर लक्ष वेधलं होतं. दक्षिण भारतात भाजपाचा विस्तार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तामिळनाडूच्या कोईंबतूर लोकसभा मतदारसंघातून ते दोन वेळा खासदार म्हणून निवडून गेले आहेत. १९९८ मध्ये वाजपेयी सरकारमध्ये केंद्रीय मंत्रीपद पटकावण्याची राधाकृष्णन यांची संधी केवळ नामसाधर्म्यामुळे हुकली होती. त्यांच्या नावाची चर्चा असताना तमिळनाडूचेच पोन राधाकृष्णन केंद्रीय मंत्री बनले. तरी त्यांनी आपली निष्ठा अढळ ठेवली. त्यानंतर २००४, २०१४ आणि २०१९ मध्ये त्यांना लागोपाठ तीन वेळा कोईंबतूर मतदारसंघातून पराभवाचा सामना करावा लागला होता. २००४ मध्ये सी पी राधाकृष्णन यांनी संसदीय शिष्टमंडळाचा भाग म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत भाषण केलं. तैवानला जाणार्या पहिल्या संसदीय शिष्टमंडळाचे ते सदस्यदेखील होते. पुढे फेब्रुवारी २०२३ मध्ये त्यांची नियुक्ती झारखंडच्या राज्यपालपदी झाली होती. त्यानंतर जुलै २०२४ मध्ये ते महाराष्ट्राचे राज्यपाल झाले. त्यानंतर त्यांचा राजकीया आलेख चढताच राहिला. पक्षांतर्गत वर्तुळात 'पचई तमिळन' (खरा तमिळ) म्हणून ओळखले जाणारे राधाकृष्णन राज्यातील आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या प्रबळ मानल्या जाणार्या कोंगु वेल्लार गौंडुर समुदायातील आहेत. सध्या देशाच्या राजकारणात ओबीसी नेत्यांचे महत्त्व वाढले आहे. भाजपा आणि विरोधी पक्ष त्यांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जातीय जनगणनेची गरज अधोरेखित केली आहे. या पार्श्वभूमीवर भाजपाने राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतिपदी निवड करून, राजकीय संदेश दिला आहे.

या निवडणुकीच्या निकालाबाबत खरं तर कोणताच 'सस्पेन्स' असा नव्हता. 'सस्पेन्स' असलाच तर तो लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे या निवडणुकीत मतदानासाठी येतील की नाही, याबद्दल होता. कारण, या निवडणुकीच्या आदल्या दिवसापर्यंत राहुल गांधी हे भारतात नव्हते. ते मलेशियात सुटी घालवीत होते. त्यामुळे विरोधकांचा नेताच या निवडणुकीत सहभागी होणार की नाही, याबद्दलच शंका निर्माण झाली होती. ते निवडणुकीच्या आदल्या रात्री उशिरा भारतात परतले. पण, या 'पार्ट टाईम' नेत्याने आपल्या आघाडीची मते वाढावीत, यासाठी कसलेही प्रयत्न केले नाहीत. रालोआ आणि 'इंडी' या दोन प्रमुख आघाड्यांमध्ये सहभागी नसलेलेही काही पक्ष आहेत. त्यात बिजू जनता दल, अकाली दल, बीआरएस, वायएसआर काँग्रेस यांसारखे काही पक्ष आहेत. ते बहुतांश वेळा सत्ताधारी पक्षाला अनुकूल मतदान करतात. तरीही त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करणे हे विरोधकांचे कर्तव्य होते. यापैकी वायएसआर काँग्रेसने रालोआ आघाडीला पाठिंबा जाहीर केला होता. बीजेडी, अकाली दल आणि बीआरएस या पक्षांनी आपण निवडणुकीत तटस्थ भूमिका घेऊ, असे जाहीर केले. त्यामुळेही विरोधकांच्या 'इंडी' आघाडीची आशा पूर्णच मंदावली होती. कारण, 'इंडी' आघाडीतील काही खासदारांनी सत्ताधारी पक्षाच्या उमेदवाराला मते दिल्याशिवाय राधाकृष्णन यांची मते वाढणे शय नव्हते. ज्या विरोधी पक्षांच्या खासदारांनी सत्ताधारी पक्षाच्या उमेदवाराला मते दिली, त्यात उबाठा सेना, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांच्या समावेशाच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. कदाचित या पक्षाच्या खासदारांनाही आपले भवितव्य काय आहे, ते कळून चुकले असावे. कारण, येती चार वर्षेच नव्हे, तर त्यापुढील पाच वर्षेही आपल्याला विरोधी बाकांवर बसावे लागणार आहे, याची जाणीव त्यांना झाली असावी. म्हणून आडवळणाने काही विरोधी खासदार सत्ताधारी आघाडीला मदत करताना दिसतात.

प्रत्यक्ष मतमोजणी झाली, तेव्हा सत्ताधारी रालोआ आघाडीची सर्वच्या सर्व मते राधाकृष्णन यांना मिळाल्याचे दिसून आले. मात्र, विरोधकांच्या 'इंडी' आघाडीतील काही पक्षांच्या सदस्यांनी क्रॉस व्होटिंग केल्याचे दिसून आले. तसेच, चक्क १४ मते अपात्र जाहीर करण्यात आली. अनुभवी खासदारांकडून इतकी बेपर्वाई अपेक्षित नाही. अर्थात, ही बेपर्वाई हेतूत: करण्यात आली होती का, हादेखील चर्चेचा विषय. सर्व पक्षांनी आपापल्या जाहीर भूमिकांनुसार मतदान केले असते, तर राधाकृष्णन यांना ४२७, तर रेड्डी यांना ३१५ मते मिळणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात राधाकृष्णन यांना ४५२, तर रेड्डी यांना ३०० मते मिळाली. यावरून विरोधकांमधील कथित एकता किती तकलादू आहे, हे सिद्ध झाले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून घडलेले राधाकृष्णन हे भाजपाचे ज्येष्ठ नेते आहेत. तमिळनाडूच्या कोईम्बतूर लोकसभा मतदारसंघातून ते दोनदा खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. राधाकृष्णन यांचे भाजपासह विरोधी पक्षातील नेत्यांबरोबरही चांगले संबंध आहेत. उपराष्ट्रपतिपदी निवड झाल्यानंतर सी. पी. राधाकृष्णन यांच्यासमोर अनेक आव्हाने असतील. प्रोटोकॉलनुसार त्यांच्याकडे देशातील दुसर्या क्रमांकाचे पद असले तरी त्यांची खरी कसोटी राज्यसभेचे कामकाज चालवण्याची असेल. सभापती म्हणून त्यांना सरकारसह विरोधकांची बाजूही ऐकून घ्यावी लागेल. भाजपाने राधाकृष्णन यांची निवड का केली हे स्पष्ट असले तरी विरोधकांनी न्यायमूर्ती बी. सुधर्शन रेड्डी यांना उमेदवारी का दिली हे राजकीयदृष्ट्या तितकेसे स्पष्ट झालेले नाही. तमिळनाडूचे द्रमुकचे नेते तिरुची शिवा (जे स्वत: ओबीसी आहेत) यांचे नावही उपराष्ट्रपतिपदाच्या शर्यतीत होते. त्यांना उमेदवारी मिळाली असती, तर पुढील वर्षी तमिळनाडूत होणार्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मोठा फायदा झाला असता. दरम्यान, सी. पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतिपदी निवड झाल्यानंतर ते राज्यसभेचे कामकाज अतिशय प्रभावीपणे चालवतील यात शंकाच नाही.

लक्ष्यवेध
पार्थ कपोले

## 'जेन झी' आणि नेपाळचे बदलते राजकारण

काठमांडूच्या रस्त्यांवर उसळलेल्या विद्यार्थी आंदोलनाला 'जेन झी' अर्थात नव्या पिढीचे आंदोलन म्हटले जात आहे. हे आंदोलन म्हणजे केवळ एका कायद्याविरोधातील प्रतिक्रिया नाही, तर ते दक्षिण आशियातील सध्याच्या राजकीय अस्थिरतेचे आणि जागतिक पातळीवरील सामरिक बदलांचे प्रतिबिंब आहे. नेपाळ सरकारने अचानक फेसबुक, ट्विटर, युट्यूबसह २६ जागतिक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसवर बंदी घातल्याने हजारो विद्यार्थी संतप्त झाले. हे आंदोलन केवळ डिजिटल स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी नव्हते, तर त्यामध्ये चीनचा वाढता प्रभाव, भारताशी असलेले ऐतिहासिक नाते आणि आशियातील बदलते समीकरणे या सर्वांचा सूर होता.

नेपाळमध्ये के. पी. शर्मा ओली यांच्या नेतृत्वाखालील सरकारने, सोशल मीडिया कंपन्यांवर बंदी घालण्यामागे तांत्रिक कारण पुढे केले. तथाकथित परवान्याशिवाय काम करणार्या या कंपन्यांना रोखण्याची गरज आहे, असा दावाही करण्यात आला. मात्र, प्रत्यक्षात या निर्णयाने अभिव्यक्ती स्वातंत्र्यालाच गळफास लावण्याचे कारस्थान रचले गेले होते. यामुळेच विद्यार्थीवर्ग रस्त्यावर उतरला. पोलिसांनी लाठीचार्ज, अश्रुधूर, रबर बुलेट्स यांचा वापर करूनही, आंदोलकांचा उत्साह कमी झाला नाही. काही विद्यार्थ्यांचा मृत्यू, शेकडो जखमी आणि पत्रकारांवर हल्ला यांमुळे नेपाळमधील सरकारविरोधी भावना अधिकच तीव्र झाली. त्यातून आंदोलन तीव्र झाले. त्यातून नेपाळची संसद जाळली गेली. अनेक नेते अज्ञातवासात गेले.

या बंदीमध्ये एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, चिनी डिजिटल प्लॅटफॉर्मवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. वीचॅट, टिकटॉक यांसारख्या ॲप्सना मोकळीक दिली गेल्याने, ओली सरकार चीनच्या दबावाखाली काम करत असल्याची खात्री आंदोलकांना पटली. गेल्या काही वर्षांत चीन-नेपाळ संबंध झपाट्याने वाढले आहेत. चीनच्या बेल्ट अ‍ॅण्ड रोड इनिशिएटिव्ह अंतर्गत नेपाळमध्ये पायाभूत सुविधा प्रकल्प, ऊर्जानिर्मिती प्रकल्प, रस्ते आणि रेल्वे यांसाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करण्यात आली आहे. या गुंतवणुकीमुळे नेपाळच्या अर्थव्यवस्थेला थोडा आधार मिळाला असला, तरी त्याची किंमत आहे चीनचा राजकीय व रणनीतिक हस्तक्षेप. नेपाळ-चीन संबंधांचा प्रभाव थेट भारतावर पडतो. भारत-नेपाळ नाते हे केवळ दोन देशांपुरते मर्यादित नाही, तर ते धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक बंधनांनी जोडलेले आहे. उघडी सीमा, रोजगार-व्यवसायातील सहकार्य यामुळे दोन्ही देशांचे जीवनही एकमेकांत गुंफलेले आहे. पण, २०१५ सालामधील नाकेबंदी, नंतर सीमावादावरून तयार झालेला नवा नेपाळी नकाशा, या सर्वांमुळे भारत-नेपाळ संबंधांमध्ये दुरावा आला होता. याचा फायदा घेत चीनने, ओली सरकारवर प्रभाव वाढवला होता. आज सोशल मीडिया बंदी हे त्याच प्रभावाचे उदाहरण ठरावे. नेपाळ डिजिटल क्षेत्रात चीनच्या अधिपत्याला मान्यता देत असल्याचे चित्र उभे राहिले आहे.

दक्षिण आशियाचा व्यापक पट पाहिला, तर नेपाळमधील ही घटना एकाकी नाही. श्रीलंका, बांगलादेश, पाकिस्तान या सर्व देशांमध्ये गेल्या काही वर्षांत राजकीय अस्थिरता आणि लोकशाहीविरोधी निर्णयांविरोधात, तरुणाईने रस्त्यावर येऊन सत्तेला आव्हान दिले आहे.

**सध्याच्या तरुणाईसाठी सोशल मिडीया हा जिव्हाळ्याचा विषय. मात्र, हे सोशल मिडीया प्लॅटफॉर्म नेपाळमधील आंदोलनाचा विषय झाले आहेत. सरकारने चीन वगळता अन्य देशातील सोशल मिडीया प्लॅटफॉर्मवर बंदी घातल्याने, नेपाळमधील तरुणाईने रस्त्यावर उतरुन सरकारविरोधात आंदोलन करत सरकार उलथवले. या घटनेचे अनेक कांगोरे आहेत. त्याचा घेतलेला आढावा...**

श्रीलंकेत गोटाबाया राजपक्षे यांना पदत्याग करावा लागला, बांगलादेशमध्ये शेख हसीना यांना विद्यार्थ्यांच्या दबावामुळे मोठी अडचण निर्माण झाली, पाकिस्तानात इमरान खान यांचे सरकारही कोसळले. या सर्व घटनांमध्ये एक समानता आहे; भ्रष्टाचार, पारदर्शकतेचा अभाव, बेरोजगारी आणि चीनसारख्या परदेशी शक्तींचा हस्तक्षेप. नेपाळमधील आंदोलन या मालिकेतीलच एक नवीन अध्याय आहे. जागतिक पातळीवर या आंदोलनाचे परिणाम अधिक दूरगामी असू शकतात. अमेरिका इंडो-पॅसिफिक धोरणांतर्गत, चीनच्या विस्ताराला रोखण्याचा प्रयत्न करत आहे. जपान, ऑस्ट्रेलिया आणि भारतासोबत मिळून अमेरिका 'क्वाड'सारख्या मंचांचा वापर करते. अशावेळी नेपाळसारख्या छोट्या देशात चीनने मिळवलेली डिजिटल व राजकीय पकड, अमेरिकेला आणि भारताला चिंताजनक वाटते. सोशल मीडिया बंदी ही केवळ तांत्रिक बाब नसून, पश्चिमी प्रभाव रोखून चीनला प्राधान्य देण्याची चळवळ आहे. त्यामुळे हे आंदोलन चर्चेचा विषय बनले आहे. विद्यार्थ्यांनी या आंदोलनात दाखवलेली रणनीती उल्लेखनीय आहे. बंदी घातलेल्या फेसबुक व ट्विटरऐवजी त्यांनी पर्यायी चॅनेल्सचा वापर केला. काहींनी टिकटॉकवरून माहिती पसरवली, तर काहींनी व्हीपीएनच्या मदतीने बंदी मोडून काढली. यावरून हे स्पष्ट होते की, तरुणाई डिजिटलदृष्ट्या सजग आहे आणि सरकारच्या मर्यादा ओलांडून संवाद साधू शकते. त्यामुळे हे आंदोलन केवळ रस्त्यावरचे नव्हे, तर डिजिटल पातळीवरही झालेले आहे. प्रथमच समाज माध्यमांवरील बंदीमुळे एका देशात अराजकता पसरली असून, लोकनियुक्त पंतप्रधानाला देश सोडून परागंदा व्हावे लागले आहे. नेपाळचे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना काठमांडूतील प्रचंड हिंसक आंदोलनामुळे अखेरीस सत्ताच नव्हे, तर देशही सोडून जाण्याची वेळ आली. नेपाळमध्ये गेले काही दिवस चाललेल्या आंदोलनाने सोमवारी एकदम उग्र स्वरूप धारण केले. राजधानी काठमांडूचे सर्व रस्ते आंदोलनकर्त्यांनी भरून गेले. या जमावाने ठिकठिकाणी आगी लावल्या आणि सरकारी कार्यालयांची नासधूस करण्यास प्रारंभ केला. जमावाला रोखण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात, १९ आंदोलनकर्त्यांना प्राण गमवावे लागले. पण, यामुळे आंदोनकर्त्यांमध्ये अधिकच संताप निर्माण झाला आणि मंगळवारी काठमांडूच नव्हे, तर अन्य शहरांमध्येही आंदोलनाचे हे लोण पसरले. या जमावाचे लक्ष्य पंतप्रधान के. पी. शर्मा ओली आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकारी होते. या जमावापासून वाचण्यासाठी पळून जाणार्या अर्थमंत्र्यांना, जमावाने पकडून बेदम मारहाण केली. माजी पंतप्रधान व वयस्क नेते शेरबहादुर देऊबा, हेही प्राणघातक हल्ल्यातून केवळ नशिबाने बचावले. जमावाचा राग पंतप्रधान शर्मा ओली यांच्यावर सर्वाधिक होता. ओली यांचे घर तर जमावाने पेटवून दिलेच पण, दुपारपर्यंत राष्ट्रपतींचे निवासस्थानही आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. नेपाळी संसदेच्या इमारतीलाही आग लावण्यात आली. अनेक मंत्र्यांच्या घरांचीही नासधूस करण्यात आली आहे. झुंडशाहीला चेहरा नसतो, पण त्यात काहीजणांचा हकनाक बळी जातो. लोकांच्या उद्रेकात माजी पंतप्रधान खानाल यांच्या पत्नीला जिवंत जाळण्यात आले. भारत या आंदोलनाकडे अतिशय काळजीपूर्वक पाहत आहे. नेपाळची लोकशाही टिकून राहणे, भारताच्या हिताचे आहे. जर नेपाळ चीनच्या प्रभावाखाली गेला, तर हिमालयीन सीमारेषा भारतासाठी अधिक संवेदनशील होईल. चीनला नेपाळमार्गे भारतावर दबाव आणण्याची संधी मिळेल. सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक सहकार्य वाढवून, नेपाळला चीनच्या जाळ्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. भारताचे धोरणही तसेच आहे.





# स्वच्छ पाणी, शौचालयाचे स्वप्न अधुरेच

**जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल आपल्याला आठवण करून देतो की निसर्गातून मिळणारे पाणी आणि स्वच्छता सेवा केवळ विकासाचा भाग नाहीत, तर जीवन आणि सन्मानाचा मूलभूत अधिकार आहेत. अब्जावधी लोक अजूनही या सुविधांपासून वंचित आहेत. याबाबत आपण तातडीने पावले न उचलल्यास २०३० पर्यंत प्रत्येक व्यक्तीला सुरक्षित पाणी आणि शौचालय पुरवण्याचे स्वप्न अपूर्ण राहिल.**

पर्यावरण

**मिलिंद बेंडाळे**

वेगाने बदलणाऱ्या हवामानात, स्वच्छ पाणी हे एक मोठे आव्हान आणि एक प्रमुख उपाय दोन्ही आहे. संशोधक आता पाण्याकडे केवळ एक भौतिक वस्तू म्हणून नव्हे, तर आपल्या शहरांना आणि समुदायांना आकार देणाऱ्या सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय आणि आर्थिक शक्तींशी जोडलेली एक प्रणाली म्हणून पाहत आहेत. शहरांच्या जलद वाढीमुळे पाण्याचा प्रवाह अधिक गुंतागुंतीचा झाला आहे. कधी पाईप आणि गटारांमधून तर कधी भूजल आणि नद्यांमधून पाणी आपल्या दैनंदिन जीवनाशी खोलवर जोडलेले आहे; परंतु या गुंतागुंतीसह वाढत्या असुरक्षितता आणि धोकेदेखील येतात.

जगभरातील शहरे जसे की फ्लिंट, साओ पाउलो, केपटाऊन, मुंबई, दिल्ली, चेन्नई आणि बंगळुरू विविध स्वरूपात गंभीर पाण्याच्या संकटांना तोंड देत आहेत. या संकटांमध्ये पाण्याची कमतरता, प्रदूषण, तुटलेली व्यवस्था, कमकुवत प्रशासन आदी मुद्यांचा समावेश आहे. हवामान बदलामुळे या सर्वांमध्ये वाढ झाली आहे. समुद्राची वाढती पातळी, हिमनद्या वितळणे आणि बदलत्या पावसाच्या पद्धती दर्शवतात की पाणी आपल्या पर्यावरणीय आव्हानांमध्ये केंद्रस्थानी आहे; परंतु पाणी आपल्या उपायांचा पायादेखील असू शकते. जगभरातील अब्जावधी लोक अजूनही आवश्यक पाणी, स्वच्छता आणि स्वच्छता सेवांशिवाय जगत असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेच्या 'घरगुती पेयजल आणि स्वच्छता' या अहवालातून दिसून आले आहे. त्यामुळे त्यांना आजार आणि खोल सामाजिक बहिष्काराचा धोका निर्माण झाला आहे. युनिसेफच्या संयुक्त देखरेख कार्यक्रमा (जेएमपी) द्वारे प्रकाशित केलेला हा अहवाल २००० ते २०२४ पर्यंत घरगुती पाणीपुरवठा आणि स्वच्छता सेवांमधील प्रगतीवर लक्ष केंद्रित करतो. त्यात विषमतेवर विशेष लक्ष केंद्रित केले गेले आहे. शाश्वत विकास ध्येयांतर्गत सर्वांसाठी सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि स्वच्छता सेवांची उपलब्धता सुनिश्चित करणे हे या अहवालाचे उद्दिष्ट होते. याच सुमारास ३५४ दशलक्ष लोक उघड्यावर शौचास जातात. उघड्यावर शौचास बसणाऱ्या लोकांची संख्या ४२९ दशलक्षांनी कमी होऊन ३५४ दशलक्ष झाली आहे. ६४ देशांनी मूलभूत स्वच्छतेचा सार्वत्रिक वापर साध्य केला आहे. १.७ अब्ज लोक घरी मूलभूत स्वच्छता सेवांपासून वंचित आहेत. त्यात ६११ दशलक्ष लोकांकडे अशी कोणतीही सुविधा नाही. १.६ अब्ज लोकांना मूलभूत स्वच्छता सेवा मिळाल्या. ग्रामीण भागात व्याप्ती ५२ टक्क्यांवरून ७१ टक्क्यांपर्यंत वाढली आणि शहरी भागात ८६ टक्क्यांवर स्थिर झाली. कमी उत्पन्न असलेल्या देशांमधील लोक, असुरक्षित परिस्थिती, ग्रामीण समुदाय, मुले आणि अल्पसंख्यक वांशिक आणि आदिवासी गटांना सर्वांत जास्त असमानतेचा सामना करावा लागतो. कमी विकसित देशांमधील लोक पिण्याचे पाणी आणि स्वच्छता या मूलभूत सेवांपासून वंचित राहण्याची शक्यता दुप्पट आहे तर मूलभूत स्वच्छता सेवांपासून वंचित राहण्याची शक्यता तिप्पट आहे. यामुळे नागरी वस्त्या, शहरे, निमशहरी परिसर आदी भागांमधील पर्यावरण धोक्यात येत आहे. असुरक्षित परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची व्याप्ती इतर देशांपेक्षा ३८ टक्के कमी आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांसाठी सुधारणा झाल्या आहेत; परंतु ते जूनही मागे आहेत.

२०१५ ते २०२४ दरम्यान सुरक्षितपणे व्यवस्थापित केलेल्या पिण्याच्या पाण्याची व्याप्ती ५० टक्क्यांवरून ६० टक्क्यांपर्यंत वाढली आणि मूलभूत स्वच्छता व्याप्ती ५२ टक्क्यांवरून ७१ टक्क्यांपर्यंत वाढली. याउलट, शहरी भागात पिण्याचे पाणी आणि स्वच्छता व्याप्ती स्थिर राहिली आहे. ७० देशांमध्ये किशोरवयीन मुली आणि महिलांच्या मासिक पाळीच्या आरोग्याविषयीचा डेटा उपलब्ध आहे. कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये पुन्हा वापरता येणाऱ्या मासिक पाळीच्या उत्पादनांचा जास्त वापर दिसून आला. पुरेशा साहित्याचा अभाव, खाजगी जागा आणि आरोग्य साहाय्य उपलब्ध नसणे या प्रमुख समस्या आहेत. बहुतेक देशांमध्ये उपलब्ध असलेल्या डेटानुसार, महिला आणि मुली प्रामुख्याने पाणी संकलनासाठी जबाबदार असतात. उप-सहारा आफ्रिका आणि मध्य आणि दक्षिण आशियामध्ये अनेकजण दिवसातून ३० मिनिटांपेक्षा जास्त वेळ पाणी गोळा करण्यात घालवतात.

किशोरवयीन मुली (१५-१९ वर्षे) प्रौढ महिलांपेक्षा मासिक पाळीच्या वेळी शाळा, काम आणि सामाजिक उपक्रमांना उपस्थित राहण्याची शक्यता कमी असते. कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये उघड्यावर शौचास जाण्याचे प्रमाण जागतिक सरासरीपेक्षा चारपट जास्त आहे. मूलभूत सेवांमध्ये प्रवेश सुधारण्यासाठी या देशांना ७ ते १८ पट वेगाने प्रगती करावी लागेल.ग्रामीण-शहरी, श्रीमंत-गरीब, वांशिक गट आणि अपंगत्वाच्या बाबतीत खोल असमानता आहे. कमी उत्पन्न असलेल्या देशांमधील लोक, असुरक्षित संदर्भ, ग्रामीण समुदाय, मुले आणि अल्पसंख्यक वांशिक आणि आदिवासी गटांना सर्वांत जास्त असमानतेचा सामना करावा लागतो. कमी विकसित देशांमधील लोकांमध्ये इतर देशांच्या तुलनेत पिण्याचे पाणी आणि स्वच्छता सेवांचा अभाव असण्याची शक्यता दुप्पट आहे तर मूलभूत स्वच्छता सेवांचा अभाव असण्याची शक्यता तिप्पट आहे. या अहवालात डॉ. रुडिगर क्रेच यांनी म्हटले आहे की पाणी, शौचालये आणि स्वच्छता ही विलासिता नसून मूलभूत मानवी हक्क आहेत. आपल्याला सर्वांत असुरक्षित समुदायांपर्यंत त्वरित पोहोचावे लागेल.

मुलांना सुरक्षित पाणी आणि स्वच्छता उपलब्ध नसते तेव्हा त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि भविष्य धोक्यात येते. विशेषतः मुलींना पाणी आणण्यात आणि मासिक पाळीत अधिक अडचणी येतात. हीच गती राहिली तर प्रत्येक मुलासाठी सुरक्षित पाणी आणि शौचालयांचे आश्वासन पूर्ण होणार नाही. जागतिक लोकसंख्येच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोकांसाठी आता विश्वसनीय 'वॉश' डेटा उपलब्ध आहे.

शाश्वत विकास उद्दिष्टांच्या शेवटच्या पाच वर्षांच्या जवळ येत असताना, २०३० मध्ये उघड्यावर शौचास जाणे बंद करण्याचे आणि मूलभूत पाणी, स्वच्छता आणि स्वच्छता सेवांना सार्वत्रिक प्रवेश मिळवण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रगतीला वेग देणे आवश्यक आहे. अहवालात दिसून आले आहे की २००० ते २०२४ दरम्यान आणखी एक अब्ज लोकांना 'वॉश' सेवांचा लाभ मिळणार असला, तरी प्रगती असमान राहिली आहे. सर्वांत दुर्लक्षित समुदायांसाठी कृती जलद करणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर प्रगती झाली असली, तरी २०३० पर्यंत सार्वत्रिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रगतीचा वेग वाढवणे आवश्यक आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि 'युनिसेफ'च्या संयुक्त अहवालात भारताला एक प्रमुख उदाहरण म्हणून सादर केले आहे. भारताने सुरक्षित पिण्याच्या पाण्याच्या सेवांमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे, शहरी भागातील पाण्याच्या गुणवत्तेवरील डेटा समाविष्ट केल्याने सुरक्षित व्यवस्थापनाचे अंदाज शक्य झाले आहेत. असे असले तरी ग्रामीण भागात शाश्वत व्यवस्थापन आणि गुणवत्तेची आव्हाने अजूनही आहेत.

भारतात मूलभूत स्वच्छता सेवांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. २०१९ मध्ये भारताचा पहिल्यांदाच या निर्देशकामध्ये समावेश करण्यात आला. त्यामुळे जागतिक व्याप्तीमध्ये मोठी वाढ झाली, तरीही ग्रामीण भागात आणि गरीब समुदायांमध्ये हात धुण्याच्या सुविधा अजूनही दुर्मिळ आहेत. भारतात शहरी विरुद्ध ग्रामीण, श्रीमंत विरुद्ध गरीब आणि अपंगत्व यांच्यानुसार 'वॉश' सेवांमध्ये लक्षणीय फरक आहे.

विशेषतः महिला आणि मुली पाणी आणण्यात जास्त वेळ घालवतात. त्यामुळे शिक्षण आणि आरोग्यावर परिणाम होतो. भारताने पिण्याच्या सुरक्षित पाण्याच्या सेवांमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे. शहरी भागातील पाण्याच्या गुणवत्तेवरील डेटा समाविष्ट केल्याने सुरक्षित व्यवस्थापनाचे अंदाज शक्य झाले आहेत. तथापि, ग्रामीण भागात शाश्वत व्यवस्थापन आणि गुणवत्तेचे आव्हान अजूनही कायम आहे. उघड्यावर शौचास जाणे लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. ग्रामीण भागातही सुधारणा झाल्या आहेत; परंतु सांडपाणी प्रक्रियेसारख्या सुविधा अजूनही मर्यादित आहे.२०१९ मध्ये पहिल्यांदाच भारताचा या निर्देशकामध्ये समावेश करण्यात आला. त्यात जागतिक व्याप्तीमध्ये मोठी वाढ झाली, तरी ग्रामीण भागात आणि गरीब समुदायांमध्ये हात धुण्याच्या सुविधा अजूनही दुर्मिळ आहेत. त्याचा परिणाम पर्यावरण आणि आरोग्यावर होत आहे. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

सुखात्म

**डॉ. अविनाश मोहरील**

त्या दिवशी माझ्या मुलाने युट्युबवर फार प्रसिद्ध असलेला एक टेलिव्हिजन शो दाखविला. तो बरेच वेळा संबंधित शो बघत असतो. नेमका हा काय बघतो, याबद्दल जाणून घेण्यासाठी त्याच्या सोबत जरा वेळ बसलो. अमेरिकेमध्ये अतिशय प्रसिद्ध असलेला 'अमेरिकाज गॉट टॅलेंट' नावाचा तो कार्यक्रम. भारतातही आता अशा प्रकारचे टी.व्ही. शो सुरू झाले आहेत; ज्यामध्ये विविध क्षेत्रामध्ये तरबेज असलेले लोक आपली कला सादर तरतात व नंतर परीक्षक आणि जनतेकडून वोट मागून या सर्व लोकांमधून विजेता घोषित केला जातो. त्या शोच्या अंतिम राऊंडमध्ये दोन मुलींची निवड झाली होती.

एक होती १३ वर्षांची डार्सी लेन, जी बोलक्या बाहुल्यांसोबत अप्रतिम सादरीकरण करीत होती आणि दुसरी ९ वर्षांची अँजेलिका हेल, जी गायन करीत होती. अँजेलिकाचे सादरीकरण जेव्हा सुरू होते, तेव्हा त्या सबंध सभागृहातील प्रत्येक जण व कदाचित तो शो अमेरिकेतच नव्हे, तर जगभर बघणारा प्रत्येक जण थरारून गेला होता. इतक्या छोट्या वयाच्या मुलीकडून एक इंग्रजी गाणे अतिशय सुरात आणि सर्व लकबींसह ऐकताना प्रत्येकाला आश्चर्य आणि कौतुक अशा संमिश्र भावनांचा अनुभव येत होता. ते सर्व बघत असताना माझे डोळे भरून येण्यासाठी कारणीभूत ठरलेले एक चित्र जे मला सहजच बघायला मिळाले. त्या मुलीचे सादरीकरण संपल्यावर तेथे उपस्थित सर्वांनी तिला उभे राहून मानवंदना दिली. हॉलिवूडच्या एका प्रख्यात अभिनेत्याने जवळ घेऊन तिचे भरभरून कौतुक केले. त्या चिमुकलीच्या आयुष्यातील तो फारच मोठा प्रसंग होता. कॅमेरा फिरत होता आणि फिरता फिरता तो अचानक त्या चिमुकलीच्या आई-वडिलांच्या चेहऱ्यावर स्थिरावला. आपल्या मुलीचे होणारे कौतुक आणि तिने गाजविलेला पराक्रम बघून त्या दोघांच्याही डोळ्यातून आनंदाश्रू वाहत होते. त्या दोघांना झालेला आनंद खरोखरीच गगनात मावत नव्हता. एकमेकांना घट्ट बिलगून त्यांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली होती. काही क्षणच तो कॅमेरा त्यांच्या चेहऱ्यावर होता, परंतु त्या संपूर्ण कार्यक्रमातील ते एक फारच सुंदर चित्र होते, जे बघून माझेही डोळे भरून आले. कुणीतरी मागे मला म्हणाले होते की, असल्या कार्यक्रमांमध्ये आई- वडिलांनी कधी रडायचे, किती रडायचे वगैरे ठरलेले असते. ठाऊक नाही. परंतु त्या कार्यक्रमात ज्या लहानग्या म्हणजे केवळ नऊ वर्षांच्या त्या मुलीचे जागतिक पातळीवर एवढे कौतुक होताना तिच्या आई- वडिलांच्या डोळ्यात येणारे अश्रू ठरवून आणले असतील, असे मी अजिबात मान्य करायला तयार नाही. कारण आपल्या मुला-मुलींच्या कर्तृत्वाने मनोमन धन्यतेचा अनुभव घेणारे जगातील कोणतेही पालक आपल्या पोटजनाच्या कौतुकाच्या वेळी भावनाविष्काराचे नाटक करू शकतील, ही सुतराम शक्यता नाही. ते तर अतिशय प्रामाणिक आणि सच्चे भावनिक प्रकटीकरण होते. त्यातील सच्चेपणामुळेच ते माझ्याही हृदयापर्यंत पोहचू शकले व नकळत माझेही डोळे पाणावले.

## आनंदाश्रू



आपल्या कर्तृत्वाने आपल्या आई-वडिलांना किती आणि कसा आनंद होऊ शकतो, हे जर मुला-मुलींना त्यांच्या विद्यार्थिदशेमध्येच कळले तर काय धमाल होईल. एक अफलातून स्वप्न सर्वच मुला-मुलींना देण्यासाठी माझ्या मनात तयार झाले. ते स्वप्न म्हणजे आयुष्यात काही होवो अथवा न होवो; किमान एकदा तरी आपल्या जन्मदात्या आईला आणि पित्याला आपला अभिमान वाटावा आणि आपल्या कर्तृत्वाने त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू यावेत, असा क्षण त्यांना जगायला द्यावा. त्यासाठी कितीही कष्ट घ्यावे लागले तरी चालतील, पण आई-वडिलांनी आपल्याला या जगात आणून जे अस्तित्व प्रदान केले, त्याची उतराई होणे तर कुणालाच शक्य नाही; निदान आपल्याबद्दल अभिमान वाटावा असा एक तर क्षण आपल्याला निर्माण करता आला तर तो एक अतिशय सकारात्मक भाग ठरू शकतो. त्यामुळेच जीवनाला खरा अर्थ प्राप्त होत असतो. असा विचार करणारी मुले-मुली आपल्याला घडवावी लागतील. कारण कधी कधी तर आई-वडिलांना अपमानित करण्याचे क्षण जेव्हा त्यांच्या जीवनात त्यांचीच पोरे आणून ठेवतात तेव्हा मात्र या मुलाला किंवा मुलीला जन्म दिल्याबद्दल पश्चात्तापाशिवाय त्यांच्याकडे काही उरत नाही व त्यांना हताश व्हावे लागते.

साधारण तीन वर्षांपूर्वी असाच पश्चातापदग्ध बाप माझ्यासमोर बसून माझ्या कक्षामध्ये जेव्हा लहान मुलासारखा ढसाढसा रडला व त्यावेळी अतिशय असंवेदनशील बनून त्याची मुलगी बाजूने निर्विकारपणे बापाचे रुदन चेहऱ्यावरची रेषही न हलविता बघत होती, तेव्हा मात्र मला त्या बापाचा खरोखरीच कनवाळा आला. कुठल्या तरी एका टवाळखोर मुलावर प्रेम आहे म्हणून घरातून निघून गेलेली ती मुलगी जिचा बाप तिला घरी येण्यासाठी विनवणी करत होता व ती ठामपणे त्याला नकार देत होती. ''मी सज्ञान आहे आणि तुम्ही माझ्यावर जबरदस्ती करू शकत नाही. माझे त्याच्यावर प्रेम आहे आणि मला त्याच्यासोबतच राहायचे आहे. तो सध्या खूप कमावत नसला, तरी तुमच्यापेक्षा जास्त पैसे कमावण्याची त्याच्यात धमक आहे. मी त्याच्याबद्दल विचारले होते तेव्हा तुम्ही मला होकार दिला नाही म्हणून मी त्याच्याच सोबत लग्न केले आणि आता मी त्याच्यासोबतच राहीन. तुम्ही काहीही म्हणाले तरी मी ऐकणार नाही'', या पद्धतीची वाक्ये ती आपल्या जन्म दात्याला माझ्या समक्ष ऐकवित होती. ''झाले गेले विसरून जा आणि घरी ये. मी त्या मुलासोबतच तुझे विधिवत लग्न लावून देतो. यामुळे समाजात आमची पत राहील आणि तुझ्यापाठी असलेल्या दोन्ही बहिणींची लग्ने व्यवस्थित होतील. नाहीतर तुझ्या या अशा पद्धतीच्या लग्नामुळे त्यांची लग्ने कशी होतील, याची मला चिंता वाटते आहे. म्हणून मी तुझ्या हवे तर पाया पडतो, पण घरी चल. आपण सर्वजण बसून ठरवू आणि तुझे पुन्हा लोकांसमक्ष लग्न कसे लावता येईल, याबाबत विचार करू. तू घरी चल. सर, तुम्ही तरी हिला समजावून सांगा,'' अशी विनंती मला करून तो साधारण पन्नाशीचा व्यक्ती पाच वर्षांच्या लहान मुलासारखा रडू लागला. मलाच कसेतरी झाले. त्याच वेळी माझी त्या मुलीकडे नजर गेली. ती अत्यंत बेमुर्वतपणे, कोणतीही खंत किंवा वडिलांची अशाप्रकारे होणारी अवहेलना बघूनही जणू काही 'मला काय त्याचे' या थाटात उभी होती. काही वेळाने मी तिला बाहेर पाठवून दिले. तिला समजावण्याचा मी प्रयत्न करतो, असे बळेबळेच आश्वासन देऊन मी त्या पालकाला पाठवून दिले. मनात मात्र तोच तो विचार सारखा घोळत राहिला. आपल्या वडिलांच्या डोळ्यात दुःखाश्रू बघूनदेखील तिचे मन द्रवले नाही.

आपल्या आई-वडिलांना आणि त्यांच्या आपल्यासाठीच्या मनस्वी भावना समजून घेण्याचे तंत्र मुलांना आत्मसात करण्याची गरज आहे. त्यांच्यामध्ये या संवेदनशीलतेची कमतरता असण्याचे एक कारण म्हणजे त्यांच्या आजूबाजूने संपूर्णपणे व्यावहारिकता बाळगणारे जग बनलेले आहे. त्या व्यावहारिक जगतात अशा प्रकारचे एखादे स्वप्न मुला-मुलींच्या मनात वसविता आले तर! प्रत्येक आई-वडिलांच्या जीवनात किमान एकदा असे अभिमानी आनंदाश्रू वाहतील. त्या प्रत्येक आई-वडिलांसाठी किती भाग्याचा क्षण असेल तो! आपले विद्यार्थी-विद्यार्थिनी हा क्षण आपल्या आई-वडिलांना देतील? कारण त्या क्षणाशिवाय त्यांच्या आई-वडिलांना त्यांच्या मुलाबाळांकडून खरोखरीच काहीही नको असते.

संस्कारांच्या देशा

**रमा गोळवलकर**

## अन्नसंस्कार- ४

# रस विचार

आपण एका अखंड सांस्कृतिक परंपरेचे उत्तराधिकारी आहोत आपल्याला याचा सर्वार्थानं अभिमान वाटायला हवा. त्यासाठी जी काही कारणं आहेत त्यापैकी एक अत्यंत महत्त्वाचं कारण म्हणजे भारतीय दर्शनशास्त्र. भारतीयत्वाला एक भक्कम बैठक देणाऱ्या या शास्त्रशाखेचा विस्तार सर्वव्यापी आहे. त्याच्या एका खांद्यावर आयुर्वेद बसला आहे, तर दुसऱ्यावर सौंदर्यशास्त्र. आयुर्वेदाच्या कडेवर पाकसिद्धांत आहे, तर सौंदर्यशास्त्रानं रससिद्धांताला आपल्या मांडीवर बसवलं आहे. ज्ञानमार्ग असो कीभक्तिमार्ग सर्वांचाच ओढा आहे तो जीवन अधिकाधिक अर्थपूर्ण आणि रसरशीत करण्याकडे.

इथे रसरशीत हा शब्द जाणीवपूर्वक योजण्यात आलेला आहे. इथे रसांनी ओतप्रोत असं आयुष्य अपेक्षित आहे. रसभरीत आयुष्य म्हणजे ज्यात जीवनरसाचं ओथंबलेपण आहे. त्यासाठी कारणीभूत असलेली देवता आहे 'श्रीहरी'! हे श्रीविष्णूंचंच एक नामाभिधान. आपण म्हणताना श्रीहरी म्हणतो पण पूर्ण नाव आहे हविर्हरि = यज्ञात अर्पण केलेली आहुती म्हणजे 'हवि' हरणारा तो 'हविर्हरि'! 'हृ' म्हणजे हरण करणे या मूळ धातूपासून सिद्ध झालेला हा शब्द. 'हरति इति हरिः' हरण करणारा, ओढून घेणारा, ग्रहण करणारा तसंच आहुती स्वीकारणारा या अर्थानं देखील वापरतात. पचनाच्या प्रक्रियेत अन्नातून रस शोषून घेण्यात येतो. ते 'सार-किट्ट-विवेचन' अशी संज्ञा आहे अर्थात ज्यात सार आणि किट्ट वेगवेगळं करून साराच्या स्वीकार करत किट्टाचा त्याग केला जातो. हे कार्य या हरीच्याच आधिपत्याखाली होत असतं. त्या 'हवि'तला अन्नरस वेगळा करून देवतांना पोहचवण्याचं मुख्य काम हरीकडे आहे.

साहजिकच जीवनरसानं ओतप्रोत असाही अर्थाचा एक पैलू या 'हरी'ला आहे. ज्याप्रमाणे हरी देवतांना जीवनरस पुरवतो त्याचप्रमाणे त्यानं आमच्या पोटातल्या अन्नातून जीवनरस काढून आम्हाला पुरवावा आणि पुष्ट करावं. म्हणूनच वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे असं सूत्रं मांडलेलं आहे.

आईच्या गर्भाशयात स्थापन झालेला गर्भ ४८व्या दिवसापासून जीवनरसावर पोसला जाऊ लागतो असं आपला आयुर्वेद सांगतो. तर आधुनिक वैद्यकशास्त्रम्हणतं की साधारण ५ व्या आठवड्यात आईच्या गर्भाशयाशी गर्भनाळ जोडली जाते आणि पोषणाला सुरुवात होते. म्हणजे हा 'हरी' अगदी नाळ जोडल्या जाण्यापासून तर शेवटचा श्वास घेईपर्यंत आपल्याला जीवनरस पुरवत असतो.

अर्थातच पृथ्वीतत्त्वाच्या जड शरीराच्या जडणघडणीत या अन्नरसाची भूमिका अनन्यसाधारण आहे. अन्नपूर्णा ही पाककला आणि पोषण प्रक्रियेचं प्रतीक आहे तर हरी हा पाचन संस्थेचं. विष्णू ही देवता सर्वत्र संतुलन साधणारी असल्यामुळे साहजिकच त्याच्या अधिकारक्षेत्रात संतुलित आहाराचाही समावेश होतोच. जिभेचे चोचले पुरवत विविध प्रकारचं खाणं आपण खातच असतो. त्यात खाद्य म्हणजे चावून गिळण्याचं, पेय म्हणजे पिण्याचं, लेह्य म्हणजे चाटून खाण्याचं, चोष्य म्हणजे रस चोखून चोथा फेकून देण्याचं असं चार प्रकारचं अन्न आपण आयुष्यभर चाखतो. हे झालं अन्नाचं स्वरूप (फॉर्म) पण त्याच अन्नात एकूण सहा प्रकारच्या चवी असतात. कडू, गोड, खारट, तिखट, आंबट आणि तुरट या षड्रसांचा समावेश संतुलित प्रमाणात आपल्या रोजच्या आहारात असायलाचं हवा असं भारतीय आहारशास्त्र सांगतं.

षड्रस चिकित्सा हा एका स्वतंत्र विषयच त्यातून विकसित झाला आहे. योग्य प्रमाणात यांचा अंतर्भाव आपल्या रोजच्या जेवणात करण्यावर भर देण्यात आलेला आहे. यापैकी मधुर रस शरीराला बल आणि ऊर्जा देऊ करतो तर आंबट (आम्ल) चवीचे पदार्थ तोंडाला चव आणणारे आणि पाचन शक्ती वाढवणारे असतात. त्यामुळे मन प्रसन्न राहतं. खारट (लवण) पदार्थ शरीरातल्या तरलतेला संतुलित करतात. तिखट (कटू) पदार्थांनी जाठराग्नी पेटतो म्हणजे भूक लागते.

सोळा भाज्या, सोळा चटण्या, सोळा पक्वान्नांचं भरलेलं ताट महालक्ष्मीच्या नैवेद्यासाठी वाढतात, ते वर्षातून एकदा तरी षड्रस अन्न पोटात जावं म्हणून



पचन सोपं होतं. कडू (तिक्त) पदार्थ रक्ताची शुद्धी करतात आणि पित्तदोषाला शांत करतात. शेवटचा रस आहे तो तुरट. हा रस शरीराच्या आतले आणि बाहेरचे दोन्हीही घाव भरण्यात मदत करतो. रक्तस्राव कमी करण्यात आणि जखमा भरण्यात त्याचा हातखंडा आहे.

कफ, पित्त, वात या तीन दोषांवर आधारित असलेली आपल्या शरीराची प्रकृती कोणत्या रसाच्या सेवनानं स्वस्थ आणि निरोगी राहू शकते याचेही निश्चित असे ठोकताळे आयुर्वेदाचे महर्षी आपल्याला सांगतात. चरक, वाग्भट असोत की शाकंबरी देवी प्रसन्न करून घेणारी विदर्भकन्या लोपामुद्रा असो या सगळ्या ऋषी आणि ऋषिकांनी आपलं ज्ञानभांडार आपल्यासाठी खुलं केलेलं आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कशासोबत काय खाऊ नये याची एक भलीमोठी जंत्रीच ही विद्वान मंडळी आपल्याला देतात. उदाहरणार्थ कारल्याची भाजी आणि दही एकाच जेवणात एकत्र किंवा वेगवेगळे खाऊ नये. उडीदाची डाळ आणि दही एकत्र खाऊ नये. म्हणजे दहीवडा हा पदार्थ वाग्भट ऋषींनी निषिद्ध सांगितलेला आहे. तर फळं आणि दूध एकत्र खाऊ नये. म्हणजे दुधाची साय घालून केलेलं शिकरण, आंब्याचा रस आणि फ्रूटसॅलड आयुर्वेदाला अमान्यच आहे.

भारतीय लोक शाकाहार आणि मांसाहार अशा दोन स्वतंत्र खाद्यपरंपरा पाळणारे आहेत. दोन्ही परंपराचा अंतर्भाव पूजाविधीत होतोच. वैदिक काळात यज्ञीय पशूचा बलिदान विधी करून त्याचं मांस प्रसाद म्हणून खाण्याची पद्धत होती. बळी देण्यासाठी निरूढ पशुबंध नावाच्या विधीचं विस्तृत वर्णनच आहे. तीच प्रथा पुढे उग्रपंथीय शाक्तांनी चालू ठेवली. पण त्यात खड्गानं एकाच वारात दोन तुकडे करून पशुबली देतात.

भारताच्या पूर्वेला शक्तिपूजेत मत्स्याहारी पदार्थांचा नैवेद्य दाखवणं अनिवार्य आहे. तर इतर भूभागांत शक्तिपूजेतला मांसाहार हा ज्ञातीविशेषाप्रमाणे निश्चित आहे. वाफा निघत असलेलं उष्ण अन्न एका विशिष्ट क्रमानं केळी किंवा कर्दळीच्या पानावर वाढून विविक्षित क्रमानं खाण्याची रूढी सर्वच भागांत प्रचलित आहे. पण या सगळ्याचा आधुनिक आहारशास्त्रानं काय उलगडा केला ते जाणून घेऊ या पुढच्या भागात.




# उदरभरण नोहे

उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

आपल्याकडे जेवताना म्हणायचा एक श्लोक आहे.

**वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे।**
**सहज हवन होते नाम घेता फुकाचे।।**
**जीवन करी जीवित्वा अन्न हे पूर्णब्रह्म।**
**उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म।।**

जेवण करणे म्हणजे केवळ पोट भरणे नव्हे. त्याला यज्ञकर्माची सुंदर उपमा दिली आहे. ते पूर्णब्रह्म आहे. वदनी 'कवळ' म्हणजे घास घेताना श्रीहरीचे नाव घेऊन जेवायला सुरुवात करावी वगैरे वगैरे. आता तर काळाच्या ओघात आम्ही हा श्लोकच विसरलो आहोत बुवा! अहो, कसले यज्ञकर्म अन कसले काय घेऊन बसलात! आम्ही पडलो पोटार्थी! आम्हाला हे यज्ञकर्म वगैरे असलं काही अजिबात मानवत नाही. ताकाला जायचं अन भांडं कशाला लपवायचं? त्यामुळे आम्ही सरळ जेवायलाच जातो. उदरभरणासाठी.

यज्ञकर्म वगैरे ज्याला वाटेल त्याने ते खुशाल करत बसावं. आम्हाला हॉटेलातलं जेवण अतिप्रिय! म्हणजे काय तर तसं घरी जमतच नाही बघा. घरी कांदाभजी केली, मिसळ केली किंवा आणखी ढोकळे की काय म्हणतात ते केले तरी त्याला हॉटेलसारखी चव थोडीच येणार? घरी भाजी कोणतीही बनवा. ती होणार अगदी सपक, मिळमिळीत. त्यामुळे आठवड्यातून एक दोन वेळा तरी आम्ही हॉटेलमध्ये जाऊन मस्त चमचमीत मिसळ,वडा वगैरे चापतो. जेवायला गेलो तर दोन तीन चमचमीत भाज्या मागवतो. त्याशिवाय मनच भरत नाही बघा. म्हणजे आमच्यासाठी घर की मुर्गी दाल बराबर. हां, सुरुवातीलाच सांगितलेले बरे की आम्ही आहोत पक्के शाकाहारी. त्यामुळे वरील म्हणीचा शब्दशः अर्थ अजिबात घेऊ नका. तर हॉटेलात जायचे फायदे किती ते सांगतो. गाडी पार्किंगचा प्रश्न येत नाही. सिक्युरिटीचा माणूस आमच्याकडून गाडीची चावी घेऊन स्वतः गाडी पार्किंगला घेऊन जाणार. हॉटेलात गेलो की काउंटरवरचा मॅनेजर आमचं हसून स्वागत करणार. या साहेब तोंडभरून म्हणणार. वेटरही आता ओळखीचा झालाय. आम्हाला पाहिल्याबरोबर एअर इंडियाच्या महाराजासारखं झुकून अदबीनं स्वागत करणार. घरी असलं वातावरण कुठं मिळणार! टेबलावर जेवणाचं ठेवलंय. वाढून घ्या. हवं तर गरम करून घ्या. फ्रिजमधून अमुक अमुक लागलं तर घ्या! तुमचं जेवण झालं की सगळं झाकून ठेवा. किती सूचना ऐकाव्या लागतात. हॉटेलमध्ये ही भानगडच नाही. तिथे आपल्या सूचना! आणि ऐकणारे वेटर.

गेल्याबरोबर बिसलरीची बाटली आणून ठेवणार. सांगावं नाही लागत. लगेच मेनूकार्ड येतं. आज स्पेशल काय आहे असं विचारलं की अक्षरशः वेगवेगळ्या नावांचा पाऊस पडतो. पनीर मेथी, पालक पनीर, आलू पनीर, पनीर टिक्का... वा वा काय सांगावं. ऐकल्यावर असं वाटतं की आपण आलो ते हॉटेल म्हणजे पनीरची राजधानीच आहे. इतकं विपुल पनीर! अधूनमधून बातम्या येत असतात की बरचसं पनीर बनावट असतं. एवढं दूध आणि एवढ्या पनीरचं उत्पादन आपल्या देशात होतंच नाही मुळी! आणि ते अनालॉग पनीर की काय म्हणतात ते स्वस्त मिळतं. घातक पदार्थांपासून बनवलेलं असतं. आरोग्यालाही घातकच! त्यात ट्रान्स फॅट्स वगैरे असतात म्हणे. आपल्याला काय पनीर मिळाल्याशी मतलब! असं चापून हाणतो की काही विचारू नका. अस्सल खवैय्ये खाताना कधी विचार करीत नाहीत. ते मधे काहीतरी आलं होतं बघा. वड्यात इतक्या कॅलरीज, सामोस्यात इतक्या...आरोग्याला हानिकारक वगैरे. अस्सल खवैय्ये असल्या गोष्टींकडे लक्ष देत नाही. खाताना विचार करायचा नाही आणि हॉस्पिटलमध्ये जाताना विचार करायचा नाही. काय विचार करायचा तो घरचे बघून घेतील. तर असो.

काही लोकांची मला फार गंमत वाटते. ते हॉटेलमध्ये गेले ना की त्यांना घरच्यासारखं जेवण हवं असतं. अरे बाबा, गेलासच कशाला मग हॉटेलमध्ये? दुसऱ्या काही मंडळींची तऱ्हा याच्या नेमकी उलट. त्यांना घरी हॉटेलसारखं जेवण हवं असतं. आता घरी ते कसं मिळणार? मग संघर्ष अटळ! आम्हाला संघर्ष अजिबात आवडत नाही. त्यामुळे आम्ही आपले घरी कंटाळा आला की अधूनमधून हॉटेलची वाट धरतो. 'पाऊले चालती पंढरीची वाट...' ऐवजी हॉटेलची वाट आमची पावलं चालतात.

परवा एक डॉक्टर मित्र भेटला. म्हणाला,'आम्ही बाहेरचं काही खात नाही. पण परवा एका मित्राच्या आग्रहाने एका प्रसिद्ध हॉटेलमधली पावभाजी घरी नेली. तर त्या पावभाजीत कृत्रिम रंग टाकलेला आढळला. मग काय म्हणे मोलकरणीला देऊन टाकली. ' आता तो मित्र डॉ होता म्हणून त्याने ती पावभाजी खाणे टाळले. पण बाकीचे कितीतरी लोक तिथे मिटक्या मारीत ती खातात. (नंतर ते डॉक्टरकडे जात असतील हा भाग वेगळा.) आता आमच्या गावात तर असा एक भागच आहे. त्याला आपण खाऊ गल्ली म्हणू हवं तर! तिथे भेळेच्या गाड्या, पाणीपुरीच्या गाड्या, पावभाजी, वडे, पाव वडे आदी चटकदार पदार्थांची रेलचेल असते. संध्याकाळच्या वेळी या भागात प्रचंड गर्दी असते.

शनिवार रविवार तर नंबर लावावे लागतात. असं म्हणतात की हॉटेलमधील पदार्थांना तेल चांगल्या दर्जाचे वापरलेले नसते. त्याच त्याच तेलात पदार्थ तळले जातात. त्यामुळे त्या तेलात आरोग्यासाठी घातक पदार्थ निर्माण होतात. ते पदार्थ पचायला जड होतात.

हॉटेलमधल्या पदार्थांमध्ये भरपूर तेल, मसाले आणि प्रिझर्व्हेटिव्हज यांचा वापर केलेला असतो. असे पदार्थ वारंवार खाल्ल्याने वजन वाढते, हृदयविकार, मधुमेहासारख्या घातक आजारांना निमंत्रण मिळते. शिवाय हॉटेलमधले जेवण आर्थिक दृष्ट्या महाग असल्याने ते खिशाला परवडत नाही हा भाग वेगळाच. पण जाऊ द्या. जातीचे खवय्ये असला विचार करीत नाहीत. जो होगा वो देखा जायेगा.

आजकाल आम्ही आठवड्यातून दोन तीन वेळा तरी बाहेर जेवायला जातोच. परवा आम्ही एक लेख वाचला होता. म्हणे अमेरिकेत पूर्वी सगळे कसे घरी जेवत होते पण बाहेर जेवणाची फॅशन आली आणि लोक घरी स्वयंपाकच करेनासे झाले. घरातलं स्वयंपाकघर आणि डायनींग हॉल म्हणजे कुटुंबियांना एकत्र बांधून ठेवणारं ठिकाण! गॅस विझला, चूल थंड झाली. कुटुंबाला जोडून ठेवणारा धागा सैल झाला. आम्ही जेवायला बाहेर जायला लागलो. नाहीच जमले जायला तर घरी पार्सल मागवायला लागलो. पूर्वी एकत्र जेवणं व्हायची. जेवताना गप्पा व्हायच्या. एकमेकांची सुखदुःख समजून घेतली जायची. कुटुंबातले काही प्रश्न जेवणाच्या टेबलावर सुटायचे. दिवसभर वेगवेगळ्या कारणाने विखुरलेले कुटुंबातले सदस्य जेवणाच्या निमित्ताने एका जागी यायचे, भेटायचे, हास्यविनोद व्हायचे. हॉटेलात आम्ही सहकुटुंब जेवायला गेलो तरी मनाने कुठे एकत्र असतो ? प्रत्येक जण मोबाईलमध्ये डोके खुपसून बसलेला असतो. कोणाचे इतरत्र लक्ष असते. तसेच कोरडे जातो आम्ही आणि कोरडे येतो. मायेचा ओलावा असलेले प्रेमाचे दोन शब्द एकमेकांशी क्वचितच बोलले जातात.

आजकाल छोटी होत जाणारी कुटुंबे, घरातील नोकरी करणारे सदस्य यामुळे दररोज घरी स्वयंपाक करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही हे समजण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे वाढदिवस, छोटी पार्टी, समारंभ यासारख्या गोष्टींचे आयोजन करणे हॉटेलमध्ये सोयीचे होते हे देखील समजण्यासारखे आहे. परंतु घरी स्वयंपाक करणे आणि हॉटेलमध्ये जाणे या गोष्टींमध्ये सुरेख असं समन्वय साधणे शक्य आहे. आवश्यक प्रसंगी हॉटेलमध्ये जायला हरकत नाही परंतु इतर वेळी मात्र आवर्जून घरचेच जेवण घ्यायला हवे याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही.

असे म्हणतात की, १९७१ मध्ये अमेरिकेत ७१% असलेली पारंपरिक कुटुंबे आज केवळ २० % वर आली आहेत. मग उरलेली माणसे गेली कुठे? ' कहाँ गये वो लोग?' उत्तर फार विदारक आहे. बरीचशी मंडळी वृद्धाश्रमात आहेत. कोणी भाड्याच्या घरात एकट्याने जीवन कंठत आहेत. १५% स्त्रिया एकट्या राहतात, १२% पुरुष कुटुंबात असूनही एकाकी आहेत, ४१% मुले विवाहाबाहेर जन्माला येतात, आणि घटस्फोट दर पहिल्या लग्नात ५०%, दुसऱ्यात ६७% तर तिसऱ्यात तब्बल ७४% इतका आहे. हे सगळे हॉटेलात जाण्यामुळे झाले आहे असे माझे म्हणणे नाही. पण या सगळ्यांना जोडून ठेवणारा कुटुंब नावाचा जो घटक होता तो हरवला आहे. तो हरवण्यात कुठेतरी आमचं स्वयंपाकघर हरवलं आहे, त्याचाही वाटा आहे.

भारतात अजून इतकी विदारक परिस्थिती नाही. पण निश्चितच ही कुठेतरी आमच्यासाठी धोक्याची घंटा आहे. जेवणाला आम्ही जेव्हा 'नुसते उदरभरण' न समजता यज्ञकर्म समजू तेव्हा आरोग्याचेही प्रश्न आपोआप सुटतील.



## प्रकटे पाषाणी । जनीं संगे ।।

ज्ञानास येऊ दे । प्रचितीचा गंध ।।
जाण तो सुगंध । चंदनाचा ।।१।।

बोलणी करणी । एकरूप ज्याची ।।
खाण आदर्शाची । राम जाण ।।२।।

ज्ञानाचिये ठायी । विनय शोभतो ।।
अहंकार खातो । उभ्या जन्मा ।।३।।

मानपान सारे । मनाचे आभास ।।
मृगजळी भास । काय कामी? ।।४।।

अनुभवी वाचा । शुद्ध संतवाणी ।।
प्रकटे पाषाणी । जनी संगे ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## मन

गुंतले माझे मन असे तुझ्या ठाई
रात्रंदिन ध्यास सदा वेध तुझा येई
तुला बघण्यास माझे आसुसले मन
कधी दर्शन देसी हे प्रभो दयाघन
तू असिसि रे साऱ्या दुनियेचा त्राता
मी अजाण बालक तू प्रिय माझी माता
तुझ्या चरणाशी माझे लीन झाले मन
माझे अपराध घेसी तुझ्या पोटी सामावून
तुझ्या सगुण रूपाशी मी झाले एकरूप
माझ्या निर्मळ मनासी तू ठेव सुखरूप
रूप निर्विकार तुझे भासे सर्वदा निवांत
माझ्या अशांत मनाला कधी करिसी रे शांत

अपर्णा सोवळे

## गाव...

पूर्वीसारखा गाव हल्ली, गजबजलेला दिसत नाही..
पिंपळाच्या झाडाखाली दिसतात फक्त आता
चार दोन म्हातारी सत्तरी ओलांडलेली ...
रस्ताही दिसतोय सामसूम शेताकडे जाणारा...
घरेही वाटतात बंदिस्त कारागृहासारखी..
महिलांची, विहिरी-नदीवरील वर्दळ कधीचीच ओसरलेली...
सगळीकडे जाणवतेय हल्ली स्मशान शांतता ..
पूर्वीचा गोडवा, जिव्हाळा अगदीच हद्दपार झालेला...
देशाचं तरुण भविष्यही गुरफटलंय मोबाईलच्या
अजगरी विळख्यात, कायमचं..
माझा गाव खरंच आता गाव राहिला नाही...

दादाराव अवचार

# भरतमुनी आणि सणासुदीचे दागदागिने

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

गणपती उत्सवानंतर नवरात्र येते. गुलाबी थंडीमुळे दिवाळीची चाहूल लागते. दिवस कसे भराभरा जातात. पाहुण्याराहुण्यांची लगबग घरीदारी सुरू असते. व्यापारपेठांना सुगीचे दिवस येतात. सराफा बाजार झळाळून उठतो. बायका देहभान विसरून सोनार गल्लीत तासन्तास घालवतात. दागिन्यांवरचं त्यांचं प्रेम घरोघरी चेष्टेचा विषय होतो. खरं तर तसं व्हायला नको कारण सणासुदीला घालण्यात येणाऱ्या दागिन्यांमध्ये आजही प्राचीन संस्कृतीचे वैभवशाली अवशेष सापडतात. प्रत्येक शतकात स्त्रियांनी वेगवेगळे अलंकार ल्यायले. तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव दागिन्यांवरही पडला. देवींचे अलंकारही त्यानुरूपच घडविले गेले. पण अजूनदेखील आपल्या अतिप्राचीन संस्कृतीतले अलंकार आजच्या स्त्रियांवर भुरळ घालून आहेत. प्रत्येक दागिन्याची गोष्ट आपल्या प्राचीन संस्कृतीच्या मूलस्रोतातून सुरू झाली आहे.

प्राचीन भारतीय संस्कृतीच्या प्रतिभेचा काळ भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात आपल्याला बघायला मिळतो. भरतमुनींचा काळ अंदाजे ख्रिस्त पूर्व ५०० ते इ. स. पू. १०० मानला जातो. या प्रतिभावान ऋषीने नाट्यशास्त्र लिहिले ज्यात त्यांनी अभिनयाचे चार प्रकार सांगितले. आहार्य, आंगिक, वाचिक आणि सात्त्विक असे हे चार प्रकार आहेत. सर्व प्रकारच्या अभिनयात सर्वांत सोपा आणि महत्त्वाचा अभिनय म्हणजे आहार्य अभिनय आहे. आहार्य अभिनयात बाह्य वेशभूषा आणि अलंकारांचा समावेश आहे. अलंकार ल्येणे हा अभिनयाचा प्रकार समजून भरतमुनींनी एवढे बारकाईने अलंकारांचे वर्णन केले आहे की वाचणारा थक्क होऊन जातो. आपल्या देवींना अजूनही आपण या अलंकारांनी सजवतो. स्त्रिया यातील अनेक अलंकार अजूनही हौसेने मिरवतात. त्यामुळे हा प्राचीन स्रोत जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

भरतमुनींनी पायात घालणाऱ्या पदपत्र नावाच्या दागिन्याचा उल्लेख केलेला आहे. पायांच्या बोटात खटव्यांप्रमाणे अंगुल्या व पायांचे अंगठ्यात तिलक म्हणजे रंगजोडवी असत. आजही जोडवे सौभाग्याचे लेणे समजले जाते. पायात घालण्याचे तीन दागिने भरतमुनींनी सांगितले आहेत. नूपुर म्हणजे पैंजण जे सगळ्याच बायकांना आजही अतिशय आवडते. आज आपण या दागिन्याला छुमछुम म्हणतो. आवाजानुसार किणकिणी आणि घंटिका अशी नावे देण्यात आली असावीत. घंटिकेतून जास्त खोलवर आवाज येत असावा. जाल आणि कटक हे सुद्धा पायात बांधायचे दागिने होते. जाल आजच्या चाळांप्रमाणे आणि कटक म्हणजेआपण बाळांना वाळी घालतो तो प्रकार असावा. कमरेला बांधण्याचे कांची, मेखला, रशना आणि कलाप दागिन्यांचे भरतमुनींनी वर्णन केले आहे. कांची हा कंबरपट्टा एकाच साखळीचा असायचा. कलापाला पंचवीस साखळ्या असायच्या. प्रत्येक अलंकारासाठी एक विशिष्ट हेतू असतो. नृत्य करताना फक्त पायातील किणकिणीमधून नाही तर कमरेत बांधलेल्या कलापातून अतिशय अद्भुत आवाज निर्माण व्हायचा. भरतमुनींनी मुक्तावली म्हणजे मोत्यांच्या एक सरीचे वर्णन केले आहे पण त्याचबरोबर आठ सरींपासून शंभर सरींच्या हारांचीदेखील वर्णने केली आहेत. मुक्तावली ही एकसरी आजही बायका हौशीने सणासुदीला घालतात. व्यालपंक्ती म्हणजे सरींवर सरी ठेवून त्यांचा पीळ करून तयार केलेला दागिना. रत्नावली म्हणजे रत्नांचा एक सर, सूत्रक म्हणजे सोन्याचा गोफ हे सर्व दागिने आजही प्रत्येक घरात सणसमारंभात बायका हौशीने मिरवताना दिसतात. बारीक बारीक मण्यांच्या दागिन्याला भरतमुनींनी मंजिरी असे नाव ठेवले आहे. आजही हा दागिना अतिशय लोकप्रिय आहे.



सध्याची आपली ठुशी बारीक बारीक मण्यांनीच बनलेली असते. नवरात्रीच्या आरत्यांमध्ये देवीच्या अनेक प्राचीन दागिन्यांचे वर्णन येते. आणि हे वर्णन भरतमुनींनी उल्लेख केलेल्या दागिन्यांशी बरेचसे मिळते जुळते आहे. कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या आरतीत एक दागिन्यांचे कडवं आहे. "इंदू जोडण्यावरी तानिवडे, वरती नागबंदाची फुले हंसळिया भोवरिया, वरी पदक ल्यायली लेणे नासिक रत्नबिंब, गळा ल्याइली त्रिदळ पाटी ऐसी बाळा कोल्हापूरची, महालक्ष्मी गोमटी इंदू जोडवी, ल्याइली तोडे, सरळ साखळ्या हाती काकणे ल्याइली नागदोरे, गळा ल्याइली सरी" आजही बायका ठुशी, गोफ, चंद्रहार, पोहे हार, चपला कंठी, मोहन हार, बोरमाळ, जोंधळी हार, चिंचपेटी, राणी हार, लक्ष्मी हार, नवरत्न हार, तन्मणी, लफ्फा, कोयरी हार, चाफेकळी हार, आंबे हार, जव हार, कोल्हापुरी साज, चपटी चिताक असे वैविध्यपूर्ण हार घालून आपल्या प्राचीन संस्कृतीची समृद्धी वाढवीत आहेत. प्राचीन वेदिक काळात इंद्रच्चंद्र हा एक हजार आठ मोत्यांच्या सरींचा हार होता. मौर्य काळात (इ. स. पूर्व ३२२ ते इ. स. पूर्व १८५) अर्धहार, नक्षत्र माला, शुद्ध हार, रत्नावली, त्रिफळक, तीन पदरी कुंडल माळा असे वेगवेगळ्या प्रकारचे हार भरतमुनींच्या नाट्यशास्त्राची आठवण करून देतात. सातवाहन काळात (इ. स. पूर्व एक ते इ. स. तीन पूर्वार्ध) एकावली हार अतिशय लोकप्रिय होता. या हाराचाही भरतमुनींनी उल्लेख केलेला आहे.

भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात केसांमधून लोंबणाऱ्या मण्यांच्या जाळ्यांचेही लोभस उल्लेख आहेत. याचाच अर्थ, अतिप्राचीन काळापासून केशविन्यासाला फार महत्त्व होतं. चांदीचे आकडे, सोन्याची फुले, मोती, रत्नांच्या माळा केसात माळणं घरातल्या संपन्नतेचा निर्देशांक असायचा. सातवाहनांच्या आगमनाने महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास समृद्ध झाला. इ. स. पूर्व २३० ते इ. स. २३० अशी चारशे साठ वर्षे राज्य करताना व्यापारी पेठांच्या उत्खननात सापडलेले पुरावे अतिशय महत्त्वपूर्ण ठरतात. तेर येथे सापडलेल्या हस्तीदंती बाहुलीचा केशसंभार सांभाळण्यासाठी मोत्याच्या झालरीचा पट्टा बांधला आहे. नंतरच्या अजिंठ्याच्या कलाकृतीमध्येही उजव्या खांद्यावर रूळणारी माणिक मोती गुंफलेली नागमोडी वेणी खूपच मनमोहक वाटते. सर्व मनमोहक दागदागिन्यांचा मूलस्रोत भरतमुनींच्या नाटचशास्त्रात अभिनयाच्या प्रकरणात सापडतो ही विलक्षण गोष्ट आहे.



भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात नाव कोरलेल्या अंगठ्या आहेत. शंख कलापी म्हणजे हस्तीदंती बांगड्या आहेत. कटक म्हणजे गोठ, पत्रपूरक खर्जूर म्हणजे जवे आणि अंशोपीतक हे मनगटावर घालण्याचे अलंकार आहेत. अंगद म्हणजे बाजूबंद आहेत. तसेच वलय म्हणजे कड्यासारखे दिसणारे बाजूबंद आहेत. कानातले प्रकार तर किती म्हणून सांगावेत! कर्णिका, पत्रकर्णिका, कर्णवलय, आपेश्रुक, कर्णमुद्रा, दंतपत्रे, कर्णपूर अशा अनेक कर्णकुंडलांची वर्णने वाचून आपण थक्क होतो. स्त्रियांच्या कपाळावर कुंकू त्या काळातदेखील होते आणि भुवयांवर डोक्यावरून फुलांच्या गुच्छाप्रमाणे सोडलेला एक दागिना असायचा. आज देखील बायका अंबाड्यात चंद्रफूल, सूर्यफूल, तारा, बिंदी पट्टा, मोत्यांची जाळी असे सुरेख दागिने घालतात. वेदिक काळात चुडामणी, शीर सजल, पिंडपत्र, मुक्ताजल असे डोक्यात खोवायचे दागिने होते. भांगेमध्ये बोर दागिना, पिंपळ पान, बीजवरा असे सुंदर दागिने होते. स्त्रिया कपाळावर आणि गालावर कस्तुरी चंदनाने वेलबुट्टी काढत. त्याला पत्रलेखा असे नाव भरतमुनींनी दिले आहे. आजही गोंदण किंवा टॅटूच्या साहाय्याने बायका वेलबुट्टी काढतात.

भरतमुनींनी दागिन्यांचे चार प्रकार सांगितले आहेत. आवेध्य, बंधनीय, आक्षेप्य व आरोप्यक. कानाला छिद्र करून घातल्या जाणाऱ्या कुंडलांसारख्या दागिन्यांना आवेध्य, दंडावर किंवा कमरेला बांधणाऱ्या दागिन्यांना बंधनीय, पायांमध्ये नूपुरे घालतात, थोडा हिसका दिल्यावर ती गळूनही पडतात, अशा दागिन्यांना क्षेप्य आणि वरून घालण्याच्या अलंकारांना आरोप्यक असे चार प्रकार भरतमुनींनी नाट्यशास्त्रात दिले आहेत.

पुरुषांनी घालण्याच्या अलंकारांचे वर्णनही भरत मुनींनी केलेले आहे. प्राचीन काळी पुरुषही डोक्यात चुडामणी घालीत. तो डोक्याचे मध्यभागी घालून त्यावर एक किमती रत्न जोडलेले असायचे. गळ्यात घालायची माळ, हर्षक आणि सूत्र असे तीन प्रकार होते. हर्षक म्हणजे हांसोळीसारखा ताठ वाटोळा हार होता. सूत्र म्हणजे सोन्याचा गोफ. तीन पदरी हारदेखील त्या काळात होता. त्याला देहभूषण असे नाव भरतमुनींनी दिले. बोटातले वळे हे प्राचीन काळापासून अस्तित्वात होते. फुलांच्या दागिन्यांचेही भरतमुनींनी बारकाईने वर्णन केले आहे. वेष्टित, वितत, संघाल्य, तेपित व प्रलंबित असे फुले गुंफण्याचे पाच प्रकार भरतमुनी सांगतात. नवरात्रात गौरीसमोर माळा वर एकत्रितपणे बांधतात. त्यांना वितत असे म्हणतात. त्याकाळी सुद्धा पुष्पगुच्छ देण्याची पद्धत होती, बरं का. हिरवे गवत, पाने फुलांना गुंडाळून फुलांचे जे गुच्छ करतात त्यांना वेष्टित असे नाव भरतमुनींनी दिले. भरतमुनींनी नाकात घालण्याचा एकही अलंकार सांगितलेला नाही. प्राचीन काळात नथीला महत्त्व होते का कळत नाही किंवा नथीचा श्लोक गहाळ झाला असावा. चंड मुंड, शुंभ, महिषासुरांचा नि:पात करणारी महिषासुरमर्दिनी नथ घालून रणांगणात उतरत नाही. पण संसारात रममाण झालेल्या पार्वती, अंबा, महालक्ष्मी या देवी मात्र ठसठशीत मोत्यांनी लगडलेल्या नथी ल्येतात. यामुळे नाट्यशास्त्रातून नाकाच्या नथीचा श्लोक गहाळ होण्याची शक्यता जास्त वाटते. सर्व अलंकारांची वर्णने करून झाल्यावर भरतमुनी म्हणतात की खरे अलंकार सणासमारंभाला घालावेत. पण रंगमंचावरचे दागिने अभ्रक, मेण, वर्ख, रंग या गोष्टींनी तयार करावेत. नवरात्रात आपण शक्तीची पूजा करतो. मातृत्वाची पूजा करतो. समृद्धीची पूजा करतो. गणपती बरोबर येऊन गेलेली महालक्ष्मी देवी लेकुरवाळी आहे. तिची पूजा म्हणजे सुख समृद्धीची पूजा. आदि स्त्रीशक्ती असुरांचा नायनाट करणारी होती. पण त्याचबरोबर सर्व अलंकार ल्यायलेली लावण्यवतीसुद्धा होती. आजची स्त्रीशक्ती देखील घरातल्या नकारात्मक ऊर्जेला केरसुणीने दूर सारते. पण सणासुदीला हौशीने सर्व दागिने मिरविते. तिचे दागिने फक्त दागिने नाहीत. ते आपल्या प्राचीन संस्कृतीचे वैभवशाली अवशेष आहेत.

# सोनेरी उन्हात भिजूनी येतो भादवा

**श्रावण निरोप घेतो आणि भाद्रपद उंबरठ्यावर येतो. पण या दोन्ही ऋतू बंधूंच्या भेटीत इतकी ओलसर गुंतवळ असते की, नेमका कोण गेला आणि कोण आला हे सांगणे कठीण होते. श्रावणाचे शेवटचे आठ दिवस म्हणजे अजूनही हिरवाईची चादर, झाडांच्या फांद्यांवर पावसाचा नाद, ओव्या- भजनाची गूज. भाद्रपदाच्या पहिल्या आठ दिवसांतही हेच चित्र पुढे सरकत राहतं- ढगांच्या गर्जना, विजांच्या चमका, थेंबांची सरसर. या दोन्ही महिन्यांतली रात्र सारखीच गूढ- कधी चांदण्यांच्या चांदीने उजळलेली, तर कधी काळोखात पावसाच्या गजराने भरलेली.**



ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

पहाटेच्या कावळ्याचा कावकाव, पानांवरून घसरत पडणारे थेंब, अंगणात प्राजक्ताचा सडा, आभाळावरून ढगांच्या रांगाही सारी लय अखंड सुरूच राहते. श्रावण संपतो म्हणून हिरवाई आटत नाही, आणि भाद्रपद सुरू होतो म्हणून आभाळ विरघळत नाही. उलट हे दोन्ही महिने एकमेकांना हात देऊन ऋतूची अखंडता टिकवतात. माणसाच्या मनातली भक्ती, सणांची उजळण, निसर्गाची भरभराट या दोन्ही महिन्यांत इतकी समान असते की ते एकाच ओल्या कापडाच्या दोन धाग्यांसारखे भासतात.

कालिदासाच्या ऋतुसंहारमध्ये भाद्रपद निसर्गाच्या उन्मेषाचा आणि ओलसर उत्कटतेच पर्व मानला आहे. जमिनीवर ओथंबून वाहणाऱ्या नद्या, नद्यांच्या प्रवाहात खेडी ओसंडून जातात, डोंगरावरून खळाळून कोसळणारे धबधबे, ढगांच्या गर्द छायेत खेळणारे वारे, झाडांच्या पानांवर थेंब टिपकतात आणि नव्या पल्लवांच्या हिरवाईने दाटून आलेली दृष्ये भाद्रपदाची ओळख ठरतात. स्त्री-पुरुषांच्या अंतःकरणातही निसर्गाच्या या उन्मेषाचे प्रतिबिंब उमटते. कालिदासाचा ऋतुसंहार वाचताना वाटतं की हा कवी केवळ ऋतूच नाही, तर मानवी अंतःकरणाचेही प्रतिबिंब शब्दांत मांडून गेला आहे. त्याने भाद्रपदाचे जे वर्णन केले ते एकाच वेळी आल्हाददायक आणि ओलसर आहे. भाद्रपद म्हणजे पावसाचा उत्कर्षबिंदू होय. दिवसाचा रंग कधी राखाडी आणि कधी चमकदार सोनेरी, पण मनाचा रंग गर्द हिरवा. पाऊस अंगणात, पाऊस मनात, पाऊस नात्यात. हा ऋतू म्हणजे ओलसर आठवणींची ओंजळ भरून आलेला असतो. तसा कालिदासाचा काळ फार जुना झाला मग आपण अगदी सव्वाशे दीडशे वर्षांपूर्वीच्या काळात डोकावून पाहिले तरी त्या काळात गावांचा आत्मा बैलजोड्यांच्या टापांशी, दगड- धोंड्यावर आदळणाऱ्या लाटांशी आणि शिवारात घुमणाऱ्या रानशीळ ह्यांच्या स्वरांनी जोडलेला होता. शेतकरी पिकांच्या अंकुरांकडे बघून नतमस्तक होत होता. नदीला पूर येणे म्हणजे उत्सवाचा दिवस आणि त्या काळात नदीच्या हक्काच्या वहिवाटेवर कधी कोणी अतिक्रमण केलेले नसायचे त्यामुळे नदीच्या पाण्यात कोणी वाहून जायचे नाही. अर्थात पट्टीचे पोहणारे भोपळ्याची सुकडी कमरेला बांधून खोलवर सूर मारायचे तो आनंद विरळाच. नदी ही जीवनदायिनीच होती. तिला आक्रमक तेंव्हा व्हावे लागले जेंव्हा आम्ही तिच्या वाटा अडवल्या, तिला भिंतीपाशी बंदिस्त केले, तिच्या वाटेवर ती पुन्हा फिरकणार नाही असं समजून तिच्या वाटेत स्वतःची घरे उभी केली. कधीकाळी स्त्रिया कडेवर लहानगे घेऊन अंगणात ओल्या मातीच्या सुगंधात भादव्यांची गाणी गात. शहरातही फारसा फरक नव्हता; गाड्या, मोटारी नव्हत्या. पाऊस म्हणजे मंदिरे, घाट, नदीकाठ गजबजून जाणे. तसे त्या काळात शहर म्हणजे काय? तर खेड्यापेक्षा थोडीफार वाढलेली गर्दी आणि कचेरीचे काही कामे व्हावे असे ठिकाण. व्यापाराच्या पेठा, आठवडी बाजार भरेल असं एक गावठाण. पुढे पाहता पाहता काळ बदलत गेला, कुठे एसटी बस तर कुठे रेल्वेचे डबे, कापडगिरण्यांची गडबड, वाचनालयातल्या दिव्यांच्या उजेडात येणारा शिंपडका पाऊस- ही शहरी चित्रे साधारणता ७० ते ७५ वर्षांपूर्वी तयार झाले. मात्र, या सर्व आधुनिक काळात गावकुसाबाहेरचा जग मात्र पूर्वीप्रमाणेच भिजत होता. खेडेही बदलणार्या आवर्तनाकडे दुर्लक्ष करून बैलजोड्या, भादव्याचा पाऊस झेलणारी शेतं, पाण्याखाली गेलेली वाडी यांमध्ये झगडत राहिला. घराघरात गणपतीची आरास होत असे; भजन, कीर्तन, दिंड्या गावात गूंजत. पावसाचा अंधार कंदिलांनी उजळत होता. गणपती सोबत गौरी आगमन आणि त्याचे खेड्यापाड्यात



विदर्भासारख्या ठिकाणी गणपतीपेक्षा हे गौरीला थोडे जास्त महत्व असल्याचे चित्र

वाढत जाणारे महत्त्व हे सर्व परिवर्तन अगदी काल आजचे वाटते. आजचा भाद्रपद तर पूर्णपणे बदलून गेला आहे. खरे म्हणजे नवीन पिढीला भाद्रपद नावाचा महिना असतो हे सुद्धा ठाऊक आहे की नाही अशी शंका आजच्या काळात येते. कारण भाद्रपद तसा श्रावणाच्यानंतर आल्यामुळे जी प्रसिद्धी आणि लोकप्रेम श्रावणाला मिळते ते भाद्रपदाला मिळत नाही, असे मला वाटते. सहज पाहायला गेले तर मराठी आणि हिंदीमध्ये श्रावणावर किमान शंभरपेक्षा जास्त गाणे आणि कविता सापडतील. भाद्रपदावरचे गाणे कविता शोधण्यासाठी आपण गेलो तर आपल्या परडीत दहाचा आकडा सुद्धा येत नाही हे निश्चित.

आजच्या यंत्रयुगात पावसाची चाहूल देखील मोबाईल अँपवरून समजते. शहरातल्या टॉवरांनी ढगांशी नाते बदलून टाकले आहे. डांबरी रस्त्यावर पाणी साठते, ट्रॅफिक जाम होतो; पावसातले निसर्गगीत हॉर्नच्या गोंगाटात हरवते. तरी भाद्रपदातील सण अजूनही नात्यांची ओढ वाढवतात; मुंबईकडून कोकणाकडे जाणाऱ्या गाडीच्या हृदयामध्ये गणपती अगोदरच विराजमान झालेले असतात.

उभे राहते. गणपती काय गौरी काय? दोघांचाही कुटुंबप्रमुख भोळा शंकर, त्याचा श्रावण नुकताच होऊन गेलेला असतो. श्रावणातल्या कावडी डीजेच्या तालावर आणि गौरी गणपतीची याला आरास प्लास्टिकच्या सजावटीत आणि विसर्जन नदीऐवजी कृत्रिम तलावात असते. ग्रामीण भागात मात्र अजूनही शिवारात उभा असलेला शेतकरी ढगांकडे आर्त नजरेने बघतो. त्याची प्रार्थना आजही कालिदासाच्या काळाइतकीच शुद्ध आहे. त्यांच्या भाद्रपदाची सकाळ ढगांच्या झिरपणार्या उजेडात डोळे उघडते. पक्षी पिसं झटकून पुन्हा आकाशात उडतात. दुपारी पाऊस एकदम झोकून देतो; कडाडणाऱ्या विजा आणि धोधो सरींमध्ये माणूस घरातल्या कडांवरून बाहेर डोकावतो. पाळीव प्राणी- गाई- वासरे- घरट्याच्या उबेला शरण जातात. संध्याकाळी काळा अंधार दाटून येतो; वीज चमकत राहते. डोंगरावरून हंबरणाऱ्या रानगव्यांचा आवाज वार्यात मिसळतो. चिमण्या, मैना, कोकीळा पावसाच्या सरींपासून झाडांच्या घनदाट पानांत आश्रय घेतात. भाद्रपद जर घनघोर बरसला की नदी तीर ओलांडून धावते; झरे खळाळतात, विहिरी तुडुंब भरतात. आता ह्या विहिरी कोठे आहेत?

असा प्रश्न विचारू नका. भादव्यात फुलं फुलून पावसाच्या थेंबांनी अधिकच शोभून दिसतात.

काही मोजकीच झाडं फळांनी ओथंबतात, वनफुलं रानभर पसरतात. हिरवी पानं वाऱ्यात डोलतात, गारवा अंगावर झुळझुळतो. कधीकाळी भाद्रपदाच्या दिवसात उडदा मुगाच्या हिरव्यागार शेंगा कडूस पडलेल्या तोंडाला चव आणत. आता सोयाबीनच्या वापराने उडीद आणि मूग ह्याच्या ज्या शेंगा नव्हाळी म्हणून मिळायच्या त्या आता बाजाराच्या कोपऱ्यावर किलोच्या भावाने मिळायला लागल्या आहेत.

आधुनिक युगात ही नव्हाळीची ओढ थोडी पोकळ झाली आहे. मात्र, अंधारून आलेल्या पुराच्या गप्पात आजही नात्यांमध्ये दुरावा पावसाच्या थेंबासारखा हळूच गळतो. ह्या सर्वात आपल्या एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे भाद्रपद हे केवळ ऋतूचे नाव नाही; तो मानवी हृदयाच्या ओलाव्याचा, नात्यांच्या गूढतेचा आणि निसर्गाच्या नव्या उत्साहाचा महिना आहे. कालिदासाने जसा त्याचा शब्दातला उत्सव रचला, तसा तो आजही माणसाच्या मनात दाटून येतो. कधी चिखलात भिजलेल्या पावलांत, कधी झाडांच्या फुलोऱ्यात, तर कधी विसरलेले पण आठवणींनी उजळलेले सणांमध्ये, नाही का?

# विध्वसांचे विघ्नचिंतक

**श्रीलंका, बांगलादेश आणि आता नेपाळ... भारताच्या शेजारी असलेल्या या तिसऱ्या देशातही सरकारी भ्रष्टाचार आणि सोशल मीडियाबंदीविरोधात प्रचंड जनआक्रोश उफाळून आला. मंत्र्यांची घरंदारं पेटवण्यापासून संतप्त आंदोलकांनी नेपाळची संसदही स्वाहा केली. पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी अन्य मंत्र्यांसह देश सोडून पलायन केले. परिणामी, सरकारही गडगडले. एकूणच अस्थिरता आणि अनिश्चिततेच्या गर्तेत हिमालयाच्या कुशीत वसलेला नेपाळ अजूनही धुमसतो आहे. पण, नेपाळमध्ये फुटलेला हा राजकीय ज्वालामुखी बघून, भारतातही काही विघ्नचिंतकांना उकळ्या फुटू लागल्या. उबाठाचे खासदार, विश्वप्रवक्ते संजय राऊत या यादीत तर अगदी आघाडीवर. नेपाळी अर्थमंत्र्यांना लोकं रस्त्यावर पळवून पळवून मारहाण करीत असल्याचा एका भारतीय वृत्तवाहिनीचा व्हिडिओ राऊतांनी ट्विट केला. व्हिडिओसोबत 'ये हादसा किसी भी देश मे हो सकता हैं! सावधान रहिये! भारतमाता की जय! वंदे मातरम्!' अशी कुत्सितपणे त्यांनी मखलाशीही केली.**



वेधक
विजय कुलकर्णी

आता एवढे अतिव्यक्त होऊन थांबतील ते राऊत कसले. या ट्विटमध्ये त्यांनी चक्क भाजपसोबत निर्मला सीतारामन, नरेंद्र मोदी यांनाही टॅग करण्याचा खवचटपणा दाखवला. म्हणजे जे नेपाळमध्ये घडले, तसेच भारतातही घडू शकते, असे उपरोधिकपणे सूचवण्याचा राऊतांचा हा देशघातकी करंटेपणाच! म्हणा, बाह्यसंकटांवरून आपल्या देशालाही अशाच संकटात पाहण्याची सुप्त इच्छा राऊतांच्या मनी काही पहिल्यांदाच जागृत झाली, असेही नाही. बांगलादेशमध्ये शेख हसीना सरकारविरोधात झालेल्या आंदोलनावेळीही 'बांगलादेशच्या परिस्थितीवरून आपल्या राज्यकर्त्यांनी धडा घ्यावा' असे बाष्कळ विधान राऊतांनी केले होतेच. त्यामुळे श्रीलंका असो, बांगलादेश अथवा नेपाळ, या देशांची, या देशातील एकूणच परिस्थिती, देशातील नेत्यांच्या तर्हा आणि मुळात लोकशाहीची तुलना ही भारताशी कदापि होऊच शकत नाही, हे न कळण्याइतपत राऊत नक्कीच अज्ञानी नाहीत. पण, तरीही केवळ राजकीय कंड शमवण्याच्या खुमखुमीपोटी असे देशाचे वारंवार अहित चिंतणे, हे सर्वस्वी घृणास्पदच. त्याहीपेक्षा भारतावर अशा संकटांची वीज कोसळेल, अशी मनोमन कामना करणारे राऊतांसारखे लोकप्रतिनिधी या देशाच्या संसदेत आहे, हे या देशाचेच दुर्दैव!

भारताचे हितचिंतक अफगाणिस्तान, पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, म्यानमार, श्रीलंका, मालदीव असे भारताचे एक भूटान वगळता चारही दिशांना असलेले शेजारी देश गेल्या दशकभरात प्रचंड राजकीय आणि आर्थिक उलथापालथीला सामोरे गेले. यापैकी काही देश आज सावरण्याच्या मार्गावर आहेत, तर अजूनही काही देश निर्माण झालेल्या नेतृत्व पोकळीमुळे चाचपडताना दिसतात. पण, या सगळ्यात भारत हा एकमेव अपवाद. एकीकडे भारताचा शेजार अस्थिरतेच्या महासागरात अशा गटांगळ्या खात असताना, भारत सर्व संकटांना तोंड देत ठामपणे, निश्चिलपणे अविरत उभा आहे आणि हे सर्वस्वी शक्य झाले आहे, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वामुळे आणि दूरदर्शी ध्येय-धोरणांमुळेच! मागील ११ वर्षांच्या काळावर नजर टाकली असता, भारतासमोरही कित्येक आव्हानांचा डोंगर आ वासून समोर उभा होताच. काँग्रेसमुळे जनमनात निर्माण झालेल्या सरकारच्या भ्रष्टाचारवादी प्रतिमेपासून ते शासकीय स्तरावरील अनागोंदीपर्यंत मोदींसमोर सत्तासूत्रे स्वीकारताच, अडचणी मी म्हणून उभ्या होत्याच. पण, जनतेने भाजपवर दाखवलेला विश्वास मोदींना सार्थ ठरविला. कृषी, उद्योग, पायाभूत सुविधा, आर्थिक सर्वसमावेशीकरण, डिजिटल इंडियासारख्या योजनांतून मोदींनी सर्वांगीण विकासाची मुहूर्तमेढ रोवली. 'कोविड' काळातही वैद्यकीय सामग्रीपासून ते मोफत लसीकरण, धान्यवाटपापर्यंत प्रत्येक आव्हानाला मोदी सरकार तितक्याच समर्थपणे सामोरे गेले. यादरम्यान विरोधकांचे वारपलटवारही मोदींनी तितक्याच सक्षमपणे परतावून लावले. अयोध्येत भव्यदिव्य राम मंदिर उभे राहिले. पाकिस्तानला सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईकमधून धडा शिकवत सामर्थ्यशाली भारताचे दर्शनही आपण जगाला घडविले आणि असे बरेच काही... आताही ट्रम्प यांच्या व्यापारयुद्धाची झळ जगाला सहन करावी लागत असताना, मोदी सरकार संकटातून संधी शोधण्यासाठी प्रयत्नशील आहे. एकूणच ११ वर्षांत भारताची, भारतीयांची जगभरात मान उंचावली ती मोदी सरकारमुळेच. त्यामुळे भारताचे हितचिंतक कोण आणि विघ्नचिंतक कोण, हे जनतेलाही ठाऊक आहेच. तेव्हा, भारताची अवस्था बांगलादेश, श्रीलंकेसारखी झाली नाही आणि आताही ती नेपाळसारखीही होईल, हे स्वप्नरंजन नकोच!

# बेगड

कथा
राजीवलोचन



मोखेड्यापासून थोड्याशा अंतरावर असलेलं पिंपळगाव तसं लहानसं, पण निसर्गसंपन्न. वडाच्या पारावर संध्याकाळी निवांत गप्पा झडायच्या. या गावातली खरी ओळख होती 'बेगड' म्हणजेच गावाची बैलजोडी. गावरान भाषेत बेगड म्हणजे एकजुटीची, समजुतीची आणि कष्टाची प्रतीक असलेली बैलजोडी. ही जोड 'नाग्या' आणि 'लाल्या'ची होती. ही जोडी होती हरिभाऊंची.

हरिभाऊ गावातले एकमेव वाचनप्रिय शेतकरी. शेत आणि दोन मुलं ही त्यांची संपत्ती; पण त्यांच्या हृदयात या बैलजोडीसाठीही खास जागा होती. प्रेमाने वाढवलेली ही जोड होती. नाग्या जरा शांत, शिस्तीत काम करणारा तर लाल्याचा स्वभाव हट्टी पण दमदार. एकमेकांची साथ इतकी पक्की की रानात नांगरताना नांगरणं थांबतं, पण त्यांची एकसंध चाल थांबत नसे. गावातली लहान मुलं त्यांना 'नागलाल' म्हणून हाक मारायची आणि दोघेही मान हलवून प्रतिसाद द्यायचे. पावसाळ्यात रानात उभे असताना त्यांच्या अंगावर पडणारे थेंब त्यांना थांबवत नसत. उन्हाळ्यात पाण्याच्या हंड्यासाठी साखर आणि मीठ दिलं की पुन्हा जोमात कामाला लागायचे.

एक वर्ष फारच कठीण आलं. पावसाने पाठ फिरवली. जमीन कोरडी पडली, विहिरी आटल्या आणि बैलांना चारा मिळेनासा झाला. हरिभाऊंचं मन बेचैन झालं. बैलांना दोन वेळा जेवण द्यायचंही अवघड झालं. मुलांचे शालेय खर्च, बियाण्यांचे उधार, सगळं डोक्यावर. एका संध्याकाळी हरिभाऊंनी चटईवर बसून पत्नीला विचारलं, ''गिरी, हे आपले बेगड विकायचे का तुकाराम शेटला. दोन लाख देतो म्हणतो.'' पत्नी गिरीबाई क्षणभर गप्प झाली. ती बैलजोडी म्हणजे हरिभाऊंचं मन होतं, हे तिलाही ठाऊक होतं. तरी हळूच म्हणाली, ''शेवटी पोरांची भूक आणि शाळा महत्त्वाची, पण तूच ठरव.'' हरिभाऊ तळमळला. सकाळ झाली. नागलाल अंगणात उभे होते. हरिभाऊंच्या डोळ्यात नकळत पाणी आलं. त्यांनी त्यांच्या कपाळावरून हात फिरवला. काही क्षणात त्यांनी निश्चय केला- 'माझ्या जोडीदारांना विकणार नाही. गरज पडली तर मी स्वतः मजुरी करीन, पण नागलाल माझेच राहणार!' त्या रात्री हरिभाऊ गडबडीत गावातल्या समर्थ शेतकरी गटाच्या बैठकीला गेले. तेथे गावातल्या काही तरुण शेतकऱ्यांनी ठरवलं चारा छावणी सुरू करायची.

कोणाच्या बैलांना विक्रीला जाऊ द्यायचं नाही. शासनाकडे अर्ज करून एकोप्याने सगळ्यांची जनावरं वाचवायची. हरिभाऊंचा आत्मविश्वास वाढला. त्यांनी आपल्या बैलजोडीची ओळख सांगून पुढाकार घेतला. गावातल्या सगळ्या शेतकऱ्यांनी हातमिळवणी केली. १५ दिवसातच गावाच्या जरा बाहेर एक चारा छावणी उभी राहिली. प्रत्येकाच्या जनावरांना वेळेवर चारा-पाणी मिळू लागलं. हरिभाऊ रोज सकाळी नागलालला घेऊन रानात जात. जरी शेती नांगरण्यासारखी नव्हती, तरी दोघांची एकत्र फिरण्याची सवय जपली. एके दिवशी जिल्ह्याच्या कृषी अधिकाऱ्यांनी गावाला भेट दिली. त्यांनी बेगड पाहिलं, त्यांच्या ताकदीचं आणि संयमाचं कौतुक केलं. छावणीतील उपक्रमाला राज्य शासनाची मदत मिळाली आणि गावातल्या शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळाला. गावातल्या मुलांना 'नागलाल' म्हणजे कष्टाचे, सोबतीचे आणि नात्याचे प्रतीक वाटू लागले.

शिक्षकांनी एकदा विचारलं, ''माणसाने कोणासारखं बनावं?'' तर एका मुलीने उत्तर दिलं, ''नाग्या आणि लाल्या सारखं. जे सोबत चालतात, कधी न थकता, न थांबता.'' दोन वर्षांनी पावसाळा पुन्हा भरभरून आला. रानं हिरवीगार झाली. नांगरणीचं काम सुरू झालं. हरिभाऊ पुन्हा त्यांच्या बेगडाला घेऊन शेतात गेले. त्यावेळी नाग्या आणि लाल्या नेहमीसारखेच, पण जरा वयस्कर वाटत होते. शेतात नांगरणी करताना हरिभाऊ थांबले. त्यांनी वाकून त्यांच्या गळ्याभोवती हात घातला. डोळे भरून आले. 'तुमच्यामुळेच मी माणूस म्हणून जगलो रे' असं म्हणून त्यांनी कपाळ टेकवलं. आजही पिंपळगावात वडाच्या पारावर नागलालची गोष्ट सांगितली जाते. गावात एखादी बैलजोडी फार समंजसपणे काम करताना दिसली की गावकरी म्हणतात, 'खरं बेगड पाहायचं असेल, तर हरिभाऊंचं नागलाल पाहा.' कधी कधी आपली शान गाडीत नाही, तर जोडीच्या जोडीदारीत लपलेली असते.

## आई

भल्याबुऱ्याची जाण तरीही,
मुलांपुढे का हरते आई
सज्जन, दुर्जन असो
कुणीही,
प्रेम सारखे करते आई
जमीन जुमला वाट्याला मग
ज्याचा त्याचा त्याला मिळते
वाटणीला मग बाप उरतो
आणि फक्त ती उरते आई

त्या धगधगत्या उन्हातान्हात,
पदराने सावरते आई
त्या थंडीने कुडकुडल्यावर,
पदराने पांघरते आई
चौ भिंतींच्या संसाराला
उभे थाटणे सोपे नसते
बाप घराचा पाया होतो,
छप्पर होते, वरते आई
हट्ट कधी ना करता आले,

मुलांपुढे ना जगता आले
मारून इच्छा अपुल्या साऱ्या
कामापुरता उरते आई
ईश्वर अल्लाह भगवान ही
आठवते का सांगा तेव्हा
ठेच लागता पायाला मग
डोक्यामध्ये स्मरते आई

मिलिंद इंगळे





# माणुसकी संपताना...

समाजभान

**ओंकार मुळ्ये**

अफगाणिस्तानमध्ये एका आठवड्यात तिसऱ्यांदा भूकंप झाला असून आतापर्यंत २ हजार, २०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला, हजारो लोक जखमी झाले, गावंच्या गावं उद्ध्वस्त झाली आहेत. निश्चितच ही एक नैसर्गिक आपत्ती होती मात्र, अफगाण महिलांसाठी ही नैसर्गिक न राहाता, मानवनिर्मित आपत्तीदेखील ठरली आहे. तालिबानमधील कठोर 'शरिया' कायद्यामुळे, महिलांपर्यंत आवश्यक मदत वेळेवर पोहोचलीच नाही. यातूनच तालिबानी राजवटीतील महिलांची भयावह स्थिती पुन्हा जगासमोर आली आहे.

तालिबानी कायद्यानुसार परपुरुष महिलांना स्पर्श करू शकत नाहीत, यामुळेच तालिबान मधील पुरुष महिलांना सहकार्य करण्यास नकार देत असल्याचे चित्र अफगाणिस्तानात दिसत होते. अफगाणिस्तानातील पर्वतीय भागात अलीकडेच झालेल्या विनाशकारी भूकंपामुळे, मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, आतापर्यंत ४९ गावांमधील ५ हजार, २३० घरे पूर्णतः उद्ध्वस्त झाली असून, ६७२ घरांचे नुकसान झाले. परंतु, ४४१ बाधित गावांपैकी ३६२ गावांपर्यंत मदत आणि बचाव पथके अद्याप पोहोचलेलीच नाहीत. ढिगाऱ्यातून मृतदेह बाहेर काढताना मृतांचा आकडा वाढू शकतो, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. संयुक्त राष्ट्रांचा अंदाज आहे की, या आपत्तीमुळे सुमारे पाच लाख लोक प्रभावित झाले आहेत. यापैकी बरेचजण निर्वासित आहेत, ज्यांना अलीकडेच पाकिस्तान आणि इराणमधून जबरदस्तीने परत आणण्यात आले होते. डोंगराळ आणि दुर्गम भागातील रस्ते खराब झाल्यामुळे, मदत पथकांना बाधित गावांपर्यंत पोहोचणे निश्चितच कठीण जात आहे. भूकंपानंतर मलब्याखाली अडकलेल्या महिलांना वाचवण्याचा प्रयत्नही झाला नसल्याचे समोर येत आहे. वडील, पती, भाऊ किंवा मुलगा यांच्या व्यतिरिक्त परपुरुष कुठल्याही महिलेस हात लावू शकत नाही, असे तालिबानचा कठोर कायदा सांगतो. परिणामी महिलांना तासन्तास मलब्याखालीच थांबावे लागले. याठिकाणी एक समस्या अशी की, तेथील बचावकार्यात महिलावर्ग कुठेच सक्रिय नव्हता. कारण, तालिबानने गेल्या काही वर्षांत महिलांना वैद्यकीय शिक्षण, नोकरी आणि सार्वजनिक जीवनापासून दूरच ठेवले. अनेक महिला जखमी अवस्थेतही कोपऱ्यात बसवून ठेवल्या गेल्या कारण, त्यांच्यावर उपचार करणाऱ्या महिला डॉटर उपलब्ध नव्हत्या. अफगाणिस्तानमधील संयुक्त राष्ट्र महिला प्रतिनिधी सुसान फर्ग्युसन यांनी सांगितले की, महिलांच्या गरजा या मदत व पुनर्वसनात प्राथमिक असायला हव्यात. पण, प्रत्यक्षात महिलांना बचाव आणि मदत या दोन्हींपासून वंचित ठेवण्यात आले आहे.

आज अफगाण महिला जगातील सर्वाधिक कठोर लैंगिक बंधनांमध्ये जगत असल्याचे आपण पाहतो. गेल्या चार वर्षांत तालिबानने अफगाणिस्तानच्या नागरिकांवर 'शरिया'ची कठोर व्याख्या लादल्याने, महिलांचे शिक्षण, रोजगार आणि स्वातंत्र्य हिरावून घेतले गेले. मुलींना शाळा आणि विद्यापीठात जाण्याची सुद्धा मनाई आहे. बहुतेक नोकऱ्यांमध्ये महिला काम करू शकत नाहीत तसेच, स्वयंसेवी संस्था किंवा आंतरराष्ट्रीय संस्थांमध्येही सहभागी होऊ शकत नाहीत. उद्यान, व्यायामशाळेसारखी सार्वजनिक ठिकाणेदेखील त्यांच्यासाठी बंदच आहेत. त्यामुळे जेव्हा आपत्ती आली, तेव्हा महिलांकडे न बचावकर्मी होत्या, न महिला डॉटर, न समानतेने मदत मागण्याचा अधिकार. अफगाणी महिलांच्या बाबतीत घडलेला प्रकार हा केवळ अपघात नव्हता, तर गेल्या चार वर्षांपासून तालिबानच्या कठोर शासनाचे थेट परिणाम होते.

तालिबानसारख्या दहशतवादी गटांनी 'शरिया' संकुचित स्वरूपात राबवला आहे. परिणामी माणुसकी, करुणा, समानता या मूलभूत मूल्यांना धक्का बसतो. भूकंपासारख्या आपत्तीमध्ये धर्म, जात, लिंग यापेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मानवाचा जीव वाचवणे. जीव वाचवणे हे प्रत्येक धर्मात सर्वोच्च पुण्य मानले गेले आहे. जर एखादा नियम जीव वाचवण्याऐवजी त्याला धोका निर्माण करत असेल, तर तो नियम मानवी हिताशी विसंगत ठरतो. इतिहासात इस्लामी विद्वानांनी 'शरिया'चे अर्थ लावताना दया, न्याय आणि करुणा यांना प्राधान्य दिले पण, तालिबानने त्याचा कठोर राजकीय वापर करून, महिलांवर निर्बंध लादले. त्यामुळे 'शरिया' हा धर्मनियम न राहता, दडपशाहीचे साधन बनला आहे.



प्रबंधांची बीजे

**श्रीरंग हिर्लेकर**



# परिणामकारक लेखनाची सप्तपदी

आ(६ वर)श्चर्य वाटेल, पण अनेक वर्षांपूर्वी एका प्रतिष्ठित लेखकाने 'विनोदाचे शास्त्र' या विषयावर व्यासंगपूर्ण प्रबंध लिहून आचार्य पदवी प्राप्त केली होती. याचप्रमाणे लेखन कसे करावे याचे मार्गदर्शन हाही एक प्रबंधाचा विषय होऊ शकतो. लेखन करावयाचे म्हटले की, अनेकांना ही आपल्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे असे वाटते. अगदी सुशिक्षित म्हणवणारेही चार ओळी लिहिताना गडबडतात. साधे घरगुती पत्र किंवा खरेदीची यादी करतानाही अडखळतात. भरपूर वेळ घेऊन, चार-पाच कागद फाडून फेकल्याशिवाय त्यांचे होत नाही. यानंतरही महत्त्वाचे काही लिहावयाचे राहतेच. लिखाणात संदिग्धता दिसते. साधी बँकेची स्लिप किंवा एखादा फॉर्म कोणाचीही मदत न घेता भरणे तर त्यांच्या दृष्टीने दिव्यच.

वास्तविक फॉर्म भरणे 'रिकाम्या जागी योग्य शब्द भरा' इतके सोपे असते. शालेय अभ्यासक्रमात याची तयारी करून घेतलेली असते. मित्राला पत्र लिहा, वडिलांना पत्र लिहून पैसे मागवा, सहलीचे वर्णन करा, सुटीचा अर्ज करा, छत्रीचे आत्मवृत्त लिहा, निबंध लिहा इ. हे लेखनाचे झाले; पण अनेकांना अगदी सोप्या भाषेत लिहिलेलेही कळत नाही. कारण अक्षरे, त्यापासून तयार झालेले शब्द, वाक्ये, ध्वनित होणारा अर्थ यांची संगती लावून विषय अभ्यासणे ही कला आहे. शब्दांचे अर्थ ऐकण्या-बोलण्यामुळे परिचित झालेले असतात, पण तेच शब्द कागदावर दिसले की तारांबळ उडते. यामागे मानसशास्त्रीय आणि मेंदूच्या कार्यपद्धतीचे कारण आहे. शब्दाचे नाते कानाशी असल्याने अनेकांना कागदावरील त्याचे दृश्य रूप आकलन होण्यास अडचण जाणवते.

कल्पनेतील आशय हा परा, पश्यन्ति, मध्यमा हे तीन टप्पे ओलांडत जीभेवरून बाहेर पडतो. येथे जीभेऐवजी लेखणी असते. कल्पनेतील आशयाला अक्षरांच्या आकृतिबंधात उमटवण्याची क्रिया करावी लागते. बोलताना जिभेने आणि ऐकताना कानांमार्फत शब्द जितके सहज आत्मसात होतात तितके डोळ्यांनी त्या शब्दांच्या अक्षराकृती कागदावर वाचून अर्थबोध होणे हे कठीणच. ज्यांना लेखनाची सवय आहे त्यांची सवय विकसित व्हावी, लेखन अधिक दर्जेदार व्हावे, प्रतिपाद्य विषय वाचकाला नेमका कळावा, 'लेखकाचे हृदयीचे वाचकांचे हृदयी जावे' या दृष्टीने काही महत्त्वाचे मुद्दे सांगणे या दृष्टीने आता विचार करू...

**१) बोलण्यापेक्षा लिहिणे सोपे:** पुरेसे स्टेज डेअरिंग असले, तरी बोलण्यापेक्षा लेखन सोपे आहे. कारण शब्द हे असे शस्त्र आहे की ते परत घेता येत नाही. '**यद् गत्वा न निवर्तन्ते**' गेलेला जीव परत येत नाही तसाच उच्चारलेला शब्दही परत येत नाही. लेखनाचे तसे नसते.

संगणक आल्यापासून तर अजिबातच नाही. लिहिलेला शब्द खोडणे, त्या जागी नवीन लिहिणे, सबंध वाक्यच काय, पण परिच्छेदही बदलणे, वरचा खाली आणि खालचा वर करणे हे लेखनात शक्य आहे. वक्तृत्वात जे काम चेहऱ्यावरील हावभावाचे, शब्दफेकीचे, तेच लेखनात योग्य विरामचिन्हे, हव्या त्या शब्दाला ठळक करणे, इटॅलिक अक्षरांमुळे होते. त्यामुळे लेखकाच्या मनातील भाव मांडणे सोपे होते.

**२) अभ्यासेवीण बोलू नये:** 'प्रकट होओनि नासावे, बरे नव्हे।' आपल्याला काही सांगावयाचे आहे त्याचा पुरेसा अभ्यास असणे ही सर्वात प्राथमिक गोष्ट आहे. आडातच नसेल तर पोहोऱ्यात कोठून येणार? हे म्हणजे एका आंधळ्याने दुसऱ्याला वाट दाखवण्यासारखे होईल. लेखन कसे करावे यावर समर्थांनी विस्तृत लिहिले आहे. 'दिसामाजी काहीतरी ते लिहावे' असे सांगणारे समर्थ प्रसंगी 'अखंडित वाचीत जावे' असे लिहितात.

**३) चिरस्थायी लेखन :** कागदाची खरी किंमत साक्षरापेक्षाही निरक्षरालाच अधिक असावी. निरक्षर लोक कागद खूप जपून ठेवतात. लेखन हे यावतचंद्रसूर्यदिवाकरौ शाश्वत राहते. म्हणून फक्त अक्षरओळख असलेले सही करताना फार आढेवेढे घेतात आणि केलीच तर आपण काही भलत्याच गोष्टीला मान्यता तर दिली नाही, या शंकेने अस्वस्थ होतात.

**अर्थसंकेत पाळावेत :** अतिपरिचयात् अवज्ञेमुळे सुशिक्षित मात्र अतिशय बेपर्वाईने लिहितात. आपण काय लिहितो, त्यातून कोणते अर्थ व्यक्त होतात याकडे त्यांचे लक्ष नसते. शब्दाला अनेक प्रकारे अर्थ प्राप्त होतात. सरल अर्थ, लाक्षणिक अर्थ, व्यंगार्थ इ. त्यामुळे अर्थ जरी तोच असला, तरी कोणता शब्द कधी योजावा, याचे भान हवे. उदा. शुभ पूजेनंतर केली जाते ती उत्तरपूजा तर श्राद्धविधीतील पूजेला उत्तरक्रिया म्हणतात. श्राद्धात थोड्या अन्नाला पिंडाएवढा म्हणणे ठीक, पण लग्नाच्या पंगतीत पिंडाएवढे वाढा म्हणणे चूकच. हे म्हणजे सिगारेट लायटरचा उपयोग देवापुढील निरंजन लावायला करणे होईल.

**४) विषयाकडे लक्ष द्यावे :** ध्रुवपद सोडू नये. त्याच अनुषंगाने लिहावे. शीर्षक म्हणजे तंबोऱ्याचा स्वर किंवा काळी पांढरी पट्टी, रागाचे कायदे. लक्ष्मणरेषा ओलांडू नये. नाहीतर लेखनाचा पदर ढळतो.

लिहिण्याच्या ओघात अनेकदा विषयांतर होते. इतके की, 'अरेबियन नाईटस्' कथेप्रमाणे एकातून एक, त्यातून दुसरी- तिसरी अशी भटकंती होते, मूळ कथावस्तू हरवते. जे लिहावयाचे ते नेमके आणि नेटके लिहावे. लेखन पूर्ण होताच पूर्वी ठरलेल्या शीर्षकात थोडा बदल करावा लागतो. तो करावा. मात्र हे आकर्षक पॅकिंगमध्ये वस्तू सादर करावी इतपतच असावे.

**५) सहजतेत सौंदर्य :** अनेक संदर्भ देऊन आपल्या विद्वत्तेची जाहिरात करण्याची अनेकांना हौस असते. तसे करणे टाळावे. काही विशिष्ट ठिकाणी संदर्भ द्यावेच लागतात. उदा. कायदेशीर गोष्टी, आकडेवारी. ते आवश्यक असते. भाषेत कृत्रिमता नको. कौतुक करावयाचे तर साध्या सोप्या भाषेत करावे. मोठमोठी विशेषणे वापरू नयेत. नाटकीपणा कोणता आणि मन:पूर्वक कोणते ते चाणाक्ष वाचक ओळखतात. अलंकार वापरावेत, पण ते बोजड न वाटता भाषासौंदर्य वाढवणारे असावेत.

मोरोपंत आणि गडकरी यांच्यावर होणारा आरोप खरा आहे. दोघेही अतिशय जड लिहीत. विद्वानांचे ठीक, पण सामान्य वाचकांची त्यामुळे ओढाताण होते. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांवरही आरोप केला जातो की, ते एकात एक खूप दृष्टांत किंवा उदाहरणे देत. अर्थात त्यामागे कारणे होती. त्यांच्यासमोर ज्ञानी पंडितही होते आणि सामान्य शेतकरीही होते.

**स्वत:ची शैली विकसित करावी :** अनुकरण करू नये. सुरुवातीच्या काळात सैगलचे अनुकरण मुकेशने केले. नूरजहाँचे लता मंगेशकरांनी केले; पण लवकरच दोघांनीही स्वत:ची शैली विकसितच नव्हे तर प्रस्थापित केली. सुरुवातीच्या काळात पु. ल. देशपांडेंमध्ये गडकरींचा भास व्हायचा. उदा. त्यांचे अंगुस्तान विद्यापीठ, रेल्वे, किंवा पानवाला हे लेख. पुढे पु.ल. बदलले. मी तर असे म्हणेन की, सुरुवातीला दोघांत इतके साम्य होते की, दुर्दैवाने गडकरी जर लवकर गेले नसते तर त्यांनी उत्तर आयुष्यात पु.लं. सारखे लिहिले असते.

गडकरी, अत्रे आणि पु.ल. या तिघांचेही लेखनातील गोत्र एकच, पण प्रवर निराळे. प्रवर्तन करते ते प्रवर. म्हणून साम्य असावे, पण अनुकरण नको.

**६) वाचकांची उंची :** आपला वाचक वर्ग कोणता, याचे लेखकाने भान ठेवावे. 'अहं ब्रह्मास्मि' या पाच अक्षरातून व्यक्त होणारे तत्त्वज्ञान समजणारे ऋषी परमज्ञानी होते. तेच तत्त्वज्ञान पुढे ईशावास्यात २० श्लोकात विस्तारले. तुलनेने अर्जुन कमी तयारीचा म्हणून त्याच्याकरिता तेच ७०० श्लोकात कृष्णाने विकसित केले आणि माउलींनी तेच सर्वसामान्यांकरिता ९००० ओव्यात पसरवले. अमृतानुभव लिहिणारे ज्ञानेश्वर तेच, त्यांनीच ज्ञानेश्वरी लिहिली आणि हरिपाठही त्यांनीच सांगितला.

तिन्ही ठिकाणची शैली, भाषाप्रयोग इतकी भिन्न की, हे सर्व लिहिणारे ज्ञानेश्वर एकच की तीन अशी भ्रांत व्हावी. भाषेवर अशी पकड पाहिजे की, वाचकांची निकड बघून लिहिता आले पाहिजे.

**७) भाषाशुद्धी आणि व्याकरण :** हा सर्वांत गंभीर आणि तरीही सर्वात जास्त दुर्लक्षित मुद्दा आहे. एकच भाषा, पण गावोगावी तिचे व्याकरण आणि स्वरूप बदलते. एका प्रांतातील वाक्प्रयोग इतरत्र समजणे अवघड होते. त्यांची कारणे, कोण चूक कोण बरोबर हा विषय येथे नाही, पण तरीही व्याकरणाचे नियम मोडू नयेत. भाषेचा उपयोग जरी आपले म्हणणे दुसऱ्याला समजावणे हा असला, तरी व्याकरण पाळले नाही तर भाषा वैश्विक न होता व्यक्तिगत आणि अस्ताव्यस्त होईल. अनेकदा काही शास्त्रीय संदर्भ येतात. पारिभाषिक शब्दांचा अर्थ स्पष्ट करावा.

वृत्तपत्रातील हौशी कथाकारांमध्ये एक दोष नेहमी लक्षात येतो की, आधी तृतीय पुरुषी निवेदन स्वरूपात असलेली कथा अचानक रूळ बदलून प्रथमपुरुषी होते. कर्तरी आणि कर्मणी प्रयोगांची सरमिसळ दिसते. घरगुती कथेत मागचा-पुढचा संदर्भ न देता एकदम एखाद्या व्यक्तीचे नाव येते.


मध्येच वाक्य येते- 'संपदाने असे म्हटले.' वाचकाला काय कळणार की, संपदा ही कोणाची कोण? त्यामुळे कथा लिहिताना हे गृहीत धरून लिहावे की, वाचक हा लेखकाच्या घरगुती नातेसंबंधाशी अपरिचित आहे. मूळ विषयाला येण्यापूर्वी अनेकदा पाल्हाळ दिसते. ते नसावे आणि एकदम विषयावरही येऊ नये. थोडक्यात म्हणजे आपला वाचक वर्ग कोण ते लक्षात घेऊन लिहावे तरच लेखन सुगम आणि प्रभावी होईल.

विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**

राजकारण करण्यासाठी एक वेगळा स्वभाव लागतो. न्यायमूर्ती रानडे आणि लोकमान्य टिळक हे ज्ञानपिपासू आणि ज्ञानप्रसारक होतेच; पण त्यांनी आपली ऊर्जा राजकीय चळवळीकडे वळवली. रामकृष्णपंत हे देखील ज्ञानपिपासू आणि ज्ञानप्रसारक होते. आपल्या दीर्घ आयुष्यात त्यांनी अखंड ज्ञानसाधना केली. ऐतिहासिक घटनांचा प्रमाणशुद्ध अन्वयार्थ लावून प्राचीन भारताच्या इतिहासाची मांडणी कशी करावी, याचा आदर्श घालून दिला. नुकतीच त्यांची स्मृतिशताब्दी झाली.

# सर रामकृष्णपंत : स्मृतिशताब्दी



१८ जुलै १८५७ रोजी मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. त्याचे संस्थापक जॉन विल्सन, जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेट आणि डॉ. भाऊ दाजी. जॉन विल्सन हा विद्यापीठाचा पहिला कुलगुरू बनला. विद्यापीठ हे इंग्लंडमधल्या युनिव्हर्सिटी ऑफ लंडनच्या कित्यानुसार काम करेल, असे ठरवण्यात आले. मुंबईत या आधीच दोन कॉलेजेस निघालेली होती.

१८३५ साली एलफिन्स्टन कॉलेज सुरू झाले होते. हे विद्यार्थ्यांना बॅचलर ऑफ आर्टस्ची पदवी देत असे, तर ग्रँट मेडिकल कॉलेज १८४५ साली सुरू होऊन ते वैद्यकीय पदवी देत असे. १८५७ साली विद्यापीठ स्थापन झाल्यावर ही दोन्ही कॉलेजेस् विद्यापीठाला जोडण्यात आली. पुढे १८६२ साली मुंबई विद्यापीठातून पहिले चार विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडले. त्यातले एक होते महादेव किंवा माधव गोविंद रानडे. पुढच्या काळात ते न्यायमूर्ती रानडे या नावाने प्रख्यात झाले.

दुसरे होते रामकृष्ण गोपाळ भांडारकर. न्यायमूर्ती रानड्यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याबद्दल खुद्द लोकमान्य टिळक लिहितात की, 'थंड गोळा होऊन पडलेल्या महाराष्ट्राला जिवापाड मेहनतीने पुन्हा जिवंत करण्याचे काम सर्वप्रथम रानड्यांनी केले.' इतिहास, भाषा आणि धर्म यांच्या संदर्भात हेच काम भांडारकरांनी केले, असे म्हणता येईल. भांडारकर घराणे मूळचे वेंगुर्ल्याचे. त्यांचे मूळ आडनाव पत्की. परंतु त्यांचा कोणी एक पूर्वज भांडाराचा म्हणजे खजिन्याचा प्रमुख असल्यामुळे भांडारकर हे आडनाव रूढ झाले. भांडारकर १८६२ साली मुंबई विद्यापीठाचे बी. ए. आणि लगेच १८६३ साली एम. ए. झाले. म्हणजे इंग्रज सरकारने सुरू केलेल्या नव्या विद्यांमध्ये ते पारंगत झाले. पण या आधी ते पुण्यात आणि मुंबईत परंपरागत भारतीय विद्याही उत्तम प्रकारे शिकले होते. सांख्य, न्याय, वैशेषिक, योग, पूर्व मीमांसा आणि उत्तर मीमांसा (म्हणजेच वेदांत) ही भारतीय विद्येची सहा शास्त्रे किंवा षट् दर्शने आहेत. यापैकी न्याय आणि वेदांत यांचा अभ्यास भांडारकरांनी पारंपरिक पद्धतीने शास्त्री पंडितांजवळ केलेला होता. त्याचप्रमाणे व्याकरण, संस्कृत, पाली, अर्धमागधी या भाषांचाही त्यांचा उत्तम अभ्यास होता.

थोडक्यात रामकृष्ण भांडारकर हा तरुण पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा दोन्ही विद्यांमध्ये पारंगत झाला. त्या वेळेला अनेक युरोपीय पंडित भारतासह पूर्वेकडच्या अनेक देशांचा, भाषांचा, संस्कृतींचा अभ्यास करून, त्यांच्या मताने त्यांचा अर्थ लावण्यात गुंतलेले होते. त्यांच्यामध्ये ब्रिटिश होते. फ्रेंच होते आणि जर्मन सुद्धा होते. त्यांना खरीखुरी ज्ञान मिळवण्याची इच्छा अगदीच नव्हती असे नव्हे; पण पूर्वेकडच्या देशांपेक्षा आमची पश्चिमी संस्कृती भाषा जरा जास्त श्रेष्ठ आहेत, असे दाखवून देण्याचा हेतू जरा जास्त होता. धर्मप्रचाराचा हेतूही होताच. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर पुण्या-मुंबईतले पाद्री लोक संत तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास करून, त्यांना हवा तसा अर्थ लावून, संत तुकाराम हे कसे हिंदुधर्म विरोधी होते, असे सिद्ध करू पाहत होते. भांडारकरांनी सर्वप्रथम संस्कृत भाषेची दोन शालेय पाठ्यपुस्तके लिहिली. त्यामुळे नव्या इंग्रजी पद्धतीच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संस्कृत शिकण्याची उत्तम सोय झाली. पुढे ते पुण्याच्या प्रसिद्ध डेक्कन कॉलेजमध्ये संस्कृतचे प्राध्यापक झाले. संस्कृत भाषा आणि एकंदरीतच पौर्वात्य विद्या किंवा प्राच्य विद्या यांच्या संदर्भात भांडारकरांनी पद्धतशीर काम सुरू केले.

उपलब्ध साधनांची चिकित्सा, अभ्यास, जोडणी कशी करावी आणि कसल्याही अभिनिवेशाच्या आहारी न जाता निष्पक्ष, शास्त्रीय निष्कर्ष काढून त्याची मांडणी कशी करावी, याची एक उत्कृष्ट पद्धत त्यांनी विकसित केली. सन १८७४ साली लंडनमध्ये 'इंटरनॅशनल काँग्रेस ऑफ ओरिएंटलिस्ट' म्हणजे आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या विशारदांची परिषद भरली होती. इजिप्तच्या पिरॅमिडस्‌मध्ये जी चित्रलिपी सापडते तिला हायरोग्लीफ्स असे म्हणतात.

सन १८०१ मध्ये इजिप्तवर चाल करून गेलेल्या नेपोलियनच्या फ्रेंच सैन्याला एक शिलालेख सापडला. त्याला म्हणतात 'रोझेटा स्टोन.' या शिलालेखामुळे हायरोग्लीफ्सचा उलगडा करता आला. तो रोझेटा स्टोन या लंडनच्या परिषदेत मुद्दाम सर्वांना पाहायला ठेवण्यात आला. विशेष म्हणजे त्याच परिषदेत भांडारकरांचा नाशिक येथील सातवाहनांच्या शिलालेखावरील शोध लेख वाचला गेला. लक्षात घ्या, हा १८७४ चा काळ आहे. या काळात इंग्रज सरकार भारतातली आपली सत्ता अधिकाधिक दृढ करण्याच्या प्रयत्नात होते. त्याच वर्षी महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. पण त्याकडे दुर्लक्ष करून इंग्रज सरकार भारताची लूट करण्यात मग्न होते. आणि त्याच वर्षी गुलाम भारतातल्या एका विद्वानाचा महत्त्वपूर्ण लेख खुद्द लंडनमधल्या एका परिषदेत वाचला जात होता.

धर्म हा भांडारकरांच्या चिंतनाचा खास विषय होता. बायबलमध्ये एकच देव आहे. एकाच देवाची उपासना आहे. आमच्याकडे अगणित देव आणि असंख्य उपासना पद्धती आहेत. त्यामुळे पाद्री लोक आम्हाला भारी पडतात. म्हणून आपणही एकेश्वरी उपासना पंथ काढून पाद्रींना उत्तर दिले पाहिजे. अशा काहीशा भावनेतून बंगालमध्ये राजा राममोहन राय यांनी ब्राह्मो समाज काढला. त्यांचे एक अनुयायी केशवचंद्र सेन यांनी महाराष्ट्रात दौरा करून प्रवचने दिली. त्या प्रभावातून महाराष्ट्रात 'प्रार्थना समाज' स्थापन झाला. रामकृष्णपंत १८६९ साली त्याचे सभासद झाले. पण वेद उपनिषदे, गीता, साधुसंतांची वचने यांचा आधार घेऊन, स्वत: पदे, कविता, रचून संस्कारविधी तयार करून प्रार्थना समाजाची वैचारिक तत्त्वे पक्की करण्याचे काम भांडारकरांनी केले.

भांडारकरांचे संशोधन कार्य जसे महाराष्ट्राला आवडले, तसे हे धार्मिक कार्य मात्र फारसे पसंत पडले नसावे. कारण सर्वशक्तिमान परमेश्वराला मानणारा, पण मूर्तिपूजा अमान्य करणारा प्रार्थना समाज महाराष्ट्रात फारसा लोकप्रिय होऊ शकला नाही. भांडारकरांची ज्ञानसाधना मात्र अखंड सुरू होती.

१९११ साली इंग्रज सरकारने त्यांना 'सर' हा किताब दिला. त्यांच्या हयातीतच, त्यांच्या ८०व्या वाढदिवशी, १९१७ साली त्यांच्या शिष्यांनी पुण्यात 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर' स्थापन केले. आयुष्यभर अखंड विद्याव्यासंग केलेल्या या ऋषितुल्य महापंडितांचे निधन २४ ऑगस्ट १९२५ या दिवशी, वयाच्या ८८व्या वर्षी वार्धक्याने झाले. त्यांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त नम्र अभिवादन.

(लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

# ग्रहसंकेत

**(रविवार, १४ सप्टेंबर ते शनिवार, २० सप्टेंबर २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

* **रविवार, १४ सप्टेंबर-** कालाष्टमी, अष्टमी श्राद्ध, मध्याष्टमी श्राध्द, हिंदी राजभाषा दिन, श्री भवानीदेवी निद्राकाल प्रारंभ तुळजापूर गोविंद महाराज उपळेकर पुण्यतिथी, अष्टमी श्राद्ध * **सोमवार, १५ सप्टेंबर-** जागतिक लोकशाही दिन, अविधवा नवमी, नवमी श्राद्ध, अभियंता दिन, वामन जयंती, डॉ. सर विश्वेश्वरय्या जन्मदिन, कालगांवकरबुवा पुण्यतिथी पुणे * **मंगळवार, १६ सप्टेंबर-** दशमी श्राद्ध, रवी कन्येत, नारायण दशमी, पुंडलिकबाबा पुण्यतिथी मूर्तिजापूर, नाना महाराज साखरे पुण्यतिथी, दशमी श्राद्ध * **बुधवार, १७ सप्टेंबर-** इंदिरा एकादशी, एकादशी श्राध्द, मराठवाडा मुक्तिदिन, विश्वकर्मा दिन * **गुरुवार, १८ सप्टेंबर-** गुरुपुष्यामृत (सकाळी ६.२९ ते उ.रात्री ६.३३ पर्यंत), द्वादशी श्राद्ध, संन्यासिनां महालय, * **शुक्रवार, १९ सप्टेंबर-** प्रदोष, शिवरात्री, कलि युगादी, कृष्णदेव महाराज पुण्यतिथी यात्रा पुसेसावळी, मघा त्रयोदशी श्राद्ध * **शनिवार, २० सप्टेंबर-** चतुर्दशी श्राद्ध, शस्त्राने मृत झालेल्यांचे श्राध्द, पितृ श्राद्ध

**मुहूर्तः-** पक्ष पंधरवडा महालयामुळे या सप्ताहात साखरपुडा, डोळाळ जेवण, जावळ, गृहप्रवेश आदि मुहूर्त नाहीत.

### मेष :- मतभेदाचे प्रसंग टाळावेत

ज्यांना धन कमवायचं, त्यांनी एक कणसुद्धा वाया घालू नये. सप्ताह अखेरीस सप्ताहातील राशी स्वामी मंगळाचा व्ययातील शनिशी षडाष्टक योग होत आहे. त्यामुळे आर्थिक कारणावरून मतभेदाचे प्रसंग टाळावेत. गुंतवणूक विचाराने करावी. सरकारी कामे मनासारखी होतील. कलागुणांचा विकास होईल. सामंजस्याने रहावे. अनावश्यक खर्च टाळावा शुभ ता. १७,१८

### वृषभः- प्रकृतीच्या तक्रारी

ज्यांना ज्ञान कमवायचं, त्यांनी एक क्षणसुद्धा वाया घालू नये. मंगळ शनि षडाष्टक योग प्रकृतीच्या तक्रारी वाढवणार आहे. उष्णतेप-ासून त्रास होईल. शिक्षण अनुभवातून प्रगती होत जाईल. योजलेली कामे मनासारखी होतील. सामंजस्याची भूमिका ठेवावी. फार दगदगही करू नका. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात प्रगती होईल. शुभ ता. १६,१८

### मिथुनः- समस्यांतून मार्ग निघेल

बाहेर पडल्याशिवाय जग कळत नाही. पंचमातील मंगळाचा कर्मस्थ शनिशी षडाष्टक योग होत आहे. कार्यक्षेत्रात वादाचे प्रसंग टाळावे. गुरुकृपेने विविध समस्यातून मार्ग निघत जाईल. फार चिंता करू नका. स्थावरबाबतीत शुभ घटना घडतील. संततीशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. कलागुणांचा विकास होत जाईल. आत्मविश्वासाने रहावे शुभ ता. १७

### कर्कः- अपेक्षित प्रगती

मीपणा सोडल्याशिवाय माणसं जुळत नाहीत. सुखस्थ मंगळाचा भाग्यातील शनिशी षडाष्टक योग होत आहे. स्थावर वाद वाढवू नका. योजलेली कामे मनासारखी होतील. मध्यरात्रीचा जन्म असलेल्यांनी विशेष जपून असावे. धार्मिक, सामाजिक कार्य होतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित प्रगती साधता येईल. रेंगाळलेली कामे होतील. शुभ ता. १४,१८

### सिंहः- उत्साह धडाडी वाढेल

कोणासाठी धावून गेल्याशिवाय माणुसकी उजळत नाही. राशीतील शुक्र पराक्रमातील मंगळ यामुळे अनुकूलता राहील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. नोकरीत अधिकार वाढतील. उत्साह, धडाडी वाढेल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. आर्थिक व्यवहार फायदेशीर ठरतील. अपेक्षित प्रगती साधता येईल. अडचणीतून मार्ग निघेल. शुभ ता. १८

### कन्याः- तिखट बोलू नका

कष्ट केल्याशिवाय सुख मिळत नाही. राशीतील रवी बुधामुळे अनुकूलता वाढेल. धनस्थ मंगळाचा शनिशी षडाष्टक योग होत आहे. आर्थिक कारणावरून मतभेदाचे प्रसंग टाळावेत. ज्ञानदान, बँक, विमा अशा क्षेत्रात प्रगती साधता येईल. फार तिखट पदार्थ जास्त खाऊ नका तसेच फार तिखटही बोलू नका. त्रास संभवतो. शुभ ता. १७, १८

### तुलाः- आरंभशूरही होऊ नका

विचार असल्याशिवाय आयुष्य घडत नाही. राशीतील मंगळाचा षष्ठातील शनिशी षडाष्टक योग होत आहे. त्यामुळे सर्व बाबतीत सामंजस्याची भूमिका ठेवावी. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. तसेच आरंभशूरही होऊ नका. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. नवे विचार विचाराने स्वीकारावेत. सरकारी कामासाठी अधिक वेळ द्यावा लागेल. शुभ ता. १७

### वृश्चिकः- फसवणूक संभवते

सुख आणि दुःख आपल्या कर्मानुसार मिळते. बारावा राशी स्वामी मंगळ पंचमातील शनिशी षडाष्टक योग करणार आहे. व्यवहार विचारपूर्वक करावेत. जामीन कोणास राहू नका. फसवणूक संभवते. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. महत्त्वाची कामे मनासारखी होतील. अनावश्यक खर्च टाळायलाच हवा. प्रतिकूलतेवर मात कराल. शुभ ता. १४, १८

### धनुः- कलेत प्रगती

प्रत्येक समस्येवर तीन उपाय असतात. स्वीकारणे, बदलणे आणि सोडून देणे. सुखस्थ शनिचा लाभातील मंगळाशी षडाष्टक योग होत आहे. स्थावर व्यवहार विचारपूर्वक करावेत. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. वैवाहिक जीवनाबाबत शुभ घटना घडतील. यंदा अंगाला हळद लागणार आहे. कलेत प्रगती होईल. सुसंधी लाभतील. शुभ ता. १८

### मकरः- मार्ग निघत जाईल

किंमत वेळेची असते, वस्तूची नाही. कर्मस्थ मंगळाचा शनिशी षडाष्टक योग होत आहे. कार्यक्षेत्रातील आपली पत आणि प्रतिष्ठा संभाळा. समस्या आल्या तरी त्यातून मार्गही निघत जाईल. भावंडाशी मतभेदाचे प्रसंग टाळावे. आर्थिक प्रगती विलंबाने होईल. अपेक्षित कार्य सिद्धीसाठी अधिक परिश्रमाची गरज भासेल. शुभ ता. १८

### कुंभः- संधी विचाराने स्वीकाराव्यात

फक्त पद आहे म्हणून कधी कोणास इज्जत देऊ नका. धनस्थ शनिचा मंगळाशी षडाष्टक योग होत आहे. यांत्रिक क्षेत्रात अपेक्षित प्रगती साधता येईल. व्यवहारात चढउतार राहतातच. विचाराने रह-ावे, म्हणजे घसरण थांबवता येईल. शिक्षण अनुभवातून चांगली प्रगती साधता येईल. नव्या संधी विचाराने स्वीकाराव्यात. शुभ ता.१८

### मीनः- फार धावपळ करू नका

सगळ्यांना चांगले समजणे सोडून द्या, काही वरूनआपले असतात पण आतून हितशत्रू असतात. राशीतील शनि अष्टमातील मंगळाशी षडाष्टक योग करीत आहे. त्यामुळे ध्येयासाठी सध्यातरी फार धावपळ करू नका. सरकारी कामे मनासारखी होतील. विचाराने केलेली वाटचाल निश्चित फूल शुभ फलदायी ठरत असते.अडचणीतून मार्ग निघेल. शुभ ता. १८


!! शुभ भवतु !!

दुर्ग जिज्ञासा

# मांगी- तुंगी

प्राची पालकर

दुर्ग म्हणजे राज्याची संपत्ती! पूर्वी राज्याच्या, राजमार्गांच्या सुरक्षेसाठी किल्ले बांधणे अत्यंत महत्त्वाचे मानले जात असे. उंच उंच डोंगरावर वसलेले गिरीदुर्ग ताब्यात असणे यावर राजाचे आणि राज्याचे सामर्थ्य अवलंबून होते. म्हणून राज्यकर्ते आपले लक्ष त्या प्रदेशातील किल्ल्यांवर केंद्रित करत. जिथे पोहोचणे कठीण आहे, जो दुर्गम आहे, तो दुर्ग! दुर्ग प्रकारात गिरीदुर्ग हा सर्वश्रेष्ठ मानला जातो.



राज्याची राजधानी सुरक्षित असावी यासाठी शिवकाळापर्यंत राजधानी किल्ल्यावरच असणे आवश्यक समजले जात असे. किल्ल्यांचे अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या भारत देशात कालांतराने किल्ल्यांवरील वास्तव्य कमी होत गेले. इंग्रजांच्या काळात त्यांनी किल्ल्यांचे, किल्ल्यांवरील वास्तूंचे, मार्गांचे खूप नुकसान केले. विदेशातील उपभोगीसंस्कृतीचा भारतात प्रवेश झाला, त्यामुळे मैदानी प्रदेशात वस्ती वाढून किल्ले हे फक्त पर्यटन स्थळे म्हणून पुढे आली. शिवकालीन इतिहास वाचताना पूर्वीचे किल्लेवैभव आजही अनुभवता येते. म्हणून सह्याद्री पर्वतरांगेतील अत्यंत दुर्गम डोंगरी किल्ले, सुळके यांचे ऐतिहासिक महत्त्व अभ्यासून भटकंती करायला हवी.



सह्याद्रीच्या सेलबारी-डोलबारी डोंगररांगेतील सेलबारी डोंगररांगेवर मांगी- तुंगी सुळके आणि न्हावीगड आहे. सेलबारी रांगेतील दुर्गांना तीक्ष्ण सुळके आहेत. या डोंगररांगेत सुरू मांगी- तुंगी, तांबोळ्या, घाण्यागड, न्हावीगड, गवळण, नांद्या, जिभ्या, शेंदोड, हनुमान, धामण्या वघाई ही दुर्गम गड शृंखला थेट गुजरातमध्ये संपते. मांगी किल्ल्याची उंची ४३४३ फूट तर तुंगीची उंची ४३३६ फूट आहे. मांगी-तुंगी हे नाशिक जिल्ह्यातील महत्त्वाचे जैन तीर्थक्षेत्र आहे. बागलाण प्रदेशातील मांगी- तुंगी येथे जैन लेणी आहेत. नाशिक-सटाणा मार्गावरील ताहराबाद येथून सात- आठ किलोमीटर अंतरावर मांगी-तुंगी सुळके आहेत. ताहराबादवरून पिंपळनेरला जाताना भिलवाडी मार्ग घ्यावा, पुढे दोन फाटे फुटतात, उजवीकडील रस्ता

मांगी-तुंगी डोंगराच्या पायथ्याशी जातो. भिलवाडी हे मांगीतुंगीच्या पायथ्याचे गाव आहे. गावात जैन गुरू आदिनाथ, पार्श्वनाथ यांची मंदिरे आहेत. भिलवाडी गावात पद्मावती देवीचे शक्तिपीठदेखील आहे. गावात धर्मशाळा आहे. तेथे राहण्याची व्यवस्था होऊ शकते. मांगी-तुंगी सुळक्यावर जाण्यासाठी गावातूनच रस्ता आहे. डोंगर चढण्यासाठी पायऱ्या केल्या आहेत, पायऱ्या चढून आपण एका कमानीजवळ पोहोचतो. कमानीपासून दोन रस्ते जातात, डावीकडचा रस्ता मांगी सुळक्याकडे आणि उजवीकडचा रस्ता तुंगी सुळक्याकडे जातो.

प्रथम डावीकडचा मार्ग घेऊन मांगी सुळक्याकडे निघावे. पायऱ्यांच्या मार्गाने आपण मांगी सुळक्याच्या खाली असलेल्या जैन लेणीजवळ पोहोचतो. हा भाग थोडा ओसाड आहे, खूप झाडी नसल्याने येथे उन्हाच्या आधी जाणे सोयीचे असते. मांगी सुळक्याच्या पोटात असलेल्या गुहांमध्ये भगवान महावीर, पार्श्वनाथ, आदिनाथ आणि जैन धर्मातील इतर तीर्थंकरांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. गुहांच्या बाजूला पाण्याचे टाके आहे. गुहेतील बलभद्राची मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. ही मूर्ती पाठमोरी आहे. बलभद्र म्हणजेच श्रीकृष्णाचे ज्येष्ठ बंधू बलराम, जैन पुराणात बलरामाचा बलभद्र म्हणून उल्लेख आहे. बलभद्र डोंगराकडे तोंड करून तप करण्यास बसले आहे. अशी आख्यायिका आहे की, मांगी-तुंगी सुळक्याच्या मध्ये जी डोंगरसोंड आहे, तेथे बलरामाने श्रीकृष्णावर अग्निसंस्कार केले आणि त्यानंतर बलरामांनी जैन धर्माची दीक्षा घेतली. श्रीकृष्ण व बलराम यांच्या पादुका या डोंगरसोंडेवर आहेत. जवळच एक पाण्याचा कुंड आहे, जो कृष्णकुंड म्हणून प्रसिद्ध आहे. मांगी सुळक्याला प्रदक्षिणा घालण्यासाठी प्रदक्षिणा मार्ग केलेला आहे. या मार्गावर जैन धर्मातील चोवीस तीर्थंकरांच्या मूर्ती आहेत.

मांगी शिखरावर सात गुहा असून त्यात जैनशिल्पे कोरली आहेत. एका गुहेत बागुल राजा वरामशाह देव राठोड याची प्रतिमा कोरलेली आहे. प्रतिमेच्या बाजूला त्यांनी या जैन लेण्या खोदल्या अशा आशयाचा शिलालेख आहे. मांगीच्या प्रदक्षिणा मार्गात मागील बाजूस मंगला चंडिका देवीचे प्राचीन शिल्प आहे, हिला मांगी देवी म्हणून या भागात पूजलेजाते. येथे आदिवासी बांधवांची डोंगऱ्यादेवाची गुहादेखील आहे.

मांगी किल्ल्यावर एकूण १० गुहा आहेत. महावीर गुहेत भगवान महावीरांची पद्मासनस्थित पांढरी मूर्ती आहे. सहाव्या गुहेत परस्वनाथांची मूर्ती आहे. त्याच्या शेजारी आदिनाथांच्या प्रतिमा आहेत. सातव्या गुहेतील मूर्ती चारही दिशांना असून चार भिंतींना लागून आहे. आठव्या गुहेत अनेक मूर्ती व जैन संतांची शिल्पे कोरली आहेत. नवव्या गुहेत भगवान बाहुबली यांचा पुतळा आहे. मांगी किल्ल्यावरील मुख्य मंदिर भगवान महावीरांना समर्पित आहे.

पद्मासन स्थितीतील महावीरांची मूर्तीच्या बाजूला अजून काही मूर्ती कोरलेल्या आहेत. पुढील गुहेत सात जैन शिल्पे व १५ ते




२० मूर्ती कोरल्या आहेत. एका गुहेत भगवान पार्श्वनाथांची मूर्ती मध्यभागी असून उरलेल्या तिन्ही बाजूला अनेक मूर्ती पाहायला मिळतात. टेकडीच्या भिंतीवर २४ तीर्थंकरांचे शिल्प कोरलेले आहे. मांगी पाहून झाल्यावर पुन्हा प्रवेशद्वाराकडे येऊन उजवीकडे असलेल्या तुंगी सुळक्याकडे जावे. येथून पायऱ्यांनी १५-२० मिनिटात आपण तुंगी सुळक्याच्या खाली असलेल्या जैन लेण्यांपर्यंत पोहोचतो. तुंगी किल्ल्यावर मांगीपेक्षा कमी गुहा

कोरलेल्या आहेत. त्यातही जैन तीर्थंकरांच्या मूर्ती आहेत. त्यातील एका गुहेला बुद्ध गुहा म्हणतात. तुंगी सुळक्याच्या भोवतीदेखील प्रदक्षिणा मार्ग केलेला आहे. येथील शिखरावर पाच मंदिरे आहेत. त्यात आठवा तीर्थंकर भगवान चंद्रप्रभू यांच्या दोन लेणी आहेत.

येथे रामचंद्र गुहा आहे. त्यात हनुमान, गव, गवक्ष, नील यांच्या प्राचीन मूर्ती आहेत. एका गुहेत तपस्वी संत अवस्थेत रामाचे सेनापती कृतांतवक्र यांचीही मूर्ती आहे. मांगी-तुंगी टेकड्यांमधील मार्गावर शुद्ध आणि बुद्ध मुनींच्या दोन गुहा आहेत. भगवान मुनिसुव्रत नाथांचा मोठा पुतळा येथे पद्मासन मुद्रेत आहे. भगवान बाहुबली व इतर काही मूर्तीही आहेत. पावसाळ्यात मांगी-तुंगीचे सौंदर्य पाहण्यासारखे असते. डोंगराच्या कुशीतून पांढऱ्या शुभ्र जलधारा ओसंडून वाहत असतात. सह्याद्रीचे सौंदर्य अद्वितीय आहे. पावसाळ्यात ते अधिकच खुलते आणि पर्यटकांना आकर्षित करते.

जैन धर्माचे पहिले तीर्थंकर भगवान ऋषभदेव यांची १०८ फूट उंच मूर्ती मांगी येथे साकारण्यात आली आहे. या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा व मस्तकाभिषेक सोहळा २०१६ मध्ये संपन्न झाला. सुमारे ४५०० फूट उंचीवर साकारलेल्या या मूर्तीचे काम १९-२० वर्षे सुरू होते. ही मूर्ती उभारण्यासाठी प्रथम १२० फूट लांबीच्या कापडावर मूर्तीचे चित्र रेखाटले आणि त्यावरून ही मूर्ती घडविण्यात आली. ही मूर्ती घडविण्याआधी अभ्यासकांनी पाली, संस्कृतसह १० भाषांतील धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास केला. त्यानंतर मूर्तीची रचना निश्चित करण्यात आली. या ग्रंथात उल्लेख असलेली अंगुली प्रमाण याचा अभ्यास करून त्याचे फुटात रूपांतर करून या मूर्तीचे परिमाण निश्चित करण्यात आले आहे. आता तर हे जैन धर्मीयांचे जागतिक तीर्थस्थळ झाले आहे. सह्याद्रीतील अत्यंत टणक व कठीण अशा बेसॉल्ट पाषाणात डोंगर कापून तयार केलेली ही मूर्ती, टिकाऊ आणि अप्रतिम आहे. या मूर्तीची नोंद गिनीज बुकमध्ये झाली आहे. हे जैन तीर्थस्थान असल्याने भाविकांची येथे कायम गर्दी असते. पायथ्याच्या आदिनाथ मंदिरात भगवान महावीरांच्या भव्य प्रतिमा आहेत. जैन धर्मात अनेक अशी मंदिरे आ-हेत जी सिद्ध क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहेत. साधारणतः लेणी दोन प्रकारच्या असतात, ऐहिक लेणी आणि धार्मिक लेणी. नाणेघाटातील सातवाहनांचे देवकुळ म्हणजे पूर्वजांच्या प्रतिमांचे मंदिर हे एकमेव ऐहिक लेणे म्हणून ज्ञात आहे. इतर सर्व लेणी या धार्मिक प्रकारात मोडतात. बौद्ध, जैन, हिंदू धर्मीयांसाठी त्या त्या काळात या लेणी निर्मिल्या गेल्या. धार्मिक लेणी प्रत्येक धर्माच्या तत्कालीन रुपाचे दर्शन घडवितात, त्यामुळे प्रत्येक धर्माचे आणि संस्कृतीचे दर्शन घडते. दुर्ग, लेणी, पुरातन मंदिरे, ऐतिहासिक वास्तू आपल्या संस्कृतीची धरोहर आहे. लेणी प्राचीन भारतीय कला आणि स्थापत्यशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना आहे.

# सोलापूर जिल्हा घडवणाऱ्या शिल्पकारांच्या कर्तृत्वाचा आढावा




**इतिहासात सोलापूरचे नाव अनेक कर्तृत्ववान व्यक्तींनी गाजवले आहे. पुण्यश्लोक अप्पासाहेब वारदांपासून पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य यांच्यापर्यंत आणि शेठ हिराचंद नेमचंद यांच्यापासून विकासपुरूष रतनचंद शहा यांच्यापर्यंत अनेक मान्यवरांच्या जीवनकार्याचा आढावा प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी 'सोलापूर जिल्ह्याचे शिल्पकार 'मधून घेतला आहे. समाजवादी नेते भाई पन्नालाल सुराणा यांनी प्रस्तावनेतून तर विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी पाठराखण करून त्यांचा गौरव केला आहे.**

पुस्तक परिक्षण

रजनीश जोशी

सोळा हजार एकर शेतजमीन स्वतः कसणारे आणि १९, ५०० रुपयांचा सार भरणारे अप्पासाहेब वारद हे सोलापूरचे भूषण होते. शेतीचा अनुभव नसताना त्यांनी ही किमया साधली. सोलापूरच्या शैक्षणिक क्षेत्रा-तील त्यांचे योगदान, संस्कृत पाठशाळा, वारद मिल अशा सगळ्यातून आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे अप्पासाहेब हे लिंगायत समाजातील पहिले बॅरिस्टर होते. १०८ जणांचा सामुदायिक विवाह लावून सोलापुरात ही प्रथा त्यांनी आरंभली.

विविध उद्योगांमधून कोट्यवधीची कमाई करणारे आणि मानवी कल्याणासाठी त्यातील बहुतेक रक्कम दान करणारे शेठ हिराचंद नेमचंद हे सोलापूरातील कर्णच. जैन धर्म संस्कृती रक्षणाचे त्यांनी केलेले काम आणि स्थापन केलेल्या विविध संस्थांचा आढावा डॉ. चव्हाण यांनी 'सोलापूर जिल्ह्याचे शिल्पकारमधून घेतला आहे. सोलापुरातील सिव्हिल हॉस्पिटलची देखणी इमारत किंवा रेल्वे स्टेशनजवळील पोस्टाची इमारत बांधणाऱ्या हाजी हजरत खान यांना 'खानबहादूर' अशी पदवी ब्रिटिशांनी दिली होती. डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली दारिद्र्यरेषेखालील जनतेच्या उत्कर्षासाठी अविरत झटणारे जीवाप्पा तथा अण्णासाहेब ऐदाळे, सर विश्वेश्वरय्या ज्यांचे मित्र होते, ते वालचंद हिराचंद जहाजापासून विमानापर्यंत अनेक उद्योगांमध्ये यशस्वी झाले. सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना त्यांनी केली. साठ गावची मनसबदारी असल्याने साठे आडनाव पडलेल्या माढ्याच्या गणपतराव जाधव (साठे) यांच्या शिक्षण, सहकार चळवळीतील कार्याचा आढावा डॉ. चव्हाण यांनी घेतला आहे. स्वातंत्र्यसेनानी कृ. भि. अंत्रोळीकर यांनी आणीबाणीला तीव्र विरोध केला आणि त्यासाठी वयाच्या ७९ व्या वर्षी त्यांना तुरुंगवास झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांना मिळू शकणारे आरोग्यमंत्रिपद वाद टाळण्यासाठी त्यांनी नाकारले होते. डाळ, मिल, आडत, भुसार आणि भगवंताची बार्शी अशी ओळख असलेल्या या गावात शिक्षणमहर्षी कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी कार्याचा ठसा उमटवला. हिंदुस्थान एअरक्राफ्ट लि. कंपनीतून पहिले भारतीय बनावटीचे विमान बांधणारे पद्मश्री लालचंद हिराचंद दोशी हेही उद्यमशील व्यक्तिमत्त्व.

भोगावती साखर कारखाना सुरू करणारे आणि सोलापूर व नदिडचे खासदार झालेले तुळशीदास जाधव, ब्रिटिशांविरुद्ध बाँब तयार करणारे भाई छत्रुसिंह चंदेले, कामगारनेत्या रणरागिणी कॉ. मीनाक्षीताई साने, शांतिदूत डॉ. द्वारकानाथ कोटणीस, साहित्यिक मालतीबाई बेडेकर यांनी 'बळी' कादंबरी, ज्यांच्या जीवनावर लिहिली ते भीमराव जाधव, कॉ. व्यंकप्पा मडूर, पं. सुमतीबाई शहा, भाऊसाहेब गांधी, शंकरराव मोहितेपाटील, बाबूराव अनगरकर- पाटील, चंद्राम गुरुजी, ब्रह्मदेवदादा माने, वि. गु. शिवदारे अण्णा, दीनानाथ कमळे गुरूजी अशा ३० महनीयांच्या जीवनकार्याची सर्वसामान्यांना ठाऊक नसलेली माहिती डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी दिली आहे. इतिहासातील महत्त्वाच्या घटनांची माहिती सोलापुरात पांजरापोळ कुणी स्थापन केला, बॅ. जिना यांना सुनावून सोलापुरातच राहणारे मुस्लिम बांधव, स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सोलापुरात येऊन कुणाच्या निवडणुकीचा प्रचार केला, पंढरपूरचा भव्य रेल्वेपूल कुणी बांधला, रावळगाव रेवडी- चॉकलेट कुणी तयार केले अशा अनेक महत्त्वाच्या घटना घडामोडींची माहिती 'सोलापूर जिल्ह्याचे शिल्पकार 'मध्ये आहे. नव्या पिढीला सोलापूरच्या शिल्पकारांचा परिचय व्हावा, या हेतूने हे हे लेखन केले. कोरोना काळात विविध व्हिडिओ करताना जिल्ह्याची माहिती संकलित केली. मागास, बहुजन समाजाच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या मान्यवर सोलापूरकरांचे कार्य थक्क करणारे आहे.

**पुस्तकाचे नाव-** सोलापूर जिल्हा घडवणाऱ्या शिल्पकारांच्या कर्तृत्वाचा आढावा

**लेखक-** प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# ध्यान- (गैर) समज आणि प्रवाद !

सकारात्मकतेचे तत्वज्ञान २८४



ती न अंतर्दृष्टी देणारे, नजर निर्मळ करणारे मुद्दे आधी समजून घेऊ आणि या विषयाला हात घालू...

**(अ)** वेळ नाही, मन अशांत असताना आणि मुळातच ही प्रक्रिया किचकट असते.

**(ब)** या मुद्यांना हाताळता आले तर ध्यान ही एक आनंददायी अवस्था असते.

**(क)** छोट्या कृती आपल्या दैनंदिनीत समाविष्ट करता आल्या तर मनःस्वास्थ्य वाढते आणि व्यक्तिगत विकासही साधतो.

ध्यानधारणेच्या बऱ्याच सकारात्मक वैशिष्ट्यांचा साधारण परिचय सर्वांना असतो. स्वजनांना आपण त्याबद्दल उसासून सांगतही असतो. कधीतरी अशा शिफारशीला कोणी विरोध केलाय कां?

सगळ्यांनाच ध्यान प्रक्रियेच्या संदर्भातील संपूर्ण माहिती असतेच असं नाही. त्यांच्या मनात चुकीचे चित्र असू शकते. आसपास ध्यान या प्रक्रियेबद्दल गैरसमजच असल्याचे आढळून येतात. बऱ्याच क्षेत्रांमधील मंडळी मनानुभूतीचा सराव करीत असतात. कंपन्यांमधील वरिष्ठ पदाधिकारी, आरोग्य प्रशिक्षक, शिक्षक, नामवंत मंडळी, खेळाडू आणि सैनिकही ध्यान या क्रियेकडे आकृष्ट झालेले आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये माध्यमांमध्ये मनःशांती, ध्यान हे विषय अधिक चर्चेचे झालेले आहेत. लक्षावधी साधक या मार्गाकडे वळू लागलेले आहेत. पण काहीजण ती वाट अचानकच मध्ये सोडून देतात.

तुम्ही ध्यान करता कां? तुम्हांला ध्यानाची सर्वंकष माहिती आहे कां? या प्रश्नांबद्दल खालील काही समज, प्रवाद सामान्यतः आढळतात-

माणसांना ध्यान हे फॅड वाटते. मग वेळ नाही, ध्यान कंटाळवाणे असते, मनाला शांत करणे अवघड असते वगैरे वगैरे! बसण्याची मुद्रा, आतल्या अनुभवांची जाण, ध्यान कसे आणि कोठे सुरु करावे असे प्रश्नच प्रश्न हिंडत असतात. ध्यान हे विचारहीन अवस्थेचे वैशिष्ट्य मानतात आणि ते स्व- जागृतीचे लक्षण असते. म्हणून हळूहळू सुरुवात करणे, वेगवेगळ्या तंत्रांची तोंडओळख करून घेणे आणि परिपूर्णतेऐवजी सरावावर भर देणे हेच मार्ग असतात. हे (गैर) समाज असे दिसून येतात-

**(१) नव्या युगाचे हे फॅड आहे.**

याला एकच उत्तर असू शकते- ध्यान हे प्राचीन तंत्र आहे आणि त्यामुळे मानसिक, शारीरिक स्वास्थ्य सुधारते. शतकानुशतके जगभर लोक ध्यान करीत आलेले आहेत, हा दावा ऑस्ट्रेलियातील मेडिटेशन असोसिएशनने केलेला आहे. त्यामागील हेतू मनःशांती, सुखसमाधान, जीवनावरील नियमन आणि उत्क्रांतीमागील शोध असे आहेत. मनोवस्था हा आपल्या सर्वांच्या आवडीचा पण अत्यंत क्लिष्ट विषय आहे. त्यांवर भावी वाटचाल बरीचशी अवलंबून असते. सगळं काही असूनही एखाद्याचे शोध संपत नाहीत. याउलट काही नसतानाही मन तृप्त ,शांत असू शकते. ही अवस्था आमच्या संतांची असते. सोबतीला कितीही संसाधने असोत वा कौशल्ये असोत, त्यामुळे आतील पोकळ्यांचे समाधान होत नाही.

ध्यानातून मनावर प्रभुत्व प्राप्त होते, एकाग्रता वाढते. स्व बद्दलची जागरूकता वाढल्याने मन संयत होते. या विषयावरील चिएसा आणि सरेट्टी यांच्या २००९ च्या संशोधनाला होरोवित्झ यांनी २०१० साली दुजोरा देत ध्यानाचे शारीरिक लाभही अधोरेखित केलेले आहेत.

**- तेव्हा हे फॅड नक्कीच नाही.**

**(२) माझ्याकडे वेळ नाहीए.**

एक छोटा उपक्रम करता येईल- आठवड्याभरात पडद्यासमोरील वेळेची नोंद करावी. त्यापैकी केवळ २० टक्के वेळ ध्यानधारणेसाठी देता आला तर----- आपोआप ही तक्रार दूर होईल. काही व्यस्त मंडळींच्या दिनक्रमातही ध्यान हि प्राथमिकता असते. हळूहळू सुरुवात करावी, तेवढा वेळ बाजूला नक्कीच काढता येतो. सातत्य महत्वाचे, कमीजास्त वेळ नाही.

**(३) मन शांत करणे अवघड असते.**

पूर्ण शांतता लगेच अभिप्रेत नसते. आणि ती संभवतही नाही. फक्त पावलोपावली मनात रुंजी घालणाऱ्या विचारांची केवळ नोंद घ्यायची, त्यांना शक्यतो वेसण घालायची आणि हळुवारपणे श्वसनाकडे मनाला वळवायचे असते.

**(४) ध्यान कंटाळवाणे असते.**

सध्याच्या धावपळीत स्वतःकडे लक्ष द्यायला वेळ नसल्याने, विचलित करणाऱ्या असंख्य गोष्टी आसपास घडत असल्याने ध्यान कंटाळवाणे भासू शकते. हंट, हॉफमन, मोहर आणि विल्यम्स म्हणतात ध्यानाच्या वेळी आपला दृष्टिकोन महत्वाचा असतो. ध्यान मौजेसाठी, करमणुकीसाठी किंवा उत्तेजना मिळण्यासाठी नसते. ध्यानातून मिळणारी ऊर्जा, दुर्मिळ समाधान याची तुलनाच होऊ शकत नाही. शार्प यांचे २०१३ सालचे संशोधन अधोरेखित करते की ध्यानातून निर्माण होणाऱ्या डोपामाईन ची पातळी स्थिर असते. अपेक्षा कायम अडथळे निर्माण करीत असतात त्यामुळे खुल्या मनाने आणि सकारात्मक नजरेने ध्यानाच्या अनुभवाकडे बघणे इष्ट असते. ध्यान व्यायामशाळेत जाण्यासारखे असते, ती प्रक्रियाच मुळातून जगायची असते.

**(५) ध्यानाचे लाभ कालांतराने प्राप्त होतात.**

सातत्य असले तर की काही तात्कालिक लाभ जरूर मिळतात. ताण कमी होतो, एकाग्रता वाढते इ. मात्र सर्वंकष सुधारणेसाठी थोडे थांबावे लागतेच. होरोवित्झ यांनी २०१० साली हे सिद्ध केले की साधारण आठ आठवडे सलग ध्यान केल्यावर शारीरिक आणि मानसिक लाभ होतात. अर्थात वीस हजार तास ध्यान केलेल्या एखाद्या बौद्धभिक्षूला तुलनेने दहा महिने- दिवसाला दहा मिनिटे एवढे ध्यान करणाऱ्यापेक्षा जास्त फायदे होतात. मात्र नवशिक्या व्यक्तीपासून दीर्घकालीन सराव करणाऱ्यांपर्यंत साऱ्यांनाच ध्यान उपयुक्त असते.

एखाद्याला अंतिम सत्याची आस असेल किंवा भयरहित मनोभूमी हवी असेल जी सर्व व्यथांच्या पल्याड असेल. अर्थात हा मार्ग प्रदीर्घ असणारच. केवळ निरामय स्वास्थ्य, मनःशांती एवढेच ध्येय असेल तर ते नक्कीच साध्य होते.

तर्क, युक्ती आणि प्रमाण या मोजपट्टीवर हे मान्य झालेले आहे. केवळ सराव हाच ध्यानाचा पहिला फायदा असतो. मुख्य म्हणजे हे शस्त्र मोफत असते.

**(६) ध्यानाचे तंत्र मला माहित नाही.**

शरीराला रिलॅक्स करणे हा ध्यानाचा मूळ परिणाम असतो , खरंतर ती एक पूर्वअट असते. श्वसन शरीराला आणि स्नायूंना थंडावा देते. सोबतीला अंतर्मुखतेची जोड दिली तर जाणिवांच्या खोल गुहेपर्यंत पोहोचता येते. शरीराला स्कॅन करण्याचे हे तंत्र आहे. त्यामुळे ताणांचे मुळापासून उच्चाटन करता येते.

वेगळ्या भाषेत वर्णन करता येईल- रिलॅक्सेशन हे जेवणाच्या सुरवातीचे क्षुधावर्धक असेल तर ध्यान हे प्रमुख भोजन असते. ध्यान संमोहन नसते , एकप्रकारे ती आत्मसुचना असते ( मनातल्या मनात बोलणे). त्यांतून मनाची निर्मितीक्षमता आणि कल्पकता सुधारते. ध्यान करणाऱ्या व्यक्तीला कल्पनाचित्राचा आधार घेऊन मनाची एक विशिष्ट अवस्था प्राप्त करता येते. कोणत्याही प्रकारे आपल्या मनोभूमीला ध्यान आव्हान देत नसते आणि त्याचा हेतू आपली मानसिक अवस्था बदलणे एवढाच असतो. विशेषतः प्रेम-दया या प्रकारच्या ध्यानात हे साध्य होतो. समोरील सत्य आहे तसे स्वीकारणे आणि त्याद्वारे निवांतपण, अंतरंग निरखण्याची संधी मिळणे हे ध्यानाचे प्रमुख कारण असते.

विविध संकेतस्थळे, ध्यानवर्ग, ऑनलाईन सोई, अप्स आजकाल उपलब्ध आहेत. स्वतःचा वेळ, ऊर्जा आणि काही आर्थिक भार उचलणे एवढीच अपेक्षा असते.

**(७) ध्यान ही जीवनातील पळवाट आहे.**

सद्य जीवनापासून पळ काढायचे आणि समस्यांना टाळायचे यासाठी ध्यान हे उत्तम हत्यार आहे, असा काही लोकांचा समज असतो. प्रत्यक्षात ध्यानधारणा नियमित करणाऱ्या व्यक्तींचे अनुभव उलट असतात. ध्यानामुळे दृष्टी स्वच्छ होते आणि सगळं सुस्पष्ट दिसायला लागते. पळवाट म्हणजे पर्याय शोधणे. इथे विचलित करणाऱ्या गोष्टी दूर सारून जागरूकता वाढविली जाते. असं मानणाऱ्यांचा स्वभाव महत्वाचा, कृती नाही. अंतर्गत संसाधनांवर विजय मिळविण्याचा हा मार्ग आहे.

ध्यानाचा संबंध धर्म अथवा अध्यात्माशी नसतो. धर्माशी संबंधित संदर्भ जरूर आहेत, क्वचित अध्यात्मिक वाटचाल करण्यासाठी ध्यान आवश्यक असते. पण पाश्चात्य देशांमध्ये काहीही वारसा या संकल्पनेला नाही.ध्यान ख्रिश्चन मंडळींमध्येही प्रसिद्ध आहे, कारण ते शरीर आणि मनासाठी सरावकृती मानले जाते. मुस्लिम धर्माची मंडळी स्वतःच्या पंथाशी फारकत न घेताही ध्यान करू शकतात. जसे व्यायाम केल्याने कोणी योगी होत नाही. अर्थात कोठलेही कर्मकांड ध्यानासाठी आवश्यक नसते. विशिष्ट असा पोशाख ही नको असतो. काही मंडळी तसा पोशाख धारण करतात पण ते गरजेचे नसते. त्यामध्ये मंत्र-तंत्र नसतात. ध्यान अनेक प्रकारे करता येते.

ध्यानातून मनुष्य वर्तमानाकडे वळविला जातो, म्हणजे तो परिस्थितीला खंबीरपणे हाताळू शकतो. ही पळवाट नसते. आयुष्य खोलवर समजून घेण्यात ध्यानधारणा खूप मदत करते. कितीही कार्यमग्न असलो तरी स्वतःसाठी काही वेळ काढणे यात गैर काय? इतरांना आपण ज्या सहृदयतेने वागवितो, तीच कधीकधी स्वतःकडे वळवावी.

**(८) ध्यान स्वार्थासाठी केले जाते.**

ध्यान म्हणजे स्वतःपुरता एकजिनसी आनंद, त्यांत कोणाला सहभागी करून घ्यायचे नाही इतका तो स्वार्थी असतो, असं मानणाऱ्या मंडळींची कमतरता नाहीए, पण शेवटी हा चष्म्याचा प्रश्न आहे. जीवनाचा पूर्णत्वाने आस्वाद घ्यायचा असेल, अखेरपर्यंत कार्यरत राहायचे असेल तर ध्यानाला पर्याय नसतो. त्याचा दृश्य परिणाम कदाचित दिसत नाही पण व्यक्तिगत आणि व्यावसायिक जीवनात त्याची आभा जाणवते. लुबेर्टो यांनी २०१८ सालच्या ध्यानाचा इतिहास या त्यांच्या पुस्तकात मानवाला ध्यानधारणेचे होणारे लाभ सविस्तरपणे नमूद केलेले आहेत. ध्यान स्वतः ची शारीरिक, मानसिक, अध्यात्मिक, बौद्धिक उन्नती साधण्याचे प्रमुख साधन असते. त्यामुळे ताणतणाव घटतात, भावनांचे प्रतिसाद नियंत्रित होतात आणि स्वतःच्या जबाबदाऱ्या, नातेबंध यांचेकडे अधिक जबाबदारीने बघण्याची दृष्टी ध्यानामुळे प्राप्त होते.

**(९) ध्यानामुळे मनुष्य भावनाहीन, कोरडा होतो.**

काही लोक असं मानतात कि ध्यान म्हणजे कोरडे वाळवंट, जिथे भावनिक व्यक्त होणे याचा अर्थ यंत्रमानव (रोबोट) बनणे. ध्यान करताना भावना नाकारणे, त्यांचा निःपात करणे हा हेतू मुळीच नसतो तर त्यांची गुलामगिरी नाकारणे असतो. भावना समजून घेणे असतो म्हणजे त्यानुरूप प्रतिसाद संभवतो. भावनांच्या लाटा साक्षीभावाने निरखणे हे सवयीने जमू शकते. हॅरिस यांचे २०१४ चे संशोधन ध्यानाला प्रतिसाद मानते, प्रतिक्रिया नाही. संवेदना, जाणिवा जागृत ठेवून त्यांच्या अनुभूतीचे अनुभव महत्वाचे असतात. ध्यान भावनांचे उच्चाटन करण्यासाठी नसते तर त्यांच्यावर अधिक सामंजस्याने प्रक्रिया करण्यासाठी असते.

**(१०) ध्यानाची शांत बैठक जमत नाही.**

आयुष्यातील इतर असंख्य क्षेत्रांप्रमाणे ध्यानातील आपले समर्पण सर्व काही ठरवीत असते. आपल्याकडील कौशल्य किंवा ध्यानाचा केलेला सराव आपली प्रगतीची, सामंजस्याची फुटपट्टी ठरत नसतात. वेळेची ठाम बांधिलकी आणि कठोर हेतू हेच ध्यानाच्या यशाचे स्तंभ असतात. ध्यान हीच मुळात एक प्रक्रिया आहे. तिला जशी संसाधनांची गरज असते, तसं मानवी परिवर्तनाच्या पायऱ्यांची आस असते. म्हणून हा प्रवास सुंदर करणे हेच मानवाचे अंतिम ध्येय असावयास हवे.

स्व-टीका,तुलना यांच्याशी जितकी लवकर फारकत घेता येईल तितके बरे. मग ध्यानाचे साध्य स्पष्ट होते. इथे विचारांशी लढत असते, मन सहजासहजी मुक्त होत नाही या अडचणी आहेतच, पण त्यांना तोंडही देता आले पाहिजे. मेंदूत शिरणारे आणि मनातून बाहेर जाणारे विचार, त्यांच्याशी संलग्न न होता अनुभवता आले पाहिजे, जे सरावाने जमते. ध्यान ,त्याची बैठक सहज असावी. त्यांत जोर जबरदस्ती नसावी. अन्यथा मन चिडचिडे होते. त्याला हळुवारपणे शांत होण्यास मदत करायला हवी. एकाग्रतेमध्ये सातत्य टिकविणे म्हणजे ध्यान. त्यांतून स्थैर्य जन्मास येते. प्रबोधन होते. ज्यांना ध्यान अवघड वाटते, त्यांना एक प्रयोग करायला सांगावे- समजा, एखाद्या कामात तुम्ही मग्न आहात आणि अचानक शेजारच्या घरी संगीत सुरु होते. ते अपरिहार्यपणे कानी तर पडत असते, पण तुम्हाला काही करता येत नाही. तर अशावेळी दुर्लक्ष करीत ते ऐकणे बंद करायचा आपण प्रयत्न करतो. हा प्रयत्न जितका धारदार, तितके ते स्वर मोठ्याने कानी आदळतात, काम अशक्य करून टाकतात. अशावेळी जर तुम्ही प्रयत्नपूर्वक दुसरीकडे लक्ष केंद्रित केले तर हळूहळू त्रास विसरायला मदत होते. काही लोकांना वाटते कि ध्यान करण्यासाठी शांत मनाची गरज असते. मन आधीच अस्वस्थ असते, मग ध्यान कसे करणार? जणू व्यायामशाळेत जाण्यासाठी माणसाने तंदुरुस्त असावे लागते असं म्हणण्यासासारखे असते. उलट ध्यान करताना हेच ध्यानी येते की कोणाकडेच देवदत्त शांत मन नसते.

ध्यानादरम्यान थोडी हालचाल करण्याची अनुमती असते. किंवा ध्यानसत्र कमी वेळाचे निवडावे. बसूनच ध्यान करणे बंधनकारक नसते.

**उपसंहार**

या लेखात काही महत्वाची निरीक्षणे आणि प्रवाद नमूद करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. ध्यान न करण्यामागे प्रत्येकाची विविध कारणे असू शकतात. पण त्या प्रत्येक कारणाला शास्त्रोक्त उत्तर देणे शक्य आहे. समोरच्या व्यक्तीच्या निदर्शनास काही मुद्दे आणून देता आले तर नक्कीच त्यांना प्रोत्साहन मिळू शकते आणि या शास्त्राचा प्रसार होऊ शकतो.

काहीजणांसाठी योगासने, प्रभातीचे चालणे हे अधिक चांगले पर्याय असू शकतात. सर्वांच्या मतमतांतराचा यथोचित आदर करून ध्यान ही प्रक्रिया दूरवर जावी यासाठी प्रयत्न करणे हेच आपल्या हाती आहे. अन्यथा निद्रानाश, अपचन, लक्ष विचलित होणे, मेदवृद्धी अशा अनेक मार्गांनी जात आपण वैद्यकीय सेवांचे लाभ घेत असतोच. हे प्राचीन तत्वज्ञान जे शरीर आणि मन दोहोंची विनामूल्य काळजी घेते ते आपल्याकडून रोज थोडा वेळ, अनुशासन यांचीच मागणी करीत असते. स्वतःच्या भल्यासाठी एवढं तर आपण करू शकतोच. आता फक्त एक अधिकृत प्रश्नाचा समाचार घेऊन हा लेख संपवय या- ध्यान करूनही माझे मन शांत झाले नाही तर?

माणसाचे एकूण अस्तित्व योगमय असते. शरीराची बंधने, मानसिक प्रक्रिया आणि अध्यात्मिक साधना यांच्या परिपूर्णतेमधून जीवन सफल होत असते. शारीरिक गरजा प्रामुख्याने पुरवत असताना चित्तवृत्ती समाधानी असाव्यात, नैतिक जागृती असावी आणि अध्यात्मिक उर्मी असाव्यात. यातून सगळ्याच प्रश्नांची उत्तरे गवसत जातात.



**सांपत्तिक, आध्यात्मिक, वैचारिक संस्कार यांच्या पाठबळावरच प्रत्येकाचा जीवनपट आकार घेतो. म्हणूनच पूर्वजांचे उपकार, उपदेश, दूरदृष्टी, आपल्याला उपकृत करत असते. अशा या उपकाराची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती आदरांजली व्यक्त करणारा पितृपंधरवडा विशेष ठरतो. समाजातला एक वर्ग या काळात नवी खरेदी, मंगल कार्याचा शुभारंभ करत नाही. पण हळूहळू या समजुतीत बदल घडत आहे.**

# पितृऋणाला आदरांजली

निमित्त
वैष्णवी कुलकर्णी

विश्वाच्या या प्रांगणात आपलं अस्तित्व कितीक्षणभंगूर आहे, याची नेमकी जाणीव सामान्य माणसाला आहे. आपली वाटचाल सुकर करण्यास, जगणं सुसह्य करण्यास पूर्वजांची पुण्याई कशा प्रकारे साह्यभूत ठरते याची त्याला कल्पना आहे. त्यामुळेच मनुष्य हा आपल्या वंशावळीचा सार्थ अभिमान असणारा आणि पूर्वजांचं पावन स्मरण ठेवणारा जीव आहे. जगभरातला प्रत्येक समाज कोणत्या ना कोणत्या पद्धतीने आपल्या पूर्वजांप्रती आदरांजली व्यक्त करताना दिसतो. एकत्र येऊन घरातल्या दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करताना दिसतो. आपल्याकडे पितृपंधरवड्यामध्ये पितृकर्म पार पाडून ही प्रथा जपली जाते.

आधीच्या पिढीने लावलेल्या रोपांचे वृक्ष होऊन त्याची मधुर फळं पुढच्या पिढीने चाखावीत; त्याच पद्धतीने आधीच्या लोकांनी घेतलेल्या कष्टांमुळेच आजच्या पिढीचं जगणं सुकर होत असतं. सांपत्तिक, आध्यात्मिक, वैचारिक तर कोणी कलासक्तीचे संस्कार देऊन पुढच्या पिढीसाठी समृद्ध पृष्ठभूमी तयार केलेली असते. काही अपवाद वगळता बहुतांश लोक या पूर्वपीठिकेवरूनच आपला जीवनपट सुरू करतात आणि आपल्या कामगिरीने तो रंगवतात. म्हणूनच पूर्वजांचे उपकार तसंच उपदेश दूरदृष्टी, गुणग्राहकता आणि द्रष्टेपणा आपल्याला उपकृत करत असतो. अशा या उपकाराची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती आदरांजली व्यक्त करणारा पितृपंधरवडा विशेष ठरतो.

शास्त्राने सांगितलेले श्राद्धविधी या पंधरा दिवसांमध्ये पार पडतात, ते शक्य नसल्यास यथाशक्ती दानकर्म केलं जातं. सध्या गरजूंना आवश्यक त्या स्वरूपात मदत करुनही लोक पितृऋणाचा मान ठेवताना दिसतात. त्यामुळेच आता एकीकडे पारंपरिक पद्धतीने तर दुसरीकडे आधुनिक जाणिवांनिशी या १५ दिवसांकडे पाहिलं जातं. पण उपचार कुठलेही असले तरी ते करताना स्वर्गवासी पूर्वजांचं स्मरण असतंच. पूर्वी हे दिवस

शुभकार्यासाठी निषिद्ध मानले जायचे. आजही बऱ्याच अंशी ही समजूत कायम आहे. त्यामुळे या दिवसांमध्ये कोणी आवर्जून शुभकार्य पार पाडताना दिसत नाही, पण तत्पश्चात सुरू होणाऱ्या उत्सवपर्वाची आणि त्यानंतरच्या लग्नसराईची पूर्वतयारी म्हणून हा काळ भलताच उपयुक्त ठरतो. श्रावणसोहळा आणि गणेशसोहळा आटोपल्यानंतर एक उसंत देणारे हे दिवस काहीसे संथ असतात असं काही लोक म्हणतात. कारण ते उत्सवसाखळी खंडित करणारे असतात. सणावारांच्या निमित्ताने महिनाभरापेक्षा अधिक काळ उत्सवी

वातावरण अनुभवल्यानंतर पितरांच्या स्मरणाने हळवं करणारे असतात. मात्र पूर्वजांचे आशीर्वाद लाभले तर पुढे सगळं चांगलंच होईल ही आश्वस्तताही मोलाची असते. म्हणूनच आजच्या धकाधकीच्या काळातही पितरांना समर्पित असणारे १५ दिवस रुढीनुसार पार पडतात. पूर्वजांनी मानवी वर्तणुकीचे नियम लिखित स्वरूपात घालून दिले. यालाच उपनिषदं, वेद, पुराण अशा नावांनी संबोधलं गेलं. या रूपरेषेवरून चालणं हे काही काळासाठी शक्य असलं, तरी स्वतःला सदा सर्वकाळ या नियमांमध्ये बांधणं शक्य नसतं.

अशा वेळी या नियमांचा गरजेपुरता संदर्भ घेतला जातो आणि कार्य पार पाडलं जातं. स्वातंत्र्य आणि प्रलोभनं यांच्यामध्ये मानवी मन गुरफटत जातं आणि म्हणूनच अंतिम सत्याकडे डोळेझाक होऊ लागते. मानव बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर उत्तम आरोग्य सुविधा निर्माण करतोच; पण मृत्यूला जिंकण्याचेही मनसुबे रचतो. आयुष्यभरात जोडलेले आसपासचे नातेसंबंध त्याला अंतिम क्षणी मोहात पाडतात. आयुष्याच्या कातरवेळी तो गतकाळातल्या स्मृतींमध्ये रममाण होताना दिसतो. मृत्यूनंतर आपण



सगे-सोयऱ्यांपासून लांब जाणार आहोतच; याशिवाय हा प्रवास आपल्याला एकट्याने करावा लागणार या जाणिवेने तो जास्त अस्वस्थ होत राहतो. मानवी जीवनातल्या प्रत्येक महत्त्वाच्या घटनेचे सोहळे साजरे केले जातात. या सोहळ्यात मृत व्यक्तीच्या संदर्भात असलेल्या सोहळ्यांचाही समावेश असतो. दुःखाची किनार असणारा हा सोहळा प्रियजनांच्या मरणोत्तर शांतीसाठी जड अंतःकरणाने का होईना, पार पाडला जातो. भारतीय संस्कृतीमध्ये जिवंत व्यक्तीबरोबरच मृतात्म्यांच्या भावनांचाही विचार केला जातो. पितरांनी त्यांच्या मृत्यूनंतरही आपल्यावर कृपा करत राहावी, या सहज विचारसरणीतून पितृपक्षात घरातील मृत व्यक्तींसंबंधीची पितरकर्म करण्याची प्रथा निर्माण केली गेली असावी.

'मृत्यूनंतरचा प्रवास' या संकल्पनेमुळेच मृत व्यक्तीचे श्राद्ध करणे, त्यांना तर्पण करणे या प्रथा आढळतात. भाद्रपदातला कृष्णपक्ष हा श्राद्धपक्ष किंवा पितृपक्ष मानला जातो. या पंधरवड्यात आपल्या पूर्वजांचे, पितरांचे स्मरण करून ते ज्या योनीत असतील तिथे सुख-शांती मिळावी म्हणून प्रार्थना केली जाते. धार्मिक कृत्यांच्या प्रथेनुसार श्राद्धाच्या दिवशी पितृदान तर्पण केले जाते. या कार्यानिमित्त घरातील सगळे एकत्र येतात, एकत्र बसून दोन घास खातात. यशाशक्ती दानकर्म पार पडते. हयात नसलेल्यांच्या आठवणी निघतात. एक प्रकारे हा पांगलेल्या कुटुंबाला एकत्र आणण्याचा उपचारही ठरतो. आता हयात नसलेल्या शरीरांनी पूर्वी या आप्तेष्टांमधला दुवा म्हणून काम केलेले असते. त्यांनी कुटुंबाची ही मोळी बांधून ठेवलेली असते, मोळी एकत्र टिकवून ठेवलेली असते पण गाठ सैल होताच मोळीतली काष्ठं विखुरण्यास वेळ लागत नाही.

कदाचित हीच अप्रिय बाब टाळण्यासाठी आणि घरातील सर्वांना आपल्या मूळ वृक्षाच्या सयीच्या सावलीत पुन्हा एकत्र आणण्यासाठी या कर्माचं प्रयोजन असावं. कारण अगदी आत्ताआत्तापर्यंत लोक एक वेळ सणाला एकत्र येत नसत पण घरातील पितृकर्माला आवर्जून उपस्थित राहात असत.

आधुनिक युगात पितृकर्माच्या रितींवर प्रत्येकाचा या सर्व कृतींवर विश्वास असेलच किंवा त्यासाठी पुरेसा वेळ देणं शक्य होईलच असं नाही. पितरांच्या उपकारांची उतराई होण्याचा सोहळा म्हणजे पितृपक्ष पंधरवडा. पितरांचं एखादं अपुरं ध्येय पुत्राने अगर कन्येने पूर्ण करण्याची जबाबदारी आनंदाने स्वीकारल्याने पिता अगर माता निश्चितपणे संतुष्ट होतील. हे करत असताना पुत्राला अगर कन्येलाही समाधान मिळेल. पितरांची आठवण करण्याचे हे दिवस पवित्र मानले पाहिजेत. आपल्यालाही पितरांप्रमाणे एक दिवस जायचं आहे,

याचं भान याच दिवसात मनावर ठसलं जातं. या भूतलावर आपल्याला मिळणारा वेळ विधायक कामांसाठी वापरावा याचं भान येतं. या श्राद्धपक्षात सत्कृत्याचे पाथेय बांधण्याची मनाची जिद्द वाढते. एकदा सत्कृत्याचे पाथेय बांधण्याचा निश्चय केला की जीवन अधिकाधिक क्रियाशील बनतं. कदाचित हा धडा देण्यासाठी या पंधरवड्याचं प्रयोजन केलं असावं. हा काळ अनेकदा अनिष्ट समजला जातो. या काळात नवी खरेदी, मंगल कार्याचा शुभारंभ केला जात नाही. समाजातला एक वर्ग अजूनही या काळाला नाकं मुरडतो. पण हळूहळू समाजाच्या समजुतीत बदल घडू लागला आहे.

समाज जुन्यासोबत नव्या विचारांची गुंफण करून नवी विचारधारा प्रवाहित करत आहे. त्यामुळे या काळातही काही नवीन कामांचा श्रीगणेशा होतो. या काळात बऱ्याच घरांमधून कर्मकांडाचा अतिरेक न करता विशिष्ट तिथीला दानधर्म करणं, वृद्धाश्रमात अथवा अनाथालयात अन्नदान वा इतर वस्तूंचं दान करणं, गरजू विद्यार्थ्यांना मदत करणं ही स्तुत्य कर्मं पार पाडली जातात. समजुतीने घेतलेलं हे चांगलं वळण आहे, असं म्हणावं लागेल. आपल्यातून गेलेल्या व्यक्तीचं मरणोत्तर जग आभासी आहे, आपल्या कल्पनेच्या पलीकडलं आहे. त्याला ओढून ताणून आपल्या जगात आणण्यापेक्षा या जगात, आपल्याबरोबर राहणाऱ्या पण जाणिवा मृतवत झालेल्या लोकांच्या आयुष्यात आशेचा एक किरण आणणं हे पितरकर्म नसेल कदाचित, पण मनुष्यकर्म नक्कीच आहे.

या आयुष्यात मनुष्य म्हणून जगताना मनुष्यकर्म करणंही पुरेसं आहे. हे करत राहिलं तर आयुष्याच्या अखेरीस संध्याछाया दाटून आली तरी जीव कासावीस होणार नाही, काय केलं या सोन्यासारख्या आयुष्यात, असा व्यथित करणारा प्रश्न भेडसावणार नाही. संधी असूनही लोकांशी चांगलं वागू शकलो नाही ही खंत त्रास देणार नाही. उलटपक्षी, यमदूताच्या स्वागताला तनाबरोबर मनानंही आपण सिद्ध असू. मिळालेल्या आयुष्याबद्दल कृतार्थता आणि आत्तापर्यंत केवळ कथांमधून ऐकलेल्या स्वर्गनगरीच्या प्रवासाला सिद्ध असू.



# अमेरिकी अर्थव्यवस्थेची मंदीकडे वाटचाल

**भारत-चीन संबंध कायमच तणावपूर्ण राहिले आहेत. चीनच्या आक्रमक विस्तारवादाला भारताने चोख उत्तर दिले आहे. मात्र, अमेरिकेच्या व्यापारयुद्धाच्या पार्श्वभूमीवर चीन भारताच्या जवळ येऊ पाहात आहे. जोवर सीमा शांत नाही, तोवर चर्चा शक्य नसल्याची भारताची भूमिका आहे. भारताने ही भूमिका स्पष्ट शब्दांत चीनला कळवलीही आहे.**

आकलन
**संजीव ओक**

भारताला 'डेड इकोनॉमी' असे उपहासात्मक संबोधणारी अमेरिका, स्वत:च आता आर्थिक संकटाच्या कड्यावर उभी आहे. ही एक उपरोधिक ऐतिहासिक घटना मानता येईल. अमेरिकेचा सर्वसामान्य नागरिक आज रोजचा खर्च भागवताना मेटाकुटीला आला आहे. तेथील रोजगाराच्या संधी घटल्याने, बेरोजगारीचा दरही वेगाने वाढतो आहे. घरबांधणी क्षेत्रातही मंदी आली असून, अमेरिकी ग्राहकांच्या आत्मविश्वासाला हादरे बसले आहेत. नोकरी ही अमेरिकी मध्यमवर्गाचा मोठा आधार. मात्र, तो आधारच आज निराधार होत आहे.

बेरोजगारी दर चार टक्क्यांपेक्षा जास्त झाला आहे. रोजगारनिर्मितीचा भार केवळ आरोग्यसेवा व पाहुणचार क्षेत्रावरच आहे. उत्पादन, बांधकाम, सेवा क्षेत्रात मात्र मंदीचे सावट तीव्र झाले आहे. झँडी म्हणतात, अशी स्थिती सामान्यत: फक्त मंदीच्या काळातच दिसते. अमेरिकेतील बांधकाम क्षेत्रात मजुरांची टंचाई निर्माण झाली आहे. ट्रम्प प्रशासनाच्या कठोर स्थलांतर धोरणामुळे शेतकरी, बांधकाम आणि सेवा उद्योगावर मोठाच ताण आला आहे. उत्पादन खर्च वाढल्याने, त्याचा बोजा हा सामान्य अमेरिकी ग्राहकांच्या डोक्यावर बसतो आहे.

अमेरिकेने ट्रम्प काळात सुरू केलेले व्यापारयुद्ध, आज त्यांच्याच अर्थव्यवस्थेलाच पोखरते आहे. चीन, युरोप आणि इतर देशांवर लावलेल्या अब्जावधी डॉलर्सच्या शुल्काचा परिणाम, अमेरिकन ग्राहकांवर झाला. खरेदीशक्ती घटली, उद्योगपतींनी गुंतवणूक रोखली आणि संपूर्ण बाजारपेठेवरच मंदीचे सावट आले. ट्रम्प यांनी भारतासह अन्य देशांवर जे आयातशुल्क लादले, त्याचा भार अमेरिकी नागरिकांवरच पडत आहे. वॉल स्ट्रीटवरील शेअर बाजार चढतो आहे. काही तांत्रिक कंपन्यांचे आकडे चांगली कामगिरी करताना दिसत असले, तरी सामान्य अमेरिकी नागरिकांची आर्थिक हतबलता यात दडलेली आहे. महागडी घरे, वाढते व्याजदर, बचत संपल्यामुळे कमी होत चाललेली क्रयशक्ती या सर्व बाबींनी अमेरिकी अर्थव्यवस्थेचा बेगडी मुखवटा उघड केला आहे. याउलट भारताचे चित्र सर्वस्वी वेगळे आहे. मागील दशकात भारतीय अर्थव्यवस्थेने आत्मनिर्भरतेच्या दिशेने मोठे पाऊल टाकले आहे. त्यामुळे धान्य उत्पादनात विक्रमी वाढ झाली असून, डाळींच्या उत्पादनात भारत जगात अग्रस्थानी आला. कृषी, उद्योग आणि सेवा या तिन्ही क्षेत्रांमध्ये स्थिरता आणि वाढ दिसून येत आहे. डिजिटल क्रांतीमुळे अर्थव्यवस्था अधिक पारदर्शक झाली.

सरकारने शेतकरी उत्पादनाला बाजारपेठ मिळवून दिली असून, पायाभूत सुविधा उभारल्या आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट केली. भारतीय अर्थव्यवस्था सातत्याने वाढत असून, नुकताच तिने ७.८ टक्के वाढीचा दर नोंदवला आहे. ही वाढ गुंतवणूक आकर्षित करत असून, आत्मनिर्भरतेकडे वेगाने वाटचाल करते आहे. त्याउलट, अमेरिका आज आर्थिक तूट, कर्जाचा वाढता बोजा, महागाई आणि रोजगारातील अनिश्चिततेशी झुंजते आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला मंदीचे ग्रहण लागले आहे. मात्र, भारतात विकासाची नवी पहाट उगवते आहे, ही वस्तुस्थिती आंतरराष्ट्रीय आर्थिक समीकरणांना नवे वळण देणारी ठरते. अमेरिकेतील राजकीय वादंग, चीनशी सुरू असलेले व्यापारयुद्ध, युक्रेनसाठी होत असलेला वाढता खर्च आणि आता बाजारातील अस्थिरता या सर्व घटकांनी अमेरिकेला हळूहळू दबावाखाली आणले आहे. त्याचवेळी, भारतात मात्र पायाभूत सुविधा, उत्पादन, डिजिटल सेवा, शेतीतील स्वयंपूर्णता अशा विविध क्षेत्रांत वेगाने होत असलेली प्रगती जगासमोर एक आदर्श उभा करणारी ठरली आहे. आज गुंतवणूकदारांचा विश्वास अमेरिकेऐवजी भारतासारख्या स्थिर आणि वाढीच्या मार्गावर असलेल्या अर्थव्यवस्थांवर जास्त आहे. हे केवळ आकडेवारीचे गणित नाही, तर आंतरराष्ट्रीय शक्ती-संतुलनाचे भाकीत आहे. अमेरिका मंदीकडे वाटचाल करत असेल, तर त्याचे परिणाम फक्त अमेरिकेपुरतेच मर्यादित राहणार नाहीत. जागतिक पातळीवर व्यापार, गुंतवणूक, वित्तीय बाजार यावर त्याचे दूरगामी परिणाम दिसतील. अमेरिकेची वाटचाल मंदीकडे होत आहे. तेथील विश्लेषक, अर्थतज्ज्ञ गेली दोन वर्षे सातत्याने याबाबतचा इशारा देत आहेत. मात्र, अमेरिकी प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत, आपली मनमानी करण्यातच व्यस्त आहे. त्याचवेळी, युरोप ऊर्जा संकटातून भारताच्या मदतीनेच तारला गेला आहे. चीनची अर्थव्यवस्थेची कामगिरीही फारशी चांगली नाही. त्यामुळे या पार्श्वभूमीवर भारताकडे स्थिरतेचे उदाहरण म्हणून संपूर्ण जग पाहते आहे. न्नधान्य पुरवठ्यात भारताने निर्माण केलेली स्वयंपूर्णता आणि तंत्रज्ञानात मिळवलेले यश, हे दोन्ही घटक भारताला जागतिक पटलावर अनन्यसाधारण स्थान देणारे ठरतात. अमेरिकेच्या विपरीत, भारताने जागतिक व्यापारयुद्धात सावधगिरी बाळगली, बहुपक्षीय संबंध मजबूत केले आणि देशांतर्गत मागणीवर भर दिला आहे. त्यामुळे भारताची वाढ कायम राहिली आहे. या संपूर्ण आर्थिक चित्रात भारताचे यश अधिक ठळकपणे समोर येते. कारण, भारताने गेल्या ११ वर्षांत जे पायाभूत सुधारणांचे बीज पेरले, त्याची गोमटी फळे आज देशाला आर्थिक स्वावलंबन, रोजगारवाढ आणि आंतरराष्ट्रीय विश्वास या रूपाने मिळताना दिसत आहेत. म्हणूनच, अमेरिकेतील वित्तीय संकट हे भारताचे यश अधोरेखित करणारे ठरले आहे. अमेरिकी अर्थव्यवस्था ढासळताना भारताने आपली वेगवान वाटचाल अशीच कायम ठेवली, तर नजीकच्या काळात 'जगाचे इंजिन' ही उपाधी अमेरिकेऐवजी भारताला मिळेल. ज्या अमेरिकेने भारताच्या अर्थव्यवस्थेला 'डेड इकोनॉमी' म्हणून हिणवले, त्या अमेरिकेलाच आता मंदीची कडवी चव चाखावी लागत आहे. 'मूडीज'चे मुख्य अर्थतज्ज्ञ मार्क झँडी यांनी इशारा दिला आहे की, अमेरिकी अर्थव्यवस्था अगदी मंदीच्या दाराशी उभी आहे. भारत मात्र त्याचवेळी स्थैर्याने आणि आत्मविश्वासाने पुढे चालला आहे, ही नक्कीच अभिमानास्पद अशीच बाब! भारताला ट्रम्प यांनी 'डेड इकोनॉमी' म्हणून हिणवले मात्र, आता अमेरिकेच्याच घरात आर्थिक दिवाळे वाजले आहे. 'मूडीज'ने दिलेला इशारा, अमेरिकी धोरणांच्या अपयशाचे प्रमाणपत्र आहे, असे म्हणूनच म्हणता येते. भारत मात्र आजही वेगाने पुढे जात असून, स्थैर्य, आत्मविश्वास त्याच्या वाटचालीतून दिसून येतो. 'डेड इकोनॉमी' हा ठपका 'अमेरिकन ड्रीम'च्या ढासळत चाललेल्या पायावरच लागू होतो, हेच त्याने कृतीतून दाखवून दिले आहे.

# आलंय की, येत आहे; क्रीडाविश्वावर अरिष्ट...



नोंद...
**श्रीपाद पेंडसे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि. ३१ ऑगस्ट रोजी त्यांच्य 'मन की बात' या कार्यक्रमाच्या १२५ व्या भागांत देशवासीयांशी संवाद साधला. यामध्ये त्यांनी जम्मू-काश्मीरमधील खेळांचा प्रामुख्याने उल्लेख केला. ते म्हणाले की, पूर आणि पावसामुळे झालेल्या विध्वंसाच्या काळातही, जम्मू-काश्मीरच्या जनतेने दोन विशेष कामगिरी साध्य करून दाखवल्या आहेत. जम्मू- काश्मीरच्या पुलवामा येथील स्टेडियममध्ये विक्रमी संख्येने लोक एकत्र आले होते, तेथे पुलवामातील पहिला डे-नाईट क्रिकेट सामना खेळला गेला. पूर्वी अशी गोष्ट घडणे अशय होते पण, आता आपला देश बदलत आहे. हा सामना 'रॉयल प्रीमियर लीग'चा एक भाग आहे, ज्यामध्ये जम्मू- काश्मीरचे वेगवेगळे संघ खेळत आहेत. इतके सगळे लोक, विशेषत: तरुण, पुलवामामध्ये रात्रीच्या वेळी क्रिकेटचा आनंद घेत असल्याचे चित्र खरंच बघण्यासारखे होते.


दुसरा कार्यक्रमही सगळ्यांचेच लक्ष वेधून घेणारा होता. देशात पहिल्यांदाच 'खेलो इंडिया वॉटर स्पोटर्स फेस्टिव्हल' झाले आणि तेही श्रीनगरच्या दल लेकवर. खरंच असा उत्सव आयोजित करण्यासाठी ही किती खास जागा आहे! तसेच, याचा उद्देश वॉटर स्पोटर्सला आणखी लोकप्रिय करणे हा आहे. यामध्ये संपूर्ण भारतातून ८०० हून जास्त खेळाडूंनी भाग घेतला होता. महिला खेळाडूंचाही सहभाग जवळजवळ पुरुषांएवढाच होता. यात भाग घेतलेल्या सर्व खेळाडूंना पंतप्रधानांनी शुभेच्छा दिल्या. त्यांपैकी ओडिशाच्या रश्मिता साहू आणि श्रीनगरचे मोहसीन अली या खेळाडूंशी 'मन की बात'मध्ये त्यांनी विशेष संवाद साधत, त्यांचे अभिनंदन केले. तसेच त्यांना भावी काळासाठी शुभेच्छाही दिल्या; त्यांच्या पालकांचेही आभार व्यक्त केले. भारताचा पहिला राष्ट्रीय स्तरावरील, खुल्या गटाचा 'खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सव' दि. २१ ते दि. २३ ऑगस्ट रोजीदरम्यान, भारताचे नंदनवन असलेल्या जम्मू-काश्मीरच्या प्रसिद्ध दल सरोवर येथे संपन्न झाला. त्या पहिल्या 'खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सवा'चा शुभंकर म्हणून, त्या परिसरातील दुर्मीळ अशा 'हिमालयीन किंगफिशर'ची निवड करण्यात आली होती. 'खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सवा'चा हा शुभंकर साहस, ऊर्जा आणि निसर्गाशी असलेल्या नात्याचे प्रतीक आहे. या शुभंकरचे अनावरण श्रीनगर येथे करण्यात आले.

दल सरोवरातील या महोत्सवात ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून ८०० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. या महोत्सवात रोइंग, कयाकिंग, कॅनोइंग, वॉटर स्कीइंग, शिकारा रेस आणि ड्रॅगन बोट रेस यांसारख्या जलक्रीडांचा समावेश होता. हा जलक्रीडा महोत्सव 'खेलो इंडिया' आयोजित करत असलेल्या, विविध क्रीडा प्रकारांतील एक भाग होता. यावर्षी मे महिन्यात दीव येथे पहिले 'खेलो इंडिया बीच गेम्स' आयोजित करण्यात आले होते, तर या वेळचे आयोजन 'जम्मू-काश्मीर क्रीडा परिषदे'कडून 'केंद्रीय युवा व्यवहार' आणि 'क्रीडा मंत्रालय व भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई)' यांच्या सहकार्याने केले होते. 'भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई)'च्या देखरेखीखाली आयोजित या महोत्सवाने, लॉस एंजेलिस ऑलिम्पिक २०२८ साठी खेळाडूंना प्रशिक्षण आणि अनुभव देण्यासाठी एक व्यासपीठदेखील प्रदान केले. हा महोत्सव २०१७-१८ साली सुरू झालेल्या 'खेलो इंडिया' क्रीडा उपक्रमाचा एक भाग होता. ऑगस्ट महिन्यात झालेल्या या जलक्रीडा महोत्सवातील क्रीडांना अनुरूप असणारे दल लेकचे पाणी तेथील परिसर, हवामान या स्पर्धेतील खेळाडूंना उचित असेच होते. या खेळाबरोबरच तो परिसर तेथील प्रसिद्ध लाल चौक, अशा ठिकाणी फिरून येण्याची त्यांना अनायसे संधी मिळाली होती. भारतात स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यासाठी देश-विदेशांतील विविध खेळांचे संघ, खेळाडू, अधिकारी असे अनेकजण ताजमहाल तसेच, जम्मू-काश्मीरच्या अनेक पर्यटनस्थळांना आवर्जून भेट देऊन, मग घरी परतात. तसेच 'खेलो इंडिया'मधील खेळाडूही थोडा वेळ काढून पर्यटक बनले होते.

श्रीनगरमधील कडायाच्या थंडीत दल सरोवराचा मोठा भाग गोठतो. श्रीनगर, गुलमर्ग अशा जम्मू-काश्मीरमधील अनेक तलावांच्या काठांवर आणि आत, अनेक ठिकाणी बर्फाचा जाड थर तयार होतो. यामुळे हे दृश्य अत्यंत आकर्षक तर होतेच; पण हे पाणी जेव्हा गोठते, तेव्हा ते सरोवर भीतीदायक वाटू लागते. कारण, त्यामुळे जम्मू-काश्मीरच्या किश्तवाडसारखे हिमनदीयुक्त अनेक तलाव फुटण्याचीही शयता निर्माण होते. यामुळे पायाभूत सुविधा आणि जीवन संकटात येण्याचा धोका निर्माण होतो. एकंदरीतच तेथील पर्यावरण संकटात येण्यासारखी धक्कादायक परिस्थिती निर्माण होते. हवामान बदलाचाही हा परिणाम आहे. या धक्कादायक परिस्थितीतून क्रीडाविश्व काही वेगळे नाही. ते कसे हे आपण जाणून घेण्यासाठी पर्यटकांना प्रिय असणाऱ्या गुलमर्गचे उदाहरण घेऊ. शीतकालीन खेळांसंबंधित सगळे गुलमर्गला जातात पण, तेथे जर बर्फच उपलब्ध नसेल, तर गुलमर्ग नाखूश होते. गुलमर्ग एका वर्षी असेच नाखूश झाले होते. 'खेलो इंडिया विंटर गेम्स'चे आयोजन त्यावर्षी करण्यात आले होते पण, तेथे पाहिजे तेवढा बर्फच उपलब्ध नसल्याने, त्या स्पर्धा नाईलाजाने पुढे ढकलण्यात आल्या होत्या.

साधारणतः डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात गुलमर्गला बर्फ जमा होतो पण, गेली काही वर्षे यात बदल आढळून येत आहे. हवामान बदल विंटर गेम्सलाही शह देत आहे. पृथ्वीच्या वातावरणात होत असलेले बदल, तसेच वातावरण आणि पृथ्वीच्या भूशास्त्रीय, रासायनिक, जैवभौगोलिक घटक यांच्यातील आंतरक्रियांमुळे होत असलेले बदल या दोन्हींमुळे पृथ्वीच्या हवामानात वेळोवेळी जे बदल घडून येतात,

**पांढरा शुभ्र पसरलेला बर्फ सगळ्यांच्याच मनाला भुरळ घालतो. त्यासाठीच अनेकजण बर्फ पडणाऱ्या ठिकाणी फिरण्यास जातात. या बर्फांगणावर अनेक खेळांच्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धाही होतात. मात्र, सध्या हवामान बदलाचा परिणाम या बर्फावरही होत आहे. त्यामुळे अनेक धोके आ वासून उभे आहेत. या परिणामांचा आणि येऊ घातलेल्या अरिष्टांचा घेतलेला मागोवा...**



त्यांना 'हवामान बदल' म्हणतात. पृथ्वीचे वातावरण हे समुद्र, हिमनग, भूपृष्ठभाग तसेच त्यावरील वनस्पतींचे आच्छादन, यांच्याशी जोडलेले असते आणि याद्वारे प्रभावितही होते. जागतिक तापमानवाढीमुळे हिमनद्यांचे वितळणे ही चिंतेची बाब झाली आहे. १९६० सालापर्यंत आफ्रिकेतील 'माऊंट किलिमांजारो' या पर्वतावर मुबलक बर्फ होता पण, आज तेथे अतिशय नगण्य बर्फ आहे. हिमालयाच्या बर्फाच्छादित पर्वतरांगामध्येही असेच आढळून येते. या हिमनद्या पाणीपुरवठा म्हणून अतिशय महत्त्वाच्या असतात. या हिमनद्या नष्ट पावल्या, तर या नद्यांवर अवलंबून असणाऱ्यांना पाणी टंचाईचा सामना करावा लागेल. हे वितळलेले पाणी समुद्राच्या पाण्यात मिसळून जाते. परिणामी पाण्याची पातळी वाढते, पूर येतात. पाण्यावरील हिमनगांचा बहुतांशी भाग पाण्याखाली असतो व फारच थोडा पाण्यावरही दिसतो. हे हिमनग जर वितळले, तर पाण्याची पातळी वाढत नाही पण, जर जमिनींवरील हिमनग वितळले, तर ते पाणी सरतेशेवटी महासागरात येते व पाण्याची पातळी वाढते.

साऱ्या जगाने सर्वांत उष्ण जानेवारी महिना, २०२५ साली अनुभवला आहे. मनुष्यनिर्मित बर्फांगणांची निर्मिती करून, त्याच्यावर स्पर्धा खेळवायची वेळ येईल. कृत्रिम बर्फ बनवून तो सर्वदूर पसरवत कृत्रिम बर्फाची मैदाने बनवत, त्या अडचणींवर मात करण्याचा प्रयोग भारतात करण्यात येत आहे. कृत्रिम बर्फाचा उपाय आपल्याला काही ठिकाणी यशस्वी जरी दिसत असला, तरी तो प्रचंड खर्चिक असतो. भारतात हिवाळी पर्यटन आणि क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी, लडाखने कृत्रिम बर्फ बनवण्याचे यंत्र तयार केले आहे. लडाखमध्ये 'लडाख स्की आणि स्नोबोर्ड असोसिएशन'ने, कारगिलमध्ये कृत्रिम बर्फ बनवण्याचे यंत्र निर्मितीत यशस्वीरित्या पुढाकार घेतला आहे. लडाखमध्ये हिवाळी पर्यटन आणि क्रीडा अशा दोन्हीसाठी हे नावीन्यपूर्ण उपाय महत्त्वपूर्ण आहेत.

सादिक अली आणि त्यांच्या टीमने बनवलेले हे यंत्र, कृत्रिम बर्फ निर्मितीसाठी कॉम्प्रेसर आणि स्प्रे नोझलसारख्या सहज उपलब्ध घटकांचा वापर करते. उल्लेखनीय म्हणजे, हे मशीन फक्त एका तासात १५ बाय १५ फूट क्षेत्रांत एक इंच बर्फ तयार करू शकते. याचा वापर बर्फाची कमतरता असलेल्या भागात स्कीइंग कोर्सेस राखण्यासाठी आणि हिवाळी क्रीडा प्रशिक्षणाला पाठिंबा देण्यासाठी होईल. यासारख्या नवोपक्रमाचे महत्त्व हिवाळी खेळांच्या पलीकडे जाते. या तंत्रज्ञानाचा वापर बर्फाचे संकलन-सिंचन आणि इतर पाणी व्यवस्थापन गरजांसाठी बर्फ साठवण्यासाठीदेखील केला जाऊ शकतो. ज्यामुळे या प्रदेशात शाश्वत पाणी उपायांमध्ये योगदान मिळेल. लडाखच्या अनेक भागांमध्ये वाढती चिंता असलेल्या पाण्याच्या टंचाईवरही याच्या सहकार्याने मात करया येऊ शकते.

लडाखचे लेफ्टनंट गव्हर्नर यांना आवाहन करून, असोसिएशनने लडाखला जागतिक हिवाळी क्रीडा केंद्रात रूपांतरित करण्यासाठी, रोजगार निर्माण करण्यासाठी आणि या प्रदेशात विकासाला चालना देण्यासाठी या बर्फ बनवण्याच्या तंत्रज्ञानात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले आहे.

कृत्रिम पाऊस पाडणे असो, कृत्रिम पावसा-पाण्यापासून बनवलेला कृत्रिम बर्फ पाडणे असो, अथवा जमिनीवरील यंत्रांच्या मदतीने बर्फाचे अंथरुण मैदानावर पसरवणे असो; मनुष्य त्यावर विविध क्रीडा करण्यात यशस्वी होत असला, तरी त्यासाठीचे अर्थशास्त्र, तंत्रशास्त्र बघता अंथरुण पाहून पाय पसरायचे असतात. याला येणारा खर्च फार खर्चिक असतो कारण, कितीही झाले तरी नैसर्गिक वातावरणात खेळलेले खेळ आणि कृत्रिम वातावरणात खेळलेले खेळ यात खचितच फरक असणार आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

हवामान बदलामुळे आज भारतीय खेळांच्या पैलूंवर लक्षणीय परिणाम होत आहे आणि ते नष्ट होत आहेत. यामुळे तीव्र उष्णता वाढत असून, हवामानाचे स्वरूप बदलत आहे आणि पाणी आणि बर्फाची कमतरता निर्माण होत आहे. यामुळेच सामनेही पुढे ढकलले जात असून, कार्यक्रम रद्द होत आहेत. तसेच खेळाडूंचे आरोग्यही धोयात येत आहे आणि खेळाच्या मैदानांचीही धूप होत आहे. खेळाडू आणि प्रेक्षकांसाठी परिस्थिती असुरक्षित बनवण्यापासून ते स्थिर बर्फ आणि बर्फावर अवलंबून असलेल्या हिवाळी खेळांसारख्या विशिष्ट खेळांचे भविष्य धोयात आणण्यापर्यंत, आणि पूर आणि वाढत्या पाण्यामुळे ग्रामीण खेळांवरही परिणाम होण्यापर्यंतचे परिणाम हवामन बदलामुळे घडत आहेत. अशी माहिती उपलब्ध आहे की, भारतातील १६ खेळाडूंनी हिवाळी ऑलिम्पिकच्या ११ आवृत्तीत भारतातर्फे सहभाग घेतला आहे. भारताचे तीन खेळाडू १९८८, २०१० आणि २०१४ साली खेळले होते; नंतर २०१८ साली तो आकडा दोन झाला.

आता तर अरिफ खान हा केवळ एकमेव खेळाडू दिसून येईल की, ज्याने २०२२ सालच्या हिवाळी ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले होते. या हवामान बदलामुळे बर्फाचे क्रीडांगण आणि त्यात उतरणारे खेळाडूंचे घसरणीला लागलेले आकडे, आपल्याला दिवसेंदिवस चिंतेत टाकणारे आहेत. ही चिंता फक्त भारतापुरती मर्यादित नसून, ती एक जागतिक समस्या बनत असून, तो सार्वजनिक चिंतेचा विषय झाला आहे. ऑटोबर २०२३ साली 'आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती'चे अध्यक्ष थॉमस बाख, मुंबईत आयोजित 'आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती'च्या १४१व्या बैठकीला आले होते. त्यावेळच्या भाषणात त्यांनी हवामान बदलाचा क्रीडा क्षेत्राला होणाऱ्या चिंतेबाबत आपले मत व्यक्त केले. या सगळ्यांनी समस्त जनतेला आवाहन केले आहे की, सर्वसाधारण जनतेने पुढाकार घेत, हवामान बदलाचा तिढा सोडवावा. खेळांमधील शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांचा पर्यावरणीय परिणाम कमी करण्यासाठी, तसेच बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे केले तरच आपण खेळू शकू. चला तर मग क्रीडाविश्वावरचे ते अरिष्ट येऊ न देण्याची जबाबदारी सगळ्यांनीच स्वीकारूया कारण, 'मन की बात'मध्ये हेदेखील म्हटले होते की, 'जो खेळतो तो बहरतो.' (लेखक माजी खेलकूद आयाम प्रमुख, पश्चिम महाराष्ट्र प्रांत, जनजाती कल्याण आश्रम आणि माजी हॉकीपटू आहेत.)